हॉटेल जॉब-सुपरवायझर
१० वी पास/नापास ( वय वर्ष १८ पूर्ण)
१२,०००/- पगार
राहणे/जेवण/फ्री
संपर्क- पाटील ब्रदर्स हॉटेल
पांडवादेवी, पो. पोयनाड
मो.नं. ८६९८७६०००२/८६९८७६०००८
८६९८७६०००५

# कृषीवल

रायगड, गुरुवार, दि. ६ जून २०२४

किंमत ४ ₹




**आजचा अग्रलेख**
**जय महाराष्ट्र**

**वेधक**

## देवेंद्र फडणवीस पदमुक्त होणार?



**मुंबई :** लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रात भाजपच्या झालेल्या दारुण पराभवाची जबाबदारी स्वीकारत देवेंद्र फडणवीस यांनी मंत्रीपदाचा राजीनामा देण्याची तयारी दर्शवली आहे. पक्षनेतृत्वाला भेटून ते तशी विनंती करणार आहेत. खुद्द फडणवीस यांनीच बुधवारी (दि. ५) घेतलेल्या पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. लोकसभा निवडणुकीत पक्षाच्या कार्यकर्त्यांनी प्रचंड मेहनत घेतली. आमचे मुंबईचे अध्यक्ष, राज्याचे अध्यक्ष व इतर पदाधिकाऱ्यांनी दिवसरात्र काम केलं. कार्यकर्त्यांना उत्साहित करण्याचं काम केलं. मात्र, जागा कमी आल्या आहेत ही वस्तुस्थिती मान्य करावी लागेल, असं पान २ वर

# सत्तास्थापनेचा दावा

## एनडीए आणि इंडिया आघाडीमध्ये चढाओढ

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।
लोकसभा निवडणुकीच्या निकालाने सर्वांनाच चकवले आहे. भाजप्रणित एनडीएला इंडिया आघाडीने कडवी झुंज दिली आहे. आता सत्तास्थापनेचा दावा करण्याकरिता एनडीए आणि इंडिया आघाडी यांच्यात चढाओढ सुरू आहे. एनडीएने बहुमताचा आकडा गाठला असून, इंडिया आघाडीकडूनही सत्तास्थापनेचा दावा करण्यात येणार असल्याची चर्चा आहे. याकरिता जुन्या मित्रपक्षांना बरोबर घेण्याकरिता जोरबैठका सुरू झाल्या आहेत. बुधवारी (दि. ५) एनडीए आणि इंडिया आघाडीच्या बैठका पार पडल्या. दरम्यान, एनडीएच्या बैठकीनंतर राष्ट्रपतींना भेटून सत्तास्थापनेचा दावा करण्यात आला आहे. पान २ वर

### नेतेपदी मोदींची निवड



### ८ जूनला मोदींचा शपथविधी?

पंतप्रधान मोदी यांनी बुधवारी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्याकडे पंतप्रधानपदाचा राजीनामा दिला असून, १७ वी लोकसभा विसर्जित करण्याची शिफारस त्यांनी राष्ट्रपतींकडे केली होती. त्यानुसार राष्ट्रपतींनी राजीनामा स्वीकारला आहे. दरम्यान, बुधवार एनडीएची बैठक पार पडली. त्यामध्ये एनडीच्या नेतेपदी नरेंद्र मोदी यांची एकमताने निवड करण्यात आली आहे. दरम्यान, एनडीएकडून सरकार स्थापनेचा दावा करण्यात येणार असून, त्यासाठी घटक पक्षांचं समर्थन पत्र दिलं जाणार आहे. त्यामुळे नरेंद्र मोदी तिसऱ्यांदा देशाचे पंतप्रधान होणार आहेत. येत्या ८ जूनला मोदींचा शपथविधी सोहळा पार पडण्याची शक्यता असून, राष्ट्रपती भवनात या सोहळ्याची जोरदार तयारी सुरू आहे.

### आघाडीतही जोरदार खलबतं

इंडिया आघाडीच्या घटक पक्षांची भविष्यातील रणनीती ठरवण्यासाठी काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांच्या निवासस्थानी बैठक पार पडली. विरोधी पक्षात बसायचे की सरकार स्थापनेसाठी प्रयत्न करायचा याबाबत या बैठकीत चर्चा करण्यात आली. एकीकडे एनडीएकडून सरकार स्थापनेचा दावा केला जातोय. तर दुसरीकडे इंडिया आघाडीच्या गोटात जोरदार खलबतं सुरु आहेत. पान २ वर



**अजित पवार गटाचे दहा आमदार नाराज**



## घरवापसी करणार?

। पुणे । प्रतिनिधी ।
अजित पवार गटाचे दहा आमदार नाराज असून, ते घरवापसी करणार असल्याचे बोलले जात आहे. लोकसभा निवडणूक निकालानंतर ही परिस्थिती निर्माण झाली आहे. बारामतीमध्ये अजित पवार यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांचा सुप्रिया सुळे यांनी दारुण पराभव केला. त्यामुळे वेगवेगळ्या मतदारसंघातील अजित पवार गटाच्या आमदारांनी त्यांच्याशी संपर्क करत त्यांना शुभेच्छा दिल्या आहेत. तसेच सुप्रिया सुळे आणि शरद पवार गटाच्या नेत्यांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केल्याचं समोर आलं आहे. त्यामुळे विधानसभेच्या आधी अजितदादांसोबत गेलेले आमदार आता शरद पवारांसोबत येणार का, हे पाहावं लागेल.

अजित पवारांच्या नाराज आमदारांनी सुप्रिया सुळेंना संदेश पाठवले आहेत. आमदारांनी अभिनंदनपर संदेश करत सुप्रिया सुळेंशी संपर्क साधायचा प्रयत्न केला असल्याची माहिती विश्वसनीय सूत्रांनी दिली आहे. यामुळं अजित पवारांचे पान २ वर

### आमदारांमध्ये चलबिचल

राष्ट्रवादी फुटल्यानंतर ४० हून अधिक आमदार हे अजित पवारांसोबत गेले होते. परंतु, लोकसभा निकाल लागल्यानंतर शरद पवारांना मोठं यश मिळालं. शरद पवारांनी १० पैकी ८ खासदार हे निवडून आणले. तर, दुसरीकडे अजित पवारांचा एकच खासदार निवडून आला. अजित पवार हे सुनेत्रा पवारांनाही निवडून आणू शकले नाहीत. त्यामुळे त्यांच्यासोबत गेलेल्या आमदारांमध्ये आता चलबिचल सुरू असल्याची माहिती आहे.

# पाण्यासाठी टँकरवर मदार

## दहा तालुक्यांमध्ये पाण्याचा दुष्काळ | ३१९ ठिकाणी ४७ टँकरने पाणीपुरवठा

। प्रमोद जाधव ।
। अलिबाग ।
रायगड जिल्ह्यातील धरणांच्या पाण्याची पातळी कमी झाली असून, अनेक धरणांनी तळ गाठला आहे. त्यामुळे पाण्याची समस्या भीषण होऊ लागली आहे. पाण्यासाठी नागरिकांना विशेष करून महिलांना दीड ते दोन किलोमीटर पायपीट करावी लागत आहे. रायगड जिल्ह्यातील दहा तालुक्यांमध्ये पाण्याचा दुष्काळ निर्माण झाला असून, ८४ हजार ७९२ नागरिकांना पाणीटंचाईने ग्रासले आहे. उन्हाच्या चटक्याबरोबरच नागरिकांना पाणीटंचाईचे चटके सहन करावे लागत आहेत. दरम्यान, टंचाईग्रस्त गावातील नागरिकांची पाण्यासाठी हेळसांड होऊ नये, यासाठी प्रशासनाच्या वतीने ३१९ ठिकाणी ४७ टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात आहे.

रायगड जिल्ह्यातील पाणीपुरवठा करणाऱ्या प्रकल्पात पाहिजे त्या प्रमाणात जलसाठा उपलब्ध नाही. त्यातच या प्रकल्पातील सिंचनासाठी होणारा भरमसाठ वापर, उष्णतेमुळे होणरे पाण्याचे बाष्पीभवन, पाण्याच्या चोरीमुळे धरणांमधील पाण्याने तळ गाठला आहे. दिवसागणिक धरणांतील जलसाठा कमी होत असल्यामुळे पाणीटंचाईने डोके वर काढले आहे. अनेक गावांतील पाण्याचे स्त्रोत आटल्यामुळे हंडाभर पाण्यासाठी महिलांना कोसोदूर पायपीट करावी लागत आहे. अनेक गावांत तर पाण्यासाठी रात्रीचा दिवस करावा लागत आहे. ज्या ठिकाणी पाणी उपलब्ध आहे, तेथे पाणी भरण्यासाठी महिलांच्या रांगा लागत आहेत. जेथे ग्रामस्थांना पिण्यासाठी पाणी मिळत नाही,



तेथे जनावरांना पिण्यासाठी पाणी कोठून आणावे, असा प्रश्न पशुपालकांना पडला आहे.

दरम्यान, रायगड जिल्ह्यातील दहा तालुक्यांतील ५६ गावे, २६३ वाड्या अशा एकूण ३१९ ठिकाणी पाण्याचा दुष्काळ सुरू झाला आहे. नागरिकांची पाण्यासाठी हेळसांड होऊ नये, यासाठी जिल्हा प्रशासनाच्या वतीने अलिबाग तालुक्यात तीन गावांसाठी दोन टँकर, पेणमध्ये तीन गावे, ६८ वाड्यांमध्ये १०, पनवेमध्ये आठ गावे, १६ वाड्यांमध्ये नऊ टँकर, उरणमध्ये चार वाड्यांमध्ये एक, कर्जतमध्ये अकरा गावे, १९ वाड्यांमध्ये पाच, खालापूरमध्ये सहा गावे, १२ वाड्यांमध्ये पाच, महाडमध्ये १७ गावे, १२६ वाड्यांमध्ये नऊ, पोलादपूरमध्ये सात गावे, १३ वाडयांमध्ये तीन, श्रीवर्धनमध्ये दोन वाड्यांमध्ये एक टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरु केला आहे. या टँकरवरच टंचाईग्रस्त गावांची मदार अवलंबून आहे. अजून पावसाला सुरुवात झालेली नाही, त्यामुळे टँकरग्रस्त गावांमध्ये वाढ होण्याची दाट शक्यता आहे. दरम्यान, हवामान खात्याने येत्या दोन ते तीन दिवसात पाऊस पडणार असल्याचा अंदाज व्यक्त केला आहे. जिल्ह्यात ढगाळ वातावरणही ठिकठिकाणी आहे. त्यामुळे सर्वांचे डोळे आभाळाकडे लागून राहिले आहेत.

### जिल्ह्यात यलो अलर्टचा इशारा

रायगड जिल्ह्यासह रत्नागिरी, ठाणे या जिल्ह्यांमध्ये हवामान खात्याने यलो अलर्ट जारी केला आहे. आठ जूनपर्यंत जिल्ह्यात काही ठिकाणी हलक्या सरी, तर काही ठिकाणी विजांच्या गडगडाटांसह पाऊस कोसळण्याची शक्यता वर्तविली आहे. त्यामुळे नागरिकांनी या कालावधीत काळजी घ्यावे, असे आवाहन जिल्हा आपत्ती व्यवस्थाप अधिकारी कार्यालयाकडून करण्यात आले आहे.

### पिण्यासाठी विकतचे पाणी

रायगड जिल्ह्यामध्ये मार्चपासूनच पाण्याची समस्या सुरू झाली आहे. आठ-आठ दिवस पाणी मिळत नसल्याने नागरिकांना पाण्यासाठी प्रचंड मेहनत घ्यावी लागत आहे. जिल्ह्यातील अनेक भागांमध्ये वीस लीटर पाणी ५० ते ६० रुपयांनी विकले जात आहे. त्यामुळे पिण्यासाठी काहीजण विकतचे पाणी घेत आहेत. काही ठिकाणी जलशुध्दीकरण केंद्र उभारल्याने महिन्याला दोनशे तीनशे रुपये भरून त्या केंद्राद्वारे पाणी घेत आहेत. त्यामुळे नागरिकांना पाण्यासाठी आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत आहे.

### पाणी भरण्यासाठी झुंबड

गावात पाण्याचे टँकर येताच पाणी भरण्यासाठी नागरिकांची एकच झुंबड उडत आहे. कधी कधी पाणी भरण्यावरुन वादही होत आहेत. ज्या गावात टँकरने पाणीपुरवठा करण्यात येत आहे, त्यांना दिलासा मिळत असला तरी पाऊस वेळेवर पडला नाही तर आगामी काळात जिल्ह्यातील आणखी बऱ्याच गावांना टँकरने पाणीपुरवठा करावा लागण्याची शक्यता आहे.

## मान्सून ४८ तासांत महाराष्ट्रात

**पुणे :** पुढील ४८ तासांसाठी राज्यात विविध ठिकाणी पावसाचा इशारा हवामान विभागाने दिला आहे. राज्यात मान्सूनसाठी अनुकूल वातावरण निर्माण झाले आहे, अशी माहिती पुणे हवामान विभागाचे प्रमुख कृष्णानंद होसाळीकर यांनी दिली. त्यानुसार, दक्षिण रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पुणे, कोल्हापूर, सातारा, सांगली आणि मराठवाड्यातील लगतच्या भागात जोरदार पाऊस होण्याची शक्यता आहे.

# अलिबागमध्ये शिवराज्याभिषेक सोहळा

। अलिबाग । प्रतिनिधी ।
छत्रपती शिवाजी महाराज चौक उत्सव समिती अलिबागच्या वतीने शिवराज्याभिषेक सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. अलिबागमधील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे हा सोहळा गुरुवारी (दि.०६) सकाळपासून सुरु होणार आहे. यानिमित्त दिवसभर विविध कार्यक्रम होणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली.

शहरातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पूर्णाकृती पुतळ्याजवळ सकाळी पावणे सात वाजण्याच्या सुमारास ध्वजपूजन केले जाणार आहे. त्यानंतर सकाळी सात वाजण्याच्या सुमारास शिवराज्याभिषेक सोहळा सुरु होणार आहे. सायंकाळी सहा ते रात्री दहा वाजण्याच्या सुमारास विविध कार्यक्रम होणार आहेत. त्यामध्ये कुलाबा ढोलताशा ध्वजपथक वादन व मानवंदना, जय हनुमान लाठीकाठी आखाडा भोनंग व अलिबाग मार्शल आर्ट्स अकादमी लाठीकाठी व मर्दानी खेळ, मंगलमूर्ती वाद्य पथक वादन व मानवंदना, स्ट्रींग फॅमिली प्रस्तुत 'सूर मराठी माताची उत्सव शिवस्वराज्याचा' असे अनेक कार्यक्रम होणार आहेत. फटाक्यांची आतषबाजी करीत या कार्यक्रमांचा समारोप होणार असल्याची माहिती आयोजकांकडून देण्यात आली आहे.

**कृषीवल माध्यम प्रायोजक**



# शेतशिवार गजबजले

## धूळवाफे पेरणीसाठी बळीराजाची लगबग

। अलिबाग । प्रतिनिधी ।
**मान्सूनची चाहूल लागताच बळीराजाची भातपेरणीसाठी धांदल उडाली आहे. काही शेतकऱ्यांनी धूळवाफे पेरणीवर भर दिला आहे. जिल्ह्यातील अनेक भागात शेतकरी धूळवाफे पेरणीच्या तयारीला लागले असून, ठिकठिकाणी त्याची लगबग सुरू झाली आहे. त्यामुळे शेत शिवारे गजबलेली दिसून येत आहे.**

रायगड जिल्ह्यामध्ये ९८ हजारांहून अधिक भातलागवडीचे क्षेत्र आहे. यंदा पावसाचे प्रमाण अधिक असून, मान्सून वेळेवर दाखल होणार असल्याचे हवामान विभागाने आधीच स्पष्ट केले आहे. त्यामुळे खरीप हंगामातील पेरणीसाठी सध्या जिल्ह्यात मशागतीची धांदल सुरू आहे. जिल्ह्यात खरीपामध्ये प्रामुख्याने भाताचे क्षेत्र अधिक असल्याने भाताची लागवड केली जाते. दरम्यान, शेतकऱ्यांना भात बियाणे वेळेवर उपलब्ध व्हावीत यासाठी जिल्ह्यातील कृषी सेवा केंद्रामध्ये भात बियाणे विक्रीसाठी ठेवण्यात आली आहेत. बियाणे खरेदीला शेतकऱ्यांकडून सुरुवात झाली आहे. दरम्यान, अद्यापपर्यंत पेरणीयोग्य पाऊस पडलेला नाही. मात्र, पावसाला सुरुवात होण्याअगोदर धूळवाफे पेरणी केली असता भाताची उगवणी चांगली होते, असे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. त्यामुळे रोहिणी नक्षत्राच्या मुहूर्तावर भात पेरणीसाठी धांदल सुरू आहे. सध्या बळीराजा सहकुटुंब शेतशिवारात पेरणीच्या कामात मग्न असल्याचे दिसून येत आहे. जिल्ह्यामध्ये अलिबागसह अनेक भागांमध्ये वाफे तथा धूळपेरणीला गेल्या अनेक दिवसांपासून सुरुवात झाली आहे.

> जिल्ह्यामध्ये धूळपेरणीला सुरुवात झाली आहे. अनेक शेतकरी पेरणीच्या कामात मग्न आहेत. पेरणीच्या कामाचा आढावा घेण्याचे काम एक जूनपासून सुरु केले आहे. जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी हवामानाचा अंदाज घेत पेरणीची कामे करावी. दुबार पेरणीचे संकट येणार नाही याची काळजी प्रत्येकाने घ्यावी.
> – वंदना शिंदे, जिल्हा अधीक्षक, कृषी अधिकारी


● (छायाचित्र : समीर मालोदे)



# बळीवरेत झाडांची खुलेआम कत्तल

## गावठाण जमिनीवर लाकडांचा ढीग; झाडे कोणत्या जंगलात तोडली याबद्दल संशय

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

**कर्जत तालुक्याचे शेवटचे टोक असलेल्या बळीवरे गावाच्या शिवारात जंगलतोड झाली आहे. त्या भागात दोन ठिकाणी तोडलेल्या झाडांची साठवणूक करण्यात आली असून, ती झाडे नक्की कुठे तोडली आहेत? याबद्दल कोणतीही माहिती नसल्याने बळीवरे आणि खांडस भागातील जंगलतोडबद्दल संशय व्यक्त होत आहे.**



> बळीवरे येथील एक शेतकरी आणि खांडस येथील एका शेतकऱ्याने आपल्या जमिनीतील झाडे तोडण्याची परवानगी आमच्या खात्याकडून घेतली आहे. त्यानुसार परवानगी देण्यात आली असून, तोडलेल्या झाडांची साठवणूक कोणत्या जमिनीवर केली आहे याचे कोणतेही पासेस आम्ही अद्याप दिले नाहीत.
> – गणेश दिघे, वनपाल, खांडस

कर्जत तालुक्यातील नांदगाव ग्रामपंचायतीमध्ये असलेल्या बळीवरे गावाच्या शिवारात जंगलात तोडलेल्या झाडांची साठवणूक करण्यात आली असल्याची माहिती मिळाली होती. प्रत्यक्ष नांदगाव ते बळीवरे या रस्त्यावर आणि बळीवरे ते ऐनाचीवाडी रस्त्यावर मोठ्या प्रमाणावर झाडे तोडून ठेवली असल्याचे आढळून आले आहे. बळीवरे गावाच्या बाहेर तर चक्क गावठाण जागेत या लाकडांची साठवणूक करण्यात आला आहे. त्यामुळे ती लाकडे गावठाण जमिनीतील जंगलतोडमधील आहेत की काय? असा प्रश्न उपस्थित होत आहे.साधारण ज्या भागातील जमिनीमधील झाडे तोडली जातात. त्याच ठिकाणी लाकडांची साठवणूक केली जाते. मात्र, बळीवरे गावाच्या गावठाण क्षेत्रात जंगलतोड करुन ठेवलेली लाकडे आणून टाकण्यात आली आहेत. त्यामुळे ती लाकडे बळीवरे परिसरातील गावठाण जमिनी मधील झाडांवर कुऱ्हाड फिरवून त्या झाडांची कत्तल केली असल्याचा संशय स्थानिक पातळीवर व्यक्त होत आहे.

कर्जत तालुक्यात यावर्षी सर्वाधिक प्रमाणात जंगलतोड झाली असून, बळीवरे हे गाव तालुक्याच्या मुख्यालयापासून किमान ३० किलोमीटर अंतरावर आहे. त्यामुळे अधिकारीदेखील अशा भागाकडे साधारणपणे फिरकत नाहीत आणि त्याचा फायदा जंगलतोड करणारे ठेकेदार उचलतात. त्यामुळे बळीवरे गावाच्या बाहेर साठवून ठेवलेली लाकडे नक्की कोणत्या जंगलात तोडून आणली आहेत, याबद्दल कोणतीही माहिती मिळत नाही.

कारण, बळीवरे गावाच्या मागे भीमाशंकर अभयारण्य परिसर असून, त्या भागातील जंगल हे राखीव वन म्हणून जाहीर आहे. मग कोणत्या जंगलातील झाडे तोडून आणली आहेत, असा प्रश्न वन विभागाने उपस्थित करण्याची गरज आहे. परिसरात मोठ्या प्रमाणात जंगल अस्तित्वात राहिले नसल्याने संबंधित ठेकेदाराने तोडून आणलेली लाकडे ही राखीव वन क्षेत्रातील तर नाहीत ना, असा संशयदेखील व्यक्त होत आहे. भीमाशंकर अभयारण्यालगत झाडे तोडण्यास सक्त मनाई असल्याने बळीवरे येथे तोडून ठेवलेली लाकडे ही अभयारण्य परिसरातील असल्यास कायदेशीर कारवाई संबंधित ठेकेदारावर होऊ शकते.

त्याची खात्री वन विभाग करणार आहे काय, असा सवाल स्थानिक शेतकरी करीत असून, वनजमिनीवरील किंवा खासगी जमिनीवरील झाडांची तोड करण्यावर कडक कारवाई करावी, अशी मागणी बळीवरे येथील जंगलतोडवरून सुरू झाली आहे.

# वैजनाथ जमीनप्रश्नी कर्जत पोलिसांची दादागिरी

## कुटुंबातील एकाची मानवाधिकार आयोगाकडे तक्रार

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यातील वैजनाथ येथील एका कुटुंबाच्या सामायिक जमिनीमध्ये न्यायालयाचे कोणतेही आदेश नसताना कर्जत पोलिसांनी एकतर्फी कारवाई केल्याचा दावा केला आहे.त्यामुळे त्या पीडित कुटुंबातील अनिता गुरव थेट राज्य मानवाधिकार आयोगाकडे तक्रार केली असून, न्यायाची अपेक्षा व्यक्त केली आहे.

रायगड जिल्ह्यातील आमची वडिलोपार्जित जमीन मिळकत आहे. त्या कुटुंबातील व्यक्तीच्या हिश्श्यास १०१/१, १०२/२ अशा जमीन मिळकती आलेल्या आहेत. त्यातील दिलीप गुरव यांच्या हिश्श्यास १०१/२ अशी जमीन मिळकत देण्यात आली आहे. त्यामध्ये जाण्यासाठी पूर्वपार वहिवाटीचा रस्ता आहे. तो तसाच कायमस्वरूपी ये-जा करण्यासाठी देण्यात आला. तर, हिश्श्यास देण्यात आलेल्या जमीन मिळकतीमध्ये आम्ही शेतघर बांधले आहे. सदर शेतघरामध्ये आमचे संपूर्ण कुटुंब राहात आहे. मात्र, भाऊ दिलीप गुरव याने जुना आमचा ये-जा करण्यासाठी जो वहिवाटीचा रस्ता दिलेला, तो बंद करून नवीन रस्ता तयार केला. त्यामुळे सदरचा एकमेव रस्ता आम्हाला शेतघरामध्ये ये-जा करण्यासाठी वापर करीत आहोत. अशी वस्तुस्थिती असताना आता भाऊ दिलीप गुरव हे आपल्या कुटुंबातील अन्य व्यक्तींची अडवणूक करीत आहेत. रस्त्यासाठी जमीन देण्यासाठी विरोध केला असता त्यांच्याविरुद्ध खोटी तक्रार कर्जत पोलीस ठाण्यात केली, असा दावा अनिता गुरव यांनी केला आहे. वास्तविक, आमच्या शेतजमिनीत आणि शेतघरात जाण्यासाठी एकमेव असलेल्या रस्त्याचा वापर करण्यास दिलीप गुरव आडकाठी करीत आहेत. हा आपल्या कुटुंबावर अन्याय झालेला असताना, कर्जत पोलीस दमदाटी करतात तसेच आमची तक्रारसुद्धा घेत नाही आणि दिलीप गुरव यांना रस्ता बंद करण्यास मदत करीत आहेत, असा आरोप करण्यात आला आहे.

# बंदी काळातही खुलेआम मासेमारी

- **अधिकाऱ्यांशी अर्थपूर्ण साटेलोटे असल्याची चर्चा**
- **स्थानिक कोळी बांधवांकडून संताप व्यक्त**

**। उरण । वार्ताहर ।**

मासेमारी बंदी काळात उरणमध्ये खुलेआम मत्स्यविभागाच्या अधिकारी वर्गाच्या कृपाशीर्वादाने मासेमारी सुरू असते, असा आरोप करण्यात येत आहे. दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी बंदी काळात मासेमारी करण्यासाठी मत्स्यविभागाच्या अधिकाऱ्यांना हाताशी धरण्यात आल्याचा दावा, उरणमधील एका नामांकित मच्छिमार संघटनेच्या चेअरमनने दिली आहे.

राज्य सरकारच्या आदेशानुसार १ जूनपासून समुद्रात मासेमारीकरिता येणार नाही. हा बंदी कालावधी ३१ जुलैपर्यंत लागू करण्यात आला आहे. त्यामुळे कोकणातील विविध समुद्र, खाडीकिनारी नौका विसावू लागल्या आहेत. या कालावधीत आदेशाचे उल्लंघन केल्यास मच्छिमारांवर कडक कारवाई करण्यात येणार असल्याचे मत्स्यविभागाने कागदोपत्री स्पष्ट केले आहे.

भारताच्या पूर्व किनारपट्टीवर मान्सूनचे आगमन लवकर होत असल्यामुळे या किनारपट्टीवर मासेमारी बंदी कालावधी १५ एप्रिल ते १४ जून तसेच पश्चिम किनारपट्टीवर मान्सूनचे आगमन उशिरा होत असल्यामुळे पश्चिम किनारपट्टीवर मासेमारी बंदी कालावधी १ जून ते ३१ जुलै २०२४ असा आहे. या कालावधीत पावसाळी मासेमारी बंदी करण्यात आली आहे. या कालावधीत मासळीच्या जीवांना प्रजोत्पादनास पोषक वातावरण असते. या कालावधीत मासेमारी बंदीमुळे मासळीच्या बीजनिर्मिती प्रक्रियेला वाव मिळून मासळीच्या साठ्याचे जतन होते. तसेच या कालावधीत खराब व वादळी हवामानामुळे होणारी मच्छिमारांची जीवित व वित्तहानी मासेमारी बंदीमुळे टाळता येणे शक्य होते. ही बंदी यंत्रचलित व यांत्रिक मासेमारी नौकांना लागू राहणार आहे. समुद्रात मासेमारीसाठी गेलेल्या सर्व यांत्रिक व यंत्रचलित मासेमारी नौका १ जूनपूर्वी बंदरात परतणे बंधनकारक आहे; तसेच ३१ जुलैपूर्वी समुद्रात मासेमारीसाठी कोणालाही जाता येणार नाही, असे मत्स्य विभागाकडून जाहीर करण्यात आले आहे.

दरवर्षी मत्स्यविभागाचा मासेमारी बंदी काळात असा आदेश कागदोपत्री निघत आहे, मात्र प्रत्यक्षात याउलट लाखो रुपयांची खिरापत घेऊन उरण परिसरात बंदी काळात मासेमारी खुलेआम सुरू असल्याचे चित्र दरवर्षी पाहावयास मिळत आहे. याबाबत मत्स्यविभागाचे आयुक्त अतुल पाटणे यांना यासंदर्भात लेखी तक्रार व त्या संदर्भातील व्हिडिओ क्लिप देऊनही आजतागायत कोणतीच कारवाई करण्यात आलेली नाही, असेही सांगण्यात आले आहे. मागील वर्षी करंजा बंदरात नामांकित सोसायटीचा चेअरमन व इतर पदाधिकारी व मत्स्यविभागाचे अधिकारी यांच्या उपस्थितीत मासेमारी करून बोटी बंदरात मासळी खाली करून त्याची विक्री करीत होते.

# उरणमधील ढाबा-हॉटेलवर दारु विक्री जोरात

**। उरण । वार्ताहर ।**

दारू प्या, पण बाटली टेबलाखाली ठेवा, काचेचा ग्लास घेऊ नका, स्टीलच्या ग्लासचा वापर करा. आणि हो टेबल चार्ज द्या. शहर आणि उपनगरातील अनेक हॉटेलमध्ये हेच चित्र आहे. मद्यविक्रीचा कुठलाही परवाना नसताना उरणमधील ढाब्यांवर, हॉटेलवर सर्रासपणे दारू विक्री होत आहे. कुठलाही परवाना नसताना अनधिकृतरित्या सुरू असलेल्या या प्रकाराला पोलिसांचे अभय असल्याचीच चर्चा आहे. त्याशिवाय हॉटेलमालक हे धाडस दाखवणार नाहीत, असेही बोलले जात आहे.

रेस्टॉरंटमध्ये मद्यप्राशन करणे महागडे ठरते. त्या तुलनेत वाइनशॉपमधून दारू घेऊन अशा हॉटेलमध्ये केवळ टेबल चार्ज, तोही ३०-५० रुपये दिल्यास दोनशे-तीनशे रुपये वाचतात. याच हॉटेलमध्ये जेवण केले तर टेबल चार्जही द्यावा लागत नाही. अशा हॉटेलमधून नजीकच्या पोलीस चौकींना जेवणही जात असल्याचे बोलले जाते. काही ठिकाणी कर्तव्यदक्ष पोलीस प्रत्यक्ष हजेरी लावून मनसोक्त मेजवानीचा आस्वाद तोही विनामोबदला घेतात. पोलिसांच्या वरदहस्तामुळेच या हॉटेलमध्ये बिनधास्तपणे दारू पिण्यास परवानगी दिली जाते, अशी खासगीत चर्चा केली जात आहे.

दरम्यान, अनेकदा येथे मद्यपींकडून होणाऱ्या भांडणांचा तसेच गोंधळाचा, त्यांच्याकडून रस्त्यांवर बेशिस्तपणे लावण्यात येणाऱ्या वाहनांमुळे सर्वसामान्य नागरिकांना मोठा त्रास होत आहे. महामार्गावरील काही हॉटेलमध्ये ड्राय-डेलाही दारू पुरविण्याची सेवा दिली जाते. मूळ किमतीच्या अधिकचे दोन-तीनशे रुपये देऊन मद्यपींना ही सेवा मिळते. हीच अवस्था उरणमधील काही भागातही मिळत असून, खुलेआम येथे ड्राय-डेच्या दिवशी दारूची विक्री होते. पण, हे पोलीस यंत्रणेला दिसत नाही का, असा प्रश्न नागरिक विचारत आहेत.

# धोकादायक इमारतींना फक्त नोटिशीचा सोपस्कार

- **दुर्घटना घडल्यानंतरच विषय चर्चेला**

**। उरण । वार्ताहर ।**

पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर पालिकेकडून धोकादायक इमारतींच्या मालकांना धोकादायक भाग उतरवून घेण्याच्या सूचना दिल्या खऱ्या; परंतु शहरात इमारतींमध्ये अजूनही रहिवासी राहात आहेत. दुसरीकडे मालक किंवा भाडेकरूंनी धोकादायक भाग स्वतः न उतरविल्यास पोलीस बंदोबस्तात उतरवून तो खर्च संबंधितांकडून वसूल करण्याचा निर्णय घेतला होता.

दरम्यान, निवडणुकीमुळे फक्त नोटिशीचा सोपस्कार पार पाडण्यातच पालिका धन्य झाली आहे. शहरात धोकादायक इमारती आहेत. धोकादायक इमारती ढासळण्याचे प्रमाण वाढले आहे. पावसाळ्यात हे प्रमाण अधिक असते. परंतु, एकदा नोटीस बजावल्यानंतर त्याकडे फारसे पालिका किंवा त्या जागेत राहणारे भाडेकरू,




मालक लक्ष देत नाही. एखादी दुर्घटना घडल्यास पालिकेचे अधिकारी नोटीस बजावल्याचे कारण देऊन हात वर केले जातात. आर्थिक नुकसान किंवा जागेवरचा दावा जाईल म्हणून तेथे राहणारे रुम सोडत नाही.

तीस वर्षे पूर्ण झाल्यास स्ट्रक्चरल ऑडिट करून ती जागा राहण्यायोग्य आहे की नाही, याबाबत प्रमाणपत्र घ्यावे त्यानंतरच निर्णय घ्यावा. राहण्यायोग्य इमारत नसल्यास त्या जागेत वास्तव्य करू नये किंवा नवीन इमारत बांधावी, अशा स्पष्ट सूचना आहेत. परंतु, याकडे फारसे लक्ष दिले जात नाही. दुर्घटना घडल्यानंतरच विषय चर्चेला येतो.

## पान १ वरून

### घरवापसी करणार?

नाराज आमदार परतीच्या वाटेवर आहेत का, अशा चर्चा सुरु झाल्या आहेत. किमान दहा आमदारांनी परतीसाठी पवार गटाच्या नेत्यांशी संपर्क साधल्याची माहिती विश्वसनीय सूत्रांनी दिली आहे.

दरम्यान, बारामतीमध्ये चुरशीची लढत झाली होती. सुप्रिया सुळे विरुद्ध सुनेत्रा पवार यांच्यामध्ये थेट लढत पाहायला मिळाला. बारामती लोकसभा मतदारसंघाकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागून होते. मात्र, सुप्रिया सुळे यांचा मोठ्या फरकाने विजय झाला. त्यांच्या या विजयानंतर अजित पवार गटातील राज्यभरातील काही आमदारांनी त्यांना मेसेज करून शुभेच्छा दिल्याने अजित पवार गटाचे दहा आमदार घरवापसी करणार असल्याच्या चर्चा जोर धरू लागल्या आहेत.

### आघाडीतही जोरदार खलबतं

या बैठकीला काँग्रेस नेते राहुल आणि प्रियांका गांधी, राष्ट्रवादीचे (एससीपी) शरद पवार आणि त्यांची कन्या सुप्रिया सुळे, शिवसेनेचे (उद्धव गट) संजय राऊत, सपा अध्यक्ष अखिलेश यादव, आरजेडीचे तेजस्वी यादव, डीएमके नेते एमके स्टॅलिन, आपचे नेते उपस्थित होते. नेते राघव चड्ढा आणि सीपीआय(एम)चे सीताराम येचुरी यांच्यासह अनेक नेते उपस्थित होते.

या बैठकीनंतरच पुढील रणनीती सांगू, असे काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष खरगे यांनी मंगळवारी, ४ जून रोजी निकालानंतर सांगितले होते. आता पूर्ण रणनीती सांगितली तर मोदीजी अलर्ट होतील. त्याचवेळी, विरोधी पक्षात बसायचे की सरकार बनवायचे याचा निर्णय बैठकीतच घेतला जाईल, असेही राहुल गांधी म्हणाले होते.

वास्तविक, निकालात युतीला एकूण २३४ जागा मिळाल्या. आघाडीला सरकार स्थापनेसाठी २७२ खासदारांच्या पाठिंब्याची गरज आहे. अशा परिस्थितीत, बहुमतासाठी, विद्यमान जागावाटपाच्या बाहेर भागीदार शोधावे लागतील.

### नेतेपदी मोदींची निवड

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या शासकीय निवासस्थानी बुधवारी एनडीएच्या घटकपक्षांची बैठक पार पडली. या बैठकीला टीडीपीचे अध्यक्ष एन. चंद्राबाबू नायडू, जेडीयूचे नेते आणि बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, चिराग पासवान उपस्थित होते. बैठक संपली असून, एनडीएचं शिष्टमंडळ राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्याकडे जाऊन सत्तास्थापनेचा दावा करणार आहेत.

### फडणवीस मंत्रीपद सोडणार?

फडणवीस म्हणाले.लोकसभेच्या संपूर्ण निवडणुकीत महाराष्ट्र भाजपचं नेतृत्व मी करत होतो. त्यामुळं जो काही पराभव झाला आहे. जागा कमी आल्या आहेत त्याची सर्व जबाबदारी माझी आहे. मी कमी पडलो. हे मी स्वीकारतो. ज्या काही त्रुटी राहिल्या आहेत, त्या भरून काढण्याचा प्रयत्न पुढच्या काळात करणार आहे. विधानसभेच्या तयारीसाठी मला आता पूर्णवेळ उतरायचं आहे. त्यामुळं मला सरकारमधून मुक्त करावं, अशी विनंती पक्षनेतृत्वाला करणार आहे, असं फडणवीस यांनी सांगितलं. 'मला पक्ष संघटनेसाठी पूर्ण वेळ देता यावा या हेतूनं मी तशी इच्छा व्यक्त करणार आहे. त्यांच्या सल्ल्यानं मी पुढं काम करेन,' असंही त्यांनी सांगितलं.

संविधान बदलण्याच्या विरोधकांच्या प्रचाराचा जनमानसावर मोठा परिणाम झाला. मराठा आरक्षण देण्यास आलेल्या अपयशाचाही आम्हाला फटका बसला. कांद्याच्या भावाच्या मुद्द्याचाही प्रचार झाला. सरकारनं आरक्षण दिल्यानंतरही मराठा आरक्षणाच्या बाबतीत वेगळा प्रचार झाला. त्याला आम्ही प्रभावीपणे उत्तर देऊ शकलो नाही. त्याचा फटका आम्हाला बसला. मराठवाड्यातील निवडणुकीत ध्रुवीकरण मोठ्या प्रमाणावर झालं, असंही फडणवीस म्हणाले.

# मुरुड समुद्रकिनारी पर्यटकांची गर्दी

**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**

मुरुड हे पर्यटनाचे क्षेत्र असल्याने पर्यटकांची पावले आपोआप मुरुड समुद्रकिनारी वळत असतात.

आज शेकडोंच्या संख्येने विविध जिल्ह्यांतून पर्यटक मुरुड समुद्रकिनारी दाखल झाले आहेत. बुधवारी सकाळपासून पारा ४० सेल्सिअसवर पोहोचला होता. या वाढलेल्या तापमानामुळे पर्यटकांनी स्वच्छ निळ्याशार आणि सुंदर समुद्रात पोहण्याचा मनसोक्त आनंद घेतला, तर कोणी बनाना राईड्स, घोडागाडी, बाईकवर सवारी केली. त्याचवेळी किनाऱ्यावर क्रिकेट खेळण्याचा आनंदही पर्यटकांनी लुटला.

# नेहा कातकरी वाणिज्य शाखेत प्रथम

**। पेण । प्रतिनिधी ।**

कास्प रायगड युनिटतर्फे नेहा बाळाराम कामकरी हिला इयत्ता तिसरीपासून सर्व प्रकारची शैक्षणिक मदत मिळत आहे. नेहा कातकरी ही आदिवासी समाजातील मुलगी आहे. चावणे हायस्कूलमध्ये आदिवासी विद्यार्थी मोठ्या संख्येने आहेत. नेहाला शिक्षणाची ओढ असल्याने अत्यंत प्रतिकूल परिस्थितीमध्ये ही पेरुची वाडी ते चावणे असा पायी प्रवास करत तिने घवघवीत यश संपादन केले आहे.



नेहाला वाणिज्य शाखेत ६०.१७ टक्के गुण मिळाले असून, तिने चावणे हायस्कूलमध्ये प्रथम क्रमांक मिळवला आहे. नेहाच्या या यशाबद्दल कास्प रायगड युनिटतर्फे तिचे अभिनंदन करुन पुढील वाटचालीसाठी तिला शुभेच्छा दिल्या आहेत.

कास्प रायगड युनिट करत असलेल्या कामामुळे तसेच पालक व शिक्षक यांच्या मार्गदर्शनामुळे आदिवासी समाजामध्ये शिक्षणाविषयी खूप जागरुकता निर्माण झाली आहे. आदिवासी समाज आता शिक्षणाच्या प्रवाहात येत आहे. नेहाने आपल्या या यशाचे श्रेय सर्व शिक्षक पालक व तिच्या शैक्षणिक प्रवासात सर्व प्रकारची मदत करणाऱ्या कास्प रायगड युनिटला दिले आहे.

# माथेरानमध्ये जखमी व्यक्तीचा मृत्यू

**नेरळ :** माथेरान घाटरस्त्यात २ जूनला स्कुटीला अपघात होऊन पती-पत्नी व त्यांची एक वर्षांची मुलगी यांचा अपघात झाला होता. या अपघातातील पती-पत्नीवर उपचार सुरू होते; मात्र उपचारादरम्यान पतीचा मृत्यू झाला.बदलापूर गोरेगाव येथे राहणारा मुबतसीम दानिश बुबेरे हा पत्नी नमरा बुबेरे आणि एका वर्षाच्या मुलीला माथेरान फिरण्यासाठी म्हणून स्कूटीवरून रविवारी (ता. २) सकाळी आला होता.

# मुरूड शहरात २२ इमारती धोकादायक

**मुरूड :** पावसाळा तोंडावर असताना मुरूड-जंजिरा नगरपरिषदेच्या वतीने जीर्ण, मोडकळीस आलेल्या इमारतीचे सर्वेक्षण केले असता, २२ इमारती धोकादायक असल्याचे निदर्शनास आले आहे. नगरपरिषदेच्या वतीने नोटीस बजावून रहिवाशांना तातडीने सुरक्षितस्थळी स्थलांतरित होण्याचे निर्देश दिले आहेत. पावसाळा सुरू होण्यापूर्वी संभाव्य अतिवृष्टी, पूर, वादळ तसेच जमीन खचणे, भूस्खलन, दरड कोसळणे, धोकादायक झाडे इत्यादी नैसर्गिक आपत्तीमुळे होणारी जीवित व वित्तहानी टाळण्यासाठी ज्या मिळकती इमारती धोकादायक झाल्या आहेत, तसेच डोंगर उतारावर, खाडीलगत आहेत, त्यामध्ये कोणीही वास्तव्य करू नये, असे आवाहन करण्यात आले आहे.

# चौल नाक्यावर वाहतूक कोंडी

**। रेवदंडा । वार्ताहर ।**

अलिबाग तालुक्याच्या दक्षिण टोकाला असलेल्या चौल गावातील मुख्य नाक्यावर नेहमीच वाहतूक कोंडी होते. एकाच ठिकाणी अनेक मार्ग येत असल्याने दिवसेंदिवस कोंडीची समस्या जटील होत आहे. नाक्यावरून एक मार्ग रेवदंडा गावाकडे जातो, दुसरा रेवदंडा बाह्यवळण मार्गावरून काशीद- मुरूड व रोहा येथील औद्योगिक वसाहतीकडे जातो तर वावेमार्गे रोह्याकडेही याच मार्गावरून जाता येते. अलिबागकडे जाणारी हजारो वाहने रोज याच मार्गावरून जातात, मात्र अनेकदा पर्यटनासाठी येणाऱ्यांना रस्त्यांची पुरेशी माहिती नसल्याने गोंधळाची स्थिती निर्माण होत रस्त्याच्या दुतर्फा रांगा लागतात. अवजड वाहने किंवा एसटी समोरासमोर आल्या तर कोंडीत आणखी भर पडते. सुटीच्या दिवशी पर्यटक मोठ्या संख्येने येत असल्याने वाहनांच्या रांगा लागतात. त्यामुळे रेवदंडा पोलिस ठाण्यामार्फत वाहतूक नियंत्रक नेमण्यात येतो. चालकांनी रस्त्याच्या परिस्थितीचा अंदाज घेऊन वाहने चालवावी तसेच वाहतुकीला अडथळा निर्माण होईल, अशा ठिकाणी वाहने उभी करू नयेत, अन्यथा कारवाई करण्यात येईल, असे आवाहन सहायक पोलीस निरीक्षकांकडून करण्यात आले आहे.



# सेतू केंद्रावर विद्यार्थ्यांची झुंबड

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

दहावी, बारावीचे निकाल लागल्याने शैक्षणिक दाखल्यासाठी विद्यार्थ्यांची जिल्ह्यामधील सेतू केंद्रांवर झुंबड दिसून येत आहे. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक दाखले वेळेत मिळावेत, यासाठी पालकांची लगबग वाढली आहे. दहावीच्या निकालानंतर पुढील शैक्षणिक अभ्यासक्रमांसाठी विविध शासकीय कागदपत्रांची आवश्यकता भासते. त्यासाठी आतापासूनच विद्यार्थी, पालकांची लगबग सुरू झाली आहे. दहावी, बारावीनंतर अनेक विद्यार्थी व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश घेतात, तसेच वसतिगृह, शासकीय नोकरी, शासकीय योजनांसाठीही अर्ज करतात. यासाठी डोमिसाईल, जातीचा दाखला, उत्पन्नाचा दाखला, नॉन क्रिमिलेअर व रहिवासी आदी प्रमाणपत्रांची आवश्यकता असते. ही कागदपत्रे नसल्यास प्रवेशासाठी अडचणी निर्माण होण्याची शक्यता असते.

दहावी, बारावी निकालानंतर ऐनवेळी धावपळ नको, म्हणून अनेक पालक, विद्यार्थी मेपासूनच विविध शासकीय कागदपत्रे काढून ठेवण्याचा प्रयत्न करतात. नुकताच दहावी, बारावीचा निकालही जाहीर झाला आहे. त्यामुळे विद्यार्थी सध्या धावपळ करताना दिसून येत आहेत, मात्र सरकारने सेतू केंद्र संख्या वाढविल्याने शासकीय दाखले मिळणे सोपे झाले आहे.

**या दस्तऐवजांसाठी पळापळ**

दहावी, बारावीनंतर अधिवास प्रमाणपत्र, राष्ट्रीयत्व प्रमाणपत्र, रहिवासी प्रमाणपत्र, भूमिहीन असल्याचा दाखला, शेतकरी असल्याचा दाखला, जातीचा दाखला, नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र, जन्मनोंद दाखला, उत्पन्न दाखला आदी दाखले आवश्यक असतात. हे दाखले काढण्यासाठी दाखल्यानुसार वेगवेगळी कागदपत्रे जोडावी लागतात.

## जाहीर नोटिस

याद्वारे तमाम जनतेला नोटिस देण्यात येत आहे की, आमचे अशील इच्छुक असल्याने आम्ही **१) कुनुमा रुसी पोस्टवाला २) रुसी होमी पोस्टवाला (मालक)** यांच्या मालमत्तेची विषेशतः खाली दिलेल्या परिशिष्ट मध्ये वर्णन केलेल्या मालमत्तची चौकशी करत आहोत.

या मालमत्ते बाबत विक्री/साठेकरार, देवाणघेवाण, भाडेपट्टे, भाडेकरू, परवाना, ट्रस्ट या मार्गाने किंवा तिच्या कोणत्याही भागाच्या विरोधात/वर/संबंधात / विरुध्द / दावा, अपील/ वर /आक्षेप, हक्क, हित, हक्क, मागणी आणि / किंवा आक्षेप असलेली सर्व किंवा कोणतीही व्यक्ती वा संस्था, धारणाधिकार, देखभाल, सुलभता, वारसा, ताबा, संलग्न, गहाण, शुल्क, साठेकरार, खरेदी व्यवहार, अतिक्रमण, मृत्युपत्र, भेट, लिस-पेंडन्स, वहिवाट, एफ .एस .आय. वापर किंवा अन्यथा कोणत्याही स्वरूपाची हर हरकत असल्यास त्याची लेखी सूचना खलील पत्तावर देण्याची विनंती केली आहे. विक्रांत झुंजारराव ॲडव्होकेट आणि सॉलिसिटर, ४ था मजला, जलाराम ज्योत, जन्मभूमी मार्ग, फोर्ट, मुंबई ४००००१ अशा हक्क, शीर्षक, व्याज, दावा, मागणी आणि किंवा आक्षेपांच्या समर्थनार्थ कागदपत्रांच्या प्रमाणित सत्य प्रतींसह ही सूचना प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांच्या आत आम्हाला द्यावी, असे न झाल्यास असा कोणताही दावा, मागणी किंवा आक्षेप अस्तित्वात नाही असे गृहीत धरले जाईल आणि जरी असा दावा, मागणी किंवा आक्षेप कायद्यात किंवा अन्यथा अस्तित्वात असला तरीही, असे मानले जाईल की दावेदाराने असा दावा, मागणी किंवा आक्षेप सोडला आहे आणि / किंवा असा दावा, मागणी किंवा आक्षेप वापरण्याचा कोणताही अधिकार सोडला आहे आणि मुदतीनंतर आलेले कोणतेही आक्षेप आमच्या अशील यांचेवर बंधनकारक असणार नाही आणि आमचे अशील वर विचार केल्याप्रमाणे खरेदी व्यवहारात पुढे जाऊ शकतात.

**परिशिष्ट**
**(मालमत्तेचे वर्णन)**

गाव- गाणं तर्फे परहूर, तालुका - अलिबाग, जिल्हा-रायगड मधील भुमापन क्रमांक व उपविभाग -१४/१/क जिरायत. ०१.७६.०० (हे.आर.चौ.मी.) पो.ख. ००-३७-०० (हे.आर.चौ.मी.) एकूण क्षेत्र ०२-१३-०० (हे.आर.चौ.मी.), आकार ०३. रु १७ पैसे. ही मिळकत या सदर नोटिसीचा विषय आहे.

ठिकाण अलिबाग
दिनांक ०६/०६/२०२४

**झुंजारराव अ‍ॅन्ड कंपनी कारीत**
**अ‍ॅड. विक्रांत झुंजारराव**

निवडक

## सरगम तर्फे वृक्षारोपण

**पनवेल :** जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधुन लायन्स क्लब ऑफ पनवेल सरगम तर्फे सुशील हाऊस, ठाणा नाका रोड, पनवेल येथे वृक्षारोपण करण्यात आले.पनवेलचे माजी नगराध्यक्ष सईद मुल्ला, गिरीश कासट, गणेश कोळी, पनवेल सरगम क्लबच्या अध्यक्ष स्वाती गोडसे आणि सभासद यांचे हस्ते झाडे लावण्यात आली. गिरीश कासट यांनी या झाडांची निगा राखण्याचे आश्वासन दिले. सईद मुल्ला यांनी सरगम क्लबच्या सर्व सभासदांचे या उपक्रमाबद्दल कौतुक केले.

## विकास मोकल यांचे निधन

**खरोशी :** पेण तालुक्यातील बोरी गावचे विकास मोकल यांचे निधन झाले. त्यांची अंत्ययात्रा बोरी येथील घरातून काढण्यात आली. त्यांच्यावर



बोरी येथील स्मशानभूमी अंत्यसंस्कार करण्यात आले.त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, वडील, तीन भाऊ, दोन बहिणी असा परिवार आहे. त्यांचे दशक्रिया विधी १३ जूनला उद्धर रामेश्वर पाली तर उत्तरकार्य १६ जूनला रोजी बोरी येथील निवासस्थानी होणार आहेत.

## इमारतीजवळ आढळला मृतदेह

**पनवेल :** पनवेल शहरातील कोळी समाज इमारतीजवळ मोकळ्या जागेत एका इसमाचा मृतदेह आढळून आला असून, त्याच्या नातेवाईकांचा शोध पनवेल शहर पोलीस करीत आहेत. इसमाचे अंदाजे वय ४० ते ४५ वर्षे, बांधा सडपातळ, डोक्याचे केस बारीक व पांढरे, उंची अंदाजे ५ फुट ६ इंच आहे. या इसमाबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्याने पनवेल शहर पोलीस ठाणे किंवा सहा.पो.निरीक्षक राजेंद्र घेवडेकर यांच्याशी संपर्क साधावा.

## ग्रामीण भागात ६४ कुष्ठरुग्ण

**पनवेल :** पनवेल तालुक्यातील ग्रामीण भागामध्ये एकूण ६४ कुष्ठरुग्णांची संख्या आहे. या सर्वांवर उपचार सुरू असल्याचे माहिती पंचायत समिती, आरोग्य विभाग पनवेल यांच्याकडून देण्यात आली. प्राथमिक आरोग्य केंद्र नेरे येथे १४, आपटा ३१, आजीवली १२, गव्हाण १४, वावंजे १९ असे एकूण ९० रुग्ण आहेत. सद्यस्थितीत ६४ रुग्ण आहेत. कुष्ठरोग बरा करण्यासाठी शासन स्तरावर उपाययोजना केल्या जात आहेत. हा पूर्णपणे बरा होतो,असे आरोग्य विभागाकडून सांगण्यात आले आहे.

## राहत्या घरातून इसम बेपत्ता

**पनवेल :** राहत्या घरातून एक इसम कुठेतरी निघून गेल्याने तो हरविल्याची तक्रार कळंबोली पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. बलविंदरसिंह बसरा, रंग सावळा, उंची ५ फुट ११ इंच, नाक सरळ, चेहरा उभट, मिशी बारीक, बांधा मध्यम असून अंगात काळ्या लाल व व्हाईट रंगाचा टी-शर्ट व ग्रे रंगाची नाईट पॅन्ट, पायात चप्पल आहे. या इसमाबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास कळंबोली पोलीस ठाणे किंवा पोलीस हवालदार रुपाली पाटील यांच्याशी संपर्क साधावा.

# शिवराज्याभिषेकासाठी प्रशासन सज्ज

## तीन हजार कर्मचारी व स्वयंसेवक किल्ले रायगडावर तैनात

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

रायगड किल्ल्यावर सहा जूनला साजऱ्या होणाऱ्या शिवराज्याभिषेक दिन सोहळ्यासाठी प्रशासनाची तयारी सुरू झाली असून पोलिसांसह सुमारे तीन हजार सरकारी कर्मचारी कायदा व सुव्यवस्था तसेच नियोजन राखण्यासाठी सज्ज झाले आहेत. गडावर येणाऱ्या शिवप्रेमींच्या आरोग्याची काळजी घेण्याकरिता तब्बल १६ ठिकाणी आरोग्य पथके तैनात करण्यात येणार आहेत. सोहळ्यादरम्यान गडावर दाखल होणाऱ्या शिवप्रेमींची कोणतीही गैरसोय होऊ नये, याची काळजी प्रशासनाकडून घेतली जात आहे.

गडावर येणाऱ्या शिवप्रेमींकरिता वाहने पार्किंग सुविधा, गडावर ये-जा करण्याकरिता एसटी सुविधा, तात्पुरती स्वच्छतागृहे, पाणीपुरवठा, आपत्ती व्यवस्थापनाबरोबरच पोलीस सुरक्षा तसेच आरोग्य पथक अशा विविध सरकारी यंत्रणा तयारीला लागल्या आहेत. रायगड किल्ल्यावर जाण्याचा मार्ग अरुंद व खडतर असल्याने तसेच गडावर मर्यादित सुविधा असल्याने प्रशासनाकडून विशेष काळजी घेतली जात आहे. कोल्हापूरचे छत्रपती संभाजी महाराज व युवराज शहाजी राजे यांच्या उपस्थितीत हा सोहळा पार पडणार आहे. याकरिता गडावर व परिसरामध्ये कायदा-सुव्यवस्था योग्य रीतीने राखली जावी, याकरिता दोन हजार पोलीस कर्मचारी तसेच सातशे सरकारी कर्मचारी, वाहतूक पोलीस, दंगल नियंत्रण पत्रके आपदामित्र, स्थानिक बचाव पथक तसेच स्थानिक व शिवराज्याभिषेक समितीचे स्वयंसेवक असे सुमारे तीन हजार कर्मचारी व स्वयंसेवक या ठिकाणची व्यवस्था पाहणारा आहेत.



### शिवप्रेमींना वैद्यकीय मदत

वाढत्या तापमानामुळे गडावर येणाऱ्या शिवप्रेमींना आरोग्याची समस्या निर्माण होऊ शकते तसेच कोणत्याही परिस्थितीमध्ये शिवप्रेमींना वैद्यकीय मदत लागल्यास आरोग्य विभाग सज्ञ झाला आहे. जिल्हा परिषद व राज्य सरकारच्या आरोग्य विभागाकडून १६ ठिकाणी वैद्यकीय पथके तयार ठेवली जाणार आहेत.

### कवळीचा माळ येथे पार्किंग सुविधा

माणगाव-पुनाडेमार्गे रायगड किल्ल्याकडे येणाऱ्या शिवप्रेमींकरता पार्किंगची व्यवस्था कवळीचा माळ व शिवसृष्टीच्या मोकळ्या जागेत करण्यात आली आहे. तर महाडकडून येणाऱ्या वाहनांसाठी कोंझर व वाळसुरे या ठिकाणी पार्किंग व्यवस्था करण्यात आली आहे.

### सोहळ्यांकरता एसटीच्या तीनशे बस

रायगड किल्ल्यावर सहा जूनला तारखेनुसार तर २० जूनला तिथीनुसार शिवराज्याभिषेकदिन सोहळा पार पडणार आहे. सोहळ्यासाठी उपस्थित राहणाऱ्या शिवप्रेमींसाठी एसटी महामंडळाच्या ३०० गाड्या जिल्हा प्रशासनाकडून आरक्षित करण्यात आल्या आहेत. रायगडावर तारखेनुसार व तिथीनुसार असे दोन शिवराज्याभिषेक सोहळे साजरे केले जातात. सहा जूनला तारखेनुसार तर वीस जूनला तिथीनुसार शिवराज्याभिषेक सोहळा या वर्षी साजरा होणार आहे. रायगडावर साजरा होणाऱ्या सोहळ्याकरता महाराष्ट्रातील विविध भागांमधून मोठ्या संख्येने शिवप्रेमी दाखल होत असतात. या शिवप्रेमींची ये जा करण्यासाठी महाड एसटी आगाराकडून सोय केली जाते. शिवराज्याभिषेक दिन सोहळ्याला येणाऱ्या शिवप्रेमी करता वाळसुरे, कोंझर तसेच कवळीचा माळ या ठिकाणी वाहनांकरता पार्किंग सुविधा करण्यात आली आहे. रायगडच्या पायथ्याशी तसेच पाचाड घाटामध्ये वाहतूक कोंडी होऊ नये याकरिता सुविधा करण्यात आली आहे. पार्किंग ठिकाणांहून रायगड पायथा व रोपवे तसेच हेलीपॅड या ठिकाणांहून एसटी बस फेऱ्या नियोजित केल्या आहेत.

# एनएमएमटीने बस फेऱ्या वाढवाव्यात

### उलवेकरांची मागणी

**। पनवेल । वार्ताहर ।**

मागील दोन ते तीन वर्षांपासून उलवेमध्ये झपाट्याने गृहनिर्माण विकास होत आहे. त्यामुळे या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर नागरिक स्थलांतर होत आहेत. मात्र त्यांना दळणवळणाच्या सुविधा अद्याप सुस्थितीत उपलब्ध नाहीत. एनएमटीने बसच्या फेऱ्या वाढवाव्यात अशी मागणी नागरिकांमधून होत आहे.

पनवेल, उलवेमध्ये झपाट्याने विकास होत असून महामुंबई म्हणून ओळखले जात आहे. या ठिकाणी



गृहनिर्माण विकासाबरोबरच मोठ्या प्रमाणावर इन्फ्रास्ट्रक्चरही उभे राहत आहे. अटल सेतू, शिवडी नाव्हा-शिवा लिंक, रेल्वे इत्यादी दळणवळणाच्या सुविधेने मुंबई, नवी मुंबई शहरे जवळ आली आहेत. तसेच बीकेसी सारखे संकुल ही या ठिकाणी प्रस्तावित आहे. त्यामुळे भविष्यातील विकास पाहता या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर नागरी वस्ती वाढत आहे. उलवेला जाण्यासाठी रिक्षा, बस आणि रेल्वे यांची सुविधा आहे. परंतु बस आणि रेल्वेची फ्रिक्वेन्सी कमी आहे.

नेरूळ आणि बेलापूर वरून दर ४० ते ४५ मिनिटांनी रेल्वे आहे. तसेच नेरूळ आणि बेलापूर होऊन एनएमएमटीच्या बस ही उपलब्ध आहेत. मात्र १६ नंबर बस ही दर दोन तासांनी येते. त्यामुळे १६,१७ आणि २३ नंबरच्या बसच्या फेऱ्या वाढवाव्यात अशी मागणी नागरिकांमधून होत आहे. बस आणि रेल्वेमधून २० ते ३० रुपयांनी प्रवास होतो, मात्र रिक्षाने गेल्यास जादा खर्चिक होते आणि वेळही वाया जातो. त्यामुळे या ठिकाणी एनएमएमटीने बसच्या फेऱ्या वाढवाव्यात अशी मागणी नागरिक करत आहेत.

# जयेश देसाई यांना लेफ्टनंट कर्नलपदी पदोन्नती

**। रोहा । प्रतिनिधी ।**

कर्नल जयेश निमिषा नंदकुमार देसाई यांना लेफ्टनंट कर्नलपदी पदोन्नती मिळाली आहे. संपूर्ण रायगड जिल्ह्यासाठी ही अभिमानास्पद बाब असून त्यांच्या पदोन्नतीचे सर्वत्र स्वागत होत असून अभिनंदनाचा वर्षाव होताना दिसत आहे.



निमिष यांना शालेय जीवनापासून विविध बाबींची आवड असल्याने शिक्षणाबरोबरच त्यांनी खेळ व विविध स्पर्धा उपक्रमात नेहमीच आपल्या यशाची चमक दाखवून उज्ज्वल कामगिरी केली. सैन्यदलात रूजू झाल्यापासून तेथे त्यांनी मनापासून देशसेवा करून मिळेल ती जबाबदारी यथायोग्य पद्धतीने पार पाडल्याने त्यांना वेळोवेळी विविध पदांवर काम करण्याची संधी मिळाली. सेवेचे फलित म्हणून सैन्यदलात त्यांना लेफ्टनंट कर्नलपदी पदोन्नती मिळाली आहे. सैन्य दलातील सर्वोत्कृष्ट कामगिरीबद्दल यापूर्वी त्यांना सुवर्णपदकही प्राप्त झाले आहे.



● पनवेल येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर रस्ता आणि पनवेल स्थानकात जाणाऱ्या उन्नती पुलाखाली नेहमी होणारी वाहतूक कोंडी. (छाया : राजेश डांगळे )

# चारधाम दर्शनासाठी नोंदणी अनिवार्य

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्ह्यातील चारधाम यात्रेसाठी जाण्यासाठी इच्छुक असणाऱ्यांनी नाव नोंदणी करावी तसेच आरोग्यविषयक मार्गदर्शक सूचनांचे पालन करावे असे आवाहन जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी केले आहे.

सदर सूचनांचे पालन न करता नोंदणी न करणाऱ्यांना चारधाम यात्रेपासून वंचित राहावे लागेल असे स्पष्ट संकेत जिल्हा प्रशासनाने दिले आहेत.उत्तराखंडमध्ये पवित्र चारधामला भेट देणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. उत्तराखंड शासनाने या काळात होणाऱ्या गर्दी व्यवस्थापनसाठी कोणत्याही प्रकारची व्हिआयपी दर्शन सुविधा देण्यात येणार नसल्याचे एका पत्राद्वारे सर्व राज्यांना कळविले आहे.

चारधाम यात्रेतील दर्शनाची प्रक्रिया सुसंगत करण्यासाठी, उत्तराखंड सरकारने चारधाम यात्रेसाठी नोंदणीची प्रक्रिया सुरू केली आहे. सर्वासाठी नोंदणी अनिवार्य आहे. तरी सर्व भक्तांनी



चारधामयात्रा २०२४च्यानोंदणीसाठी https://registrationandtouristcare.uk.gov.in/ या संकेतस्थळावर भेट द्यावी. नोंदणी केलेल्या यात्रेकरूनाच दर्शनासाठी परवानगी देण्यात येईल. तसेच वरिष्ठ नागरिकांनी चारधाम यात्रे पूर्वी वैद्यकीय तपासणी करून घेणे आवश्यक आहे. तसेच आरोग्य विभागाच्या मार्गदर्शिक सुचनाचे सर्वांनी पालन करावे असे आवाहन उत्तराखंड शासनाने केले आहे. उत्तराखंड शासनाने केलेल्या आवाहनानुसार रायगड जिल्ह्यातील चारधाम यात्रेसाठी जाण्यासाठी इच्छुक असणाऱ्यांनी नाव नोंदणी करावी तसेच आरोग्यविषयक मार्गदर्शक सूचनाचे पालन करावे असे आवाहन जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी केले आहे.

# महागाईमुळे शेतकरी हवालदिल

**। रायगड । प्रतिनिधी ।**

सध्या शेतीसाठी बाजारात उपलब्ध असलेली खते, अवजारे, बी-बियाणे, कीटकनाशक औषधे आणि अत्याधुनिक इलेक्ट्रॉनिक वस्तू यांचे दर वाढलेले आहेत. त्यामुळे खरीप हंगामात शेती कशी करायची? या विचाराने शेतकरी चिंताग्रस्त झाला आहे. मात्र, तरी शेतकरी खत, बियाणे व साहित्य खरेदीसाठी बाजारात गर्दी करत आहेत.

दरवर्षी ओला-सुका दुष्काळ, वणवा आणि वादळ-वारे या नैसर्गिक संकटांचा सामना करणाऱ्या शेतकऱ्यांसमोर या वर्षी शेतीच्या साहित्याचे दरवाढीचे नवे संकट उभे ठाकले आहे. खरीप हंगामात रायगड जिल्ह्यात शेतकरी भात या



एकमेव पिकाची शेती करतो.

निव्वळ पावसाच्या पाण्यावर अवलंबून असलेल्या भातशेतीसाठी मजूर खर्च वाढलेले असतानाच, ट्रॅक्टरसाठी लागणाऱ्या डिझेलचे दरही वाढत आहेत. यावर्षी खते, बियाणे, औषधांचे दर १० ते १५ टक्क्यांनी वाढल्याने शेतकरी हवालदिल झाला आहे. नैसर्गिक विविध संकटांचा सामना करणाऱ्या शेतकऱ्यांना हातातोंडाशी आलेल्या पिकांचे अनेक वेळा नुकसान झाले आहे.

या नुकसानीची भरपाई मिळणे दुरापास्त झालेली असतानाच, शेतीसंबंधित साहित्य आणि खतांच्या भाववाढीने शेतकरी कोलमडून गेला आहे. सततच्या महागाईने येथील भातउत्पादक शेतकरी त्रस्त झाला असून फळ, फुल लागवडीकडे वळताना दिसत आहे.

भातउत्पादक शेतकरी नवनवे प्रयोग करून भाताचे अधिक उत्पन्न मिळवण्याचा प्रयत्न करत आहे. मजुरी खर्च कमी करण्यासाठी यांत्रिकी पद्धतीने शेती करणे, अधिक उत्पादन देणाऱ्या वाणांची निवड करणे, पारंपरिक भातशेतीतील काही बाबींकडे दुर्लक्ष करून नवीन अवजारांचा उपयोग करताना दिसून येत आहे.

# दिक्षा बोरकर गुणवत्ता यादीत

**म्हसळा :** नॅशनल इलीजीबिलिटी कम एंट्रन्स टेस्ट (युजी ) २०२४ मध्ये म्हसळ्याची दिक्षा नितीन बोरकर हिने ७२० गुणांपैकी ६१२ गुण मिळवून गुणवत्ता यादीत चमकण्याचा मान पटकवला. लहानपणापासून शिक्षणाची आवड असणाऱ्या दिक्षा बोरकर हिने दहावी आणि बारावी परीक्षेतही प्रथम येण्याचा मान मिळविला. म्हसळ्यासारख्या ग्रामीण भागात कोणत्याही प्रकारच्या नीट अथवा अन्य कोणत्याही स्पर्धा परीक्षाच्या क्लासेसची सोय नसतानाही आई -वडील आणि भाऊ यांचे मार्गदर्शन घेऊन फार मोठे यश संपादन केल्या बद्दल तिचे संपूर्ण जिल्ह्यातून कौतुक होत आहे.

# आंग्रे समाधीस्थळ सुशोभीकरण रखडले

### पुरातत्त्व विभागाच्या प्रश्नांचा खोडा

**। रायगड । प्रतिनिधी ।**

स्वराज्यातील आरमाराचे प्रमुख सरखेल कान्होजी आंग्रे यांचे अलिबागशहरात समाधीस्थळ आहे. आंग्रे यांच्या समाधीस्थळ परिसराचे सुशोभीकरण काम अलिबाग नगर परिषदेच्या माध्यमातून सुरू होते. या कामाबाबत पुरातत्त्व विभागाने काही प्रश्न उपस्थित केल्यामुळे हे काम थांबवले आहे. अडीच महिन्यांपासून पुरातत्त्व विभागाच्या हस्तक्षेपामुळे हे काम ठप्प आहे.

२१जानेवारीलामाजीनगराध्यक्ष प्रशांत नाईक, आंग्रे घराण्याचे वंशज रघुजीराजे आंग्रे यांच्या उपस्थितीत आंग्रे यांच्या समाधीस्थळ परिसर सुशोभीकरणाच्या कामाचा शुभारंभ केला होता. संरक्षक भिंत आणि आरमारी नौकेची प्रतिकृती उभारणीचे काम हाती घेतले होते. प्रादेशिक पर्यटन योजनेतून दोन कोटी सुशोभीकरण कामासाठी मंजूर झाले आहेत. अजून तीन कोटी निधीची गरज असून, पाच कोटी रुपये खर्च होणार आहे.

पर्यटनाच्या दृष्टीने आंग्रे समाधी स्थळ दुर्लक्षितअलिबाग हा पर्यटनासाठी उत्तम तालुका आहे. मात्र, अलिबागमध्ये येणारे बहुतांश पर्यटक हे समुद्र पर्यटन करून माघारी फिरतात. मात्र सरखेल कान्होजी आंग्रे यांच्या समाधी स्थळाला भेट देत नाहीत. त्यामुळे पर्यटनाच्या दृष्टीने हे स्थळ दुर्लक्षित राहिले आहे.

आंग्रे समाधी स्थळालाही पर्यटकांनी आवर्जून भेट द्यावी, यासाठी परिसराचे सुशोभीकरणाचे काम सुरू केले आहे. मात्र, त्याला पुरातत्व विभागाने खोडा घातला आहे. ही कामे होती सुरू समाधीस्थळ उद्यानाच्या प्रवेशद्वारावर भव्य गलबताच्या प्रतिकृतीची उभारणी करणे, किल्ल्यांच्या प्रतिकृती उभारणे, दीपमाळांची उभारणी करणे, कान्होजी राजे आंग्रे याचा जीवनपट तयार करणे यासाठी लागणारी आवश्यक बांधकामे ही कामे या योजनेअंतर्गत केली जाणार आहेत. जानेवारीत या कामाला सुरुवात केली होती. त्यासाठी आवश्यक निविदा प्रक्रिया, तांत्रिक मान्यताही प्राप्त झाल्या. त्यामुळे काम पूर्ण झाल्यानंतर आंग्रे समाधी स्थळाकडे पर्यटकही आकर्षित होतील. मात्र पुरातत्व विभागाने काही प्रश्न उपस्थित केल्याने हे काम थांबविले आहे.

सरखेल कान्होजी आंग्रे समाधी स्थळाचे सुशोभीकरण काम सुरू झाले होते. पुरातत्व विभागाने काही कामांच्या बाबतीत शंका उपस्थित केल्या आहेत. त्यामुळे काम थांबले आहे. पुरातत्व विभागाच्या शंकाचे निरसन केले जात आहे. लवकरच काम पुन्हा सुरू होईल, असे मुख्याधिकारी अंगाई साळुंखे यांनी सांगितले.

# सिडको अग्निशमन विभागाच्या ताफ्यात दोन अत्याधुनिक वाहने दाखल

**। पनवेल । वार्ताहर ।**

सिडको अग्निशमन विभागाच्या ताफ्यात दोन अत्याधुनिक वाहने दाखल झाली आहेत.

सिडको अग्निशमन विभागाची खारघर, उलवे, द्रोणागिरी, कळंबोली व नवीन पनवेल अशी पाच अग्निशमन केंद्रे कार्यान्वित असून, नागरिकांना २४ तास सेवा पुरवित आहेत. सिडको महामंडळाच्या परिक्षेत्रात उंच इमारती आहेत. त्याकरीता सिडको महामंडळाने हे वाहन व अरुंद ठिकाणी आग लागल्यास किंवा रस्ता अपघात झाल्यास विमोचनाकरीता अशी दोन वाहने सिडको महामंडळाने खरेदी केली असून ३० मे पासून या दोन्ही वाहनांचे लोकर्पण मुख्य दक्षता अधिकारी, यांच्या हस्ते करण्यात आले.



# भूजल मत्स्यशेतीमुळे नीलक्रांती यशस्वी

## पावसाळ्यात मागणीत वाढ; शेततळी, माशांमुळे रोजगाराच्या संधी

**। रायगड । प्रतिनिधी**

पावसाळा सुरू झाल्यावर खोल समुद्रातील मासेमारी बंद होते. कोकणातील मत्स्य खवय्यांना या काळातही मासे उपलब्ध व्हावेत, यासाठी रायगड जिल्ह्यात मत्स्यशेतीला प्रोत्साहन देण्यात येत आहे. सर्वच हंगामात बाजारात विविध प्रकारच्या माशांना चांगली मागणी आहे, हे ओळखून रायगडमधील अनेक शेतकऱ्यांनी भूजल मत्स्य व्यवसायात मोडणारी शेततळी, गोड्या पाण्यातील मत्स्यशेती सारखे प्रयोग यशस्वीपणे राबवले आहेत. हरितक्रांती, श्वेतक्रांतीनंतर आता नीलक्रांतीचे धोरण जाहीर करण्यास एकविसाव्या शतकाची वाट पहावी लागली. आता ही नीलक्रांती यशस्वी होत असल्याचे दिसून येत आहे.

मत्स्यव्यवसाय विभागाच्या माध्यमातून शीतगृह, वातानुकूलित वाहन



खरेदीवर येथील मच्छिमार भर देत आहेत. विविध प्रकारच्या मत्स्य उत्पादन आणि त्यासंदर्भातील उद्योगांमध्ये स्वतःला गुंतवून स्थानिक तरुणांनी ही नीलक्रांती घडवून आणली.२०१५ पासून झालेले हे बदल रायगड जिल्ह्यात प्रकर्षाने दिसून येत असून नीलक्रांतीने आता जोर धरला आहे. यासाठी सर्वप्रथम रायगड जिल्ह्यातील औद्योगिक धोरणात बदल करून २०१० पासून प्रदूषणकारी रासायनिक कारखान्यांना मनाई करण्यात आली. जे रासायनिक कारखाने अस्तित्वात आहेत, त्यांना सांडपाण्याच्या शुद्धीकरणासाठी प्लांट उभारणीची सक्ती करण्यात आली.

या कारखान्यांना शुद्धीकरणानंतरच कारखान्यातील सांडपाणी नद्या, समुद्रात सोडता येते. यामुळे पाताळगंगा, कुंडलिका, सावित्री नदीतील मत्स्यसंपदेचे जतन करण्यास सहकार्य झाले. नदीकिनारी हजारो कुटुंबांचा मासेमारी हाच प्रमुख व्यवसाय आहे. त्याचबरोबर पारंपरिक शेती व्यवसाय करणाऱ्या शेतकऱ्यांनी शासकीय अनुदानातून शेततळी, गोड्या पाण्यातील मत्स्यशेतीसारखे प्रयोग यशस्वी केल्याने बारमाही मत्स्य उत्पादन करणारा जिल्हा म्हणून रायगडची ओळख निर्माण होत आहे.

> रायगड जिल्ह्यात मत्स्यशेतीला भरपूर वाव आहे. येथे मुंबईसारखी मोठी बाजारपेठ आहे. पावसाळ्यात खोल समुद्रातील मासेमारी बंद असते, अशा वेळी मत्स्य शेतीला चांगले दिवस आले आहेत. गोड्या आणि नीमखाऱ्या पाण्यातील माशांना चांगली किंमत मिळत असल्याचे ओळखून पंतप्रधान मत्स्य संपदा योजनेत शीतगृह, वाहतुकीसाठी वाहने, यासह व्यवसायाची गुणवत्ता वाढविण्यासाठी अनेक उपक्रम सुरू करण्यात आले आहेत.
>
> – संजय पाटील, मत्स्यव्यवसाय उपायुक्त रायगड.

> वाढती लोकसंख्या, सागरी मासेमारीच्या अस्थिरतेमुळे भूजल मत्स्यपालन करणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. त्यामुळे अल्पभूधारक आणि नद्यांमध्ये मासेमारी करणाऱ्या आदिवासी, पारंपरिक मच्छीमारांना दिलासा मिळाला आहे. खारभूमीमध्ये मत्स्यपालनास पोषक वातावरण असल्याने सरकारने येथे कारखाने न आणता रोजगाराला प्रोत्साहन देण्यासाठी भूजल मत्स्यशेतीला अनुदान द्यावे.
>
> – राजन भगत, जिल्हा समन्वयक, श्रमिक मुक्ती दल.

# जय महाराष्ट्र

उत्तर प्रदेशाने भारतीय जनता पक्षाची मस्ती पुरती उतरवून टाकली. जो राम को लाये है हम उनको लायेंगे अशी भाजपची घोषणा होती. त्यावर साक्षात श्रीरामाला अयोध्येत आणणारे तुम्ही कोण असा सवाल जनतेने केला. खुद्द अयोध्येतला भाजपला खासदारही दणदणीत आपटला. भाजपच्या तब्बल २९ जागा घटल्या आणि समाजवादी पक्षाला भाजपहूनही अधिक म्हणजे ३७ जागा मिळाल्या. उत्तर प्रदेशातील हा पराक्रम अनपेक्षित होता. इकडे महाराष्ट्रानेही तसाच पराक्रम करून दाखवला. तो मात्र पूर्णपणे अपेक्षित होता. तुटलेले पक्ष, सतत इडीच्या धमक्या, सोडून गेलेले कार्यकर्ते, नसलेले पैसे, न्यायालयातले आणि निवडणूक आयोगातले विरोधात गेलेले निर्णय, काढून घेतलेले नाव व पक्षचिन्ह अशा अवस्थेत उद्धव ठाकरे यांची सेना व शरद पवार यांची राष्ट्रवादी लढत होते. बलाढ्य मोंगलांविरुध्द निव्वळ धैर्य, शौर्य व चिकाटी यांच्या बळावर लढा देणाऱ्या संताजी-धनाजींची आठवण यावी अशी ही स्थिती होती. या दोहोंना शेतकरी कामगार पक्ष, कम्युनिस्ट, समाजवादी अशा अन्य पक्षांनी साथ दिली. पण खरी लढाई लढली ती महाराष्ट्रातील जनता. ज्या रीतीने गेल्या दोन वर्षांमध्ये भाजपच्या मोदी व शाह या गुजराती दुकलीने राज्यात व इतरत्र हैदोस घातला त्यामुळे लोकांमध्ये संताप खदखदत होता. पण तो व्यक्त करायला संधी मिळत नव्हती. उद्धव यांनी युती तोडल्याने खरे तर लोकांची सहानुभूती आम्हालाच मिळायला हवी अशी जणू दरडावल्याप्रमाणे सांगितले जात होते. ठाकरे आणि पवार यांचे पक्ष हे नकली असल्याचे खुद्द पंतप्रधान म्हणत होते. पण लोकांना ते पक्षच खरे व अस्सल वाटत होते. पण भाजपच्या नेत्यांचा माज इतका वाढला होता की त्यांना ही जनभावना दिसेनाशी झाली होती. मराठी जनतेने या सर्वांना एका झटक्यात जमिनीवर आणले आहे.

## मुंबईत ठाकरेच

मोदींच्या महाराष्ट्रात १९ सभा घेण्यात आल्या. मुंबईत रोड शो करण्यात आला. यापैकी ९० टक्के ठिकाणी भाजपचा सुपडा साफ झाला आहे. मोदींबद्दलचे मूर्ख आकर्षण हिंदी पट्ट्यातील वा गुजराती जनतेला असेल. फडणवीस आणि बावनकुळे मोदी यांना विश्वगुरु मानत असले तरी मराठी जनता तसे मानत नाही. त्याचा जोरदार प्रत्यय भाजपला यंदा आला. भाजपने गेल्या वेळी २४ जागा जिंकल्या होत्या. यंदा त्या नऊवर खाली आल्या. चौदा जागा पडल्या. ठाकरे यांच्या शिवसेनेलाही तेवढ्याच म्हणजे नऊ जागा मिळाल्या. याच ठाकरे यांना पाच जागा मिळाल्या तरी मी संन्यास घेईन वगैरे भाषा आशिष शेलारांसारख्या नेत्यांनी केली होती. ठाकरे म्हणजे निव्वळ घरात बसणारे आणि पैशांसाठी राजकारण करणारे नेते असल्याची टीका मुख्यमंत्री व भाजपवाले करीत होते. ठाकरे यांच्या यशाने त्यांचे तोंड फुटले असेल. एकनाथ शिंदे यांना सात जागा मिळाल्या आहेत हे खरे. मात्र त्यातील हातकणंगले, औरंगाबाद व बुलढाणा या तीन जागा मतांचे विभाजन झाल्याने ठाकरे यांनी गमावल्या आहेत. मावळमध्ये श्रीरंग बारणे यांना अजितदादांची मदत अधिक कामी आली. कल्याण व ठाणे या दोनच जागी त्यांना खऱ्या अर्थाने विजय मिळाला. वायव्य मुंबईत ४८ मतांनी जिंकलेले रवींद्र वायकर हे जेलच्या भीतीने शिंदे गटात आले आहेत हे खुद्द त्यांनीच निवडणूक काळात सांगितले होते. थोडक्यात ज्या उद्धव यांना संपवण्याची भाषा भाजप व शिंदे गटवाले करीत होते ते सपशेल उताणे पडले आहेत. धनुष्यबाण हे चिन्ह गमावल्याचा ठाकरे यांना बऱ्यापैकी फटका बसला असण्याची शक्यता आहे. मात्र मुंबईत ठाकरे यांनी तीन जागा जिंकून, व त्यातही दक्षिण-मध्य अर्थात दादरवर नियंत्रण मिळवून, खरी शिवसेना कोणाची आहे हे दाखवून दिले आहे.

## पवार नावाचा वटवृक्ष

दुसरीकडे ज्या काँग्रेसला संपवण्यासाठी मोदी आणि तमाम भाजपवाले जंग जंग पछाडत आहेत तिने जबरदस्त भरारी घेतली व ती एकवरून एकदम तेरावर गेली. आज राज्यात सर्वाधिक खासदार काँग्रेसकडे आहेत. सांगलीतील अपक्ष विशाल पाटील यांना गृहित धरले तर तो आकडा चौदा होतो. विदर्भ हा एकेकाळी काँग्रेसचा बालेकिल्ला होता. तो तिच्याकडे पुन्हा परतला आहे. राहुल गांधी यांच्या भारत जोडो यात्रेमुळे जे एक चैतन्य निर्माण झाले त्याचा काँग्रेसला मोठा फायदा झाला. या देशात भाजपला पर्याय देण्याचा प्रश्न आला तर लोक काँग्रेसचाच विचार करतील हे कालच्या निकालांवरून स्पष्ट झाले. सरतेशेवटी शरद पवार यांना सलाम करायला हवा. वयाच्या ८४ व्या वर्षी, पुतण्यासह अनेक जिव्हाळ्याचे साथीदार सोडून गेलेले असताना आणि बारामती या बालेकिल्ल्यावरच हल्ला झालेला असताना त्यांनी भाजपला मराठी मातीत गाडण्याची जी जिद्द जागवली आणि दाखवली ती अद्भुत आहे. पुणे व सोलापुरात अजित पवार, विदर्भात देवेंद्र फडणवीस, नगरमध्ये विखे असे अनेक हिशेबही त्यांनी जाता जाता चुकते केले. पवार यांनी राष्ट्रवादीला तर नवसंजीवनी दिलीच, पण महाविकास आघाडीलाही एकत्र बांधून लढण्याची प्रेरणा देण्यात मोठी कामगिरी बजावली. महाराष्ट्रातील जनता त्याबद्दल त्यांना कायम स्मरणात ठेवेल. प्रतिकूल परिस्थितीत कसे झुंजावे याचा एक आदर्शच त्यांनी महाराष्ट्रातील सर्व पक्षातील कार्यकर्त्यांसाठी घालून दिला आहे. दरम्यान, विरोधक म्हणजे शत्रू नसतात आणि जनतेला, त्यातही मराठी जनतेला कधीही गृहित धरता येणार नाही हे दोन धडे या निमित्ताने भाजपवाले शिकले तरी खूप साध्य होईल. आम्हाला शरद पवार यांचे राजकारण संपवायचे आहे असे उद्गार भाजपचे चंद्रकांत पाटील यांनी काढले होते. प्रत्येक भाजपवाला त्याच गुर्मीत बोलू लागला होता. राज्यातले शेतकरी, बेरोजगार यांचे प्रश्न सोडवण्याकडे यांनी दुर्लक्ष केले व अयोध्येतला राम आणि मोदी आपल्याला तारून नेतील असा त्यांचा समज होता. मराठा आरक्षणाच्या प्रश्नात डबल गेम खेळण्याचा त्यांनी प्रयत्न केला. या सर्वांचा परिणाम आज समोर आहे.

**विचार**

# शाक्त राज्याभिषेक हाच खरा शिवराज्याभिषेक

***शिवाजी महाराजांच्या राज्याला विरोध करणाऱ्या विरोधकांचा विरोध मोडून काढण्यासाठी व आपण कोणाचेही मांडलीक नाही तर आपण सामाजिक व धार्मिकबाबतीत निर्णय घेण्याचा अधिकार असलेले लोककल्याणकारी, न्यायाने चालणारे, शोषणमुक्त, भयमुक्त असे रयतेचे राज्य 'स्वराज्य' स्थापन करणारे स्वतंत्र 'राजे' आहोत, हे तत्कालीन सर्व सत्ताधीशांना दाखविण्यासाठी आणि स्वतंत्र राज्याचा 'राजा' अशी राजकीय सत्ताधीशांची राजमान्यता, रयतेकडून 'राजा' म्हणून लोकमान्यता मिळावी यासाठी छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वत:चा राज्याभिषेक करून घेतला.***

**सुधाकर लाड**



बहुजनप्रतिपालक छत्रपती शिवाजी महाराजांनी ६ जून, १६७४ला गागाभट्टांकडून वैदिक राज्याभिषेक करून घेतला. त्यानंतर अश्विन शुक्ल ललीता पंचमी २४ सप्टेंबर, १६७४ ला निश्चलपुरी गोसावी यांच्याकडून दुसरा शाक्त, म्हणजेच अवैदिक राज्याभिषेक करून घेतला. व्यवहारात आपण पाहतो, एखादा केलेला पहिला करार रद्द करायचा असेल किंवा त्या करारात काही बदल करायचा असेल, तर आपण दुसरा करार करतो. दुसरा करार ज्यावेळी आपण करतो, त्यावेळी पहिला करार आपोआपच रद्द होतो. आपण केलेल्या पहिल्या कराराला काहीही महत्त्व राहात नाही. याच अर्थाने, छत्रपती शिवाजी महाराजांनी केलेला पहिला वैदिक राज्याभिषेक रद्द करण्यासाठी तो नाकारण्यासाठी दुसरा शाक्त राज्याभिषेक केला.

'शाक्त शिवराज्याभिषेक समारोह संस्था, रायगड' गेली सात वर्षे शाक्त शिवराज्याभिषेक समारोह किल्ले रायगडावर साजरा करतेय. यंदा या संस्थेचे आठवे वर्ष आहे. आठ आकड्याला शिवकाळात एक वेगळेच महत्त्व होते. छत्रपती शिवाजी महाराजांनी आपले अष्टप्रधान नेमले. छत्रपती शिवाजी महाराजांची राजमुद्रा अष्टकोनी होती. 'शिवराई' व 'होन' ही नाणीही अष्टकोनी होती. छत्रपती शिवाजी महाराजांची समाधीही अष्टकोनी आहे.

'शाक्त शिवराज्याभिषेक समारोह संस्था, रायगड' ही संस्था दरवर्षी शाक्त शिवराज्याभिषेक दिनानिमित्त किल्ले रायगडावर इतिहास संशोधकांना, अभ्यासकांना आमंत्रित करते. आणि, 'शाक्त शिवराज्याभिषेक' या विषयावर व्याख्यानांचे आयोजन करते. या कार्यक्रमाच्या आयोजनामुळे शाक्त शिवराज्याभिषेकावर विचारमंथन होते. छत्रपती शिवाजी महाराजांचा खरा इतिहास महाराष्ट्रातील लोकांसमोर यावा हा एक प्रामाणिक हेतू शाक्त शिवराज्याभिषेक समारोहाचे आयोजन करण्यामागे आहे.

शाक्त शिवराज्याभिषेक म्हणजे काय? छत्रपती शिवाजी महाराजांनी पहिला वैदिक राज्याभिषेक केल्यानंतर दुसरा शाक्त राज्याभिषेक का केला, असे प्रश्न निर्माण होतात. या प्रश्नांची उत्तरे शोधण्याचा या लेखाच्या माध्यमातून केलेला एक प्रयत्न...

छत्रपती शिवाजी महाराजांनी इ.स १६४२ साली रोहिडेश्वर किल्ला घेऊन स्वतंत्र राज्य 'स्वराज्य' निर्मितीच्या ध्येयाला स्वत:ला वाहून घेतले होते. अहमदनगरची निझामशाही, विजापूरची आदिलशाही, बिंदरची बरीदशाही, गोवळकोंड्याची कुतुबशाही, वऱ्हाडातील इमादशाही या पादशाह्यांशी आणि गोव्यातील पोर्तुगीज, जंजिऱ्याचा सिद्धी, दिल्लीच्या मोगल बादशहाशी लढाया करून, संघर्ष करून छत्रपतींनी स्वतंत्र राज्य 'स्वराज्य' निर्माण केले.

शिवाजी महाराजांच्या राज्याला विरोध करणाऱ्या विरोधकांचा विरोध मोडून काढण्यासाठी व आपण कोणाचेही मांडलीक नाही तर आपण सामाजिक व धार्मिकबाबतीत निर्णय घेण्याचा अधिकार असलेले लोककल्याणकारी, न्यायाने चालणारे, शोषणमुक्त, भयमुक्त असे रयतेचे राज्य 'स्वराज्य' स्थापन करणारे स्वतंत्र 'राजे' आहोत, हे तत्कालीन सर्व सत्ताधीशांना दाखविण्यासाठी आणि स्वतंत्र राज्याचा 'राजा' अशी राजकीय सत्ताधीशांची राजमान्यता, रयतेकडून 'राजा' म्हणून लोकमान्यता मिळावी यासाठी छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वत:चा राज्याभिषेक करून घेतला. छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाला सर्वप्रथम मुख्य प्रधान मोरोपंत त्रिंबक पिंगळे याने विरोध केला. महाराष्ट्रातील सर्व ब्राह्मणांनी राज्याभिषेक करण्यास नकार देऊन छत्रपतींच्या राज्याभिषेकाला विरोध केला होता, हे जगजाहीर आहे. या विरोधाचे कारण सांगताना महाराष्ट्रातील एक विचारवंत कॉम्रेड गोविंद पानसरे सांगतात...

'महाराष्ट्रातल्या ब्राह्मणांनी शिवाजी महाराजांना राज्याभिषेक करण्यास विरोध केला, हे सत्य सर्वांना माहीतच आहे. चार्तुवर्ण्याच्या रचनेप्रमाणे व हिंदू धर्मशास्त्राप्रमाणे राजा होण्याचा अधिकार फक्त ब्राह्मणांना आणि क्षत्रियांनाच होता. शिवाजी शूर असला व त्याने राज्य कमवले असले, तरी तो राजा होण्यास पात्र नाही, असे धर्ममत होते. काहींना त्याच्या क्षत्रियत्वाची शंका होती आणि उरलेल्यांना तो मुळात क्षत्रिय कुळातला असला तरी संस्कारक्षय झाल्याने क्षत्रिय राहिला नव्हता. शिवाजीची मुंज झाली नव्हती. मंत्रविधीसह लग्न लागले नव्हते. मग शिवाजी राजा कसा होऊ शकणार? असे वाटत होते.' छत्रपती शिवाजी महाराजांना राज्याभिषेक करण्यास महाराष्ट्रातील ब्राह्मण तयार होईनात म्हणून छत्रपती शिवाजी महाराजांनी नांदेडमधील घराणे असलेल्या मूळचा महाराष्ट्रातील, पण पौरोहित्याचे काम करण्यासाठी काशी येथे स्थायिक झालेल्या गागाभट्टाला राज्याभिषेक करून घेण्यासाठी बोलावले. (छत्रपती शिवाजी महाराजांनी गागाभट्टाला आणायला कुणालाही पाठविले नाही, तो स्वत: छत्रपतींची कीर्ती ऐकून महाराष्ट्रात आला व त्याने राज्याभिषेकाचा प्रस्ताव छत्रपती शिवाजी महाराजांसमोर मांडला, असा चित्रगुप्त व सभासद बखरीत उल्लेख आहे.) छत्रपती शिवाजी महाराजांना राज्याभिषेक करण्यासाठी आपले कुळ रजपूत घराण्याशी संबंधित असल्याचा दावा करावा लागला. सिसोदिया या रजपूत घराण्याच्या वंशावळीचा पुरावा दिल्यानंतर गागाभट्टाला छत्रपती शिवाजी महाराजांनी पुष्कळ सोन्याच्या मोहरा दक्षिणा म्हणून दिल्या. तेव्हा गागाभट्टाने तो पुरावा मान्य केला आणि छत्रपती शिवाजी राजांना 'क्षत्रिय' म्हणून गागाभट्टाने घोषित केले व गागाभट्ट राज्याभिषेक करण्यास तयार झाला.

शिवाजी महाराजांनी राज्याभिषेक कोणत्या पद्धतीने करायचा याची रुपरेषा ठरविण्यासाठी गागाभट्टाला 'राज्याभिषेक प्रयोग' हा ग्रंथ लिहायला लावला व वैदिक पद्धतीने राज्याभिषेक करायचे ठरवले. परंतु, शिवाजी महाराजांनी वैदिक व मोंगली म्लेंच्छ (मुस्लिम) पद्धती अशा मिश्र पद्धतीने आपला राज्याभिषेक करून घेतला, असे किल्ले रायगडावर राज्याभिषेकाप्रसंगी उपस्थित असलेले इंग्रज वकील हेन्री ऑक्झेंडनच्या डायरीवरून दिसते. अनेक विघ्नांतून पार पडलेल्या व प्रचंड किंमत मोजूनही या राज्याभिषेकाप्रसंगी छत्रपती शिवाजी महाराजांवर गागाभट्टाने क्षत्रियांसाठीचे जे संस्कार करायचे होते ते केले नाहीत. वेदमंत्र म्हटले नाहीत, असे काही इतिहासकारांनी लिहिले आहे. ४५ वर्षे वयाच्या शिवाजी महाराजांनी या राज्याभिषेकासाठी व संभाजी महाराजांच्या युवराज्याभिषेकासाठी १ कोटी ४२ लक्ष होन खर्च केले. शिवराज्याभिषेक ही एक मध्ययुगीन भारताच्या राजकारणाला व समाजकारणाला कलाटणी देणारी ऐतिहासिक घटना होती. कित्येक शतकात भारतात असा राज्याभिषेक झाला नव्हता. या राज्याभिषेकाच्या निमित्ताने गागाभट्ट व इतर पुरोहितांनी शिवाजी महाराजांना लुटले. सुरतेच्या लुटीपेक्षा ही लूट मोठी होती. ६ जून रोजी गागाभट्टाने केलेल्या राज्याभिषेकाचा दिवस शुभ नव्हता व म्हणून गागाभट्टाच्या विरोधात असलेल्या लोकांच्या सांगण्यावरून छत्रपती शिवाजी महाराजांनी दुसरा शाक्त राज्याभिषेक केला, असे काही इतिहासकारांनी लिहिले आहे. पण, या इतिहासकारांचे हे म्हणणे चुकीचे आहे.

'शुभाशुभ नाही हर्षामर्ष अंगी जनार्दन जगी होऊनि ठेला।' या संत तुकाराम महाराजांच्या अभंगातील विचाराप्रमाणे शिवाजी महाराजांचे वागणे होते. शिवाजी महाराजांचे 'स्वराज्य' स्थापण्याचे कार्य, ध्येय-धोरण असामान्य होते. आणि, स्वकर्तृत्वावर विश्वास ठेवून सकारात्मक मानसिकता असणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराजांना सर्व वेळ शुभच होती. शिवाजी महाराज शुभ-अशुभ दिवस मानणारे असते तर त्यांनी आपल्या शत्रूंवर अमावस्येच्या दिवशी स्वाऱ्या केल्या नसत्या. गागाभट्टाने केलेला वैदिक राज्याभिषेक नाकारण्यासाठी व बहुजन समाजाचा अनुनय करण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराजांनी मूलनिवासी तंत्रविद्यानिपुण शाक्त निश्चलपुरी गोसावी यांच्याकडून अश्विन शुक्ल ललिता पंचमी २४ सप्टेंबर १६७४ रोजी तांत्रिक विधीने दुसरा शाक्त राज्याभिषेक करून घेतला.

निश्चलपुरी गोसावी यांनी छत्रपती शिवाजी महाराजांवर कुंभ लग्नावर, आयुष्यमान योग असताना, अनुराधा नक्षत्र, बुधवार, शु. ५ आनंद संवत्सर, शके १५९६ या दिवशी शाक्त राज्याभिषेक केला. एका रत्नखचित उच्च आसनावर निश्चलने रौप्य आसन ठेवले व त्यावर शिवाजी राजांस बसवून राज्याभिषेकाचे कार्य केले. या आसनाभोवती असलेल्या अष्ट कलशांवर चंद्रकिरणांच्या धारा ओघळत होत्या. शाक्त राज्याभिषेक संध्याकाळी सुरू झाला. शिवाजी महाराजांच्या मस्तकावर अभिषेकाचे जलसिंचन झाल्यावर हा शाक्त राज्याभिषेक मध्यरात्री संपला. छत्रपती राजाराम यांच्या काळात गोविंद नारायण बर्वे यांनी लिहिलेल्या 'श्रीशिवराज्याभिषेक कल्पतरू' या नावाच्या संस्कृत ग्रंथात शिवाजी महाराजांच्या पहिल्या वैदिक व दुसऱ्या शाक्त राज्याभिषेकाची माहिती आहे. शिवकालीन कवी परमानंदांनी लिहिलेल्या 'अनुपुराण' या संस्कृत ग्रंथात वैदिक व दुसऱ्या शाक्त राज्याभिषेकाची माहिती आहे. महाराष्ट्रातील ज्येष्ठ विचारवंत, लेखक डॉ. आ.ह. साळुंखे शिवराज्याभिषेकाबाबत 'प्रतिइतिहास' या चंद्रशेखर शिखरे यांच्या पुस्तकाच्या प्रस्तावनेत म्हणतात... 'छत्रपती शिवाजी महाराजांनी 'शाक्त' राज्याभिषेकाच्या विधीद्वारे एक प्रकारे आधीचा वैदिक पद्धतीचा राज्याभिषेक रद्द करून टाकला आहे. यानंतरच्या काळात अधिकृतपणे 'राजा' होण्यासाठी वैदिक पद्धतीने राज्याभिषेक करून घेण्याची गरज नाही, असा एक नवा नियम त्यांनी या कृतीद्वारे अस्तित्वात आणला.' (या लेखाचे लेखक शिवश्री सुधाकर लाड 'शाक्त शिवराज्याभिषेक समारोह संस्था, रायगडचे संस्थापक-अध्यक्ष आहेत.)

# युगपुरूष शिवबा

**बाळ सिंगासने**

महाराष्ट्र राज्याचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी राजे यांचा राज्याभिषेक सोहळा प्रतिवर्षी रायगडावर मोठ्या उत्साहाने साजरा होत आला आहे. छत्रपती शिवराय ही एक तेजस्वी शिवशक्ती आहे. विरोचित प्रेरणा आहे. शिरोदत्त चैतन्य आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक हा अखंड भारतातील आनंदोत्सव आहे. एक ऐतिहासिक क्रांतिकारी घटना म्हणून भारतीय जनतेच्या मनात त्यांच्याविषयी नम्र अशी आनंदाची भावना आहे. बलसंपन्न अशा भारतातील हिंदू अस्मितेचा एक अनमोल अविष्कार असंही या संदर्भात म्हणता येईल.

६ जून १६७४ महाराष्ट्राच्या मातीतील तो मंगल दिवस होता. कवीभूषण यांनी त्याप्रसंगी त्यांना 'हिंदुपती पातशहा' म्हणून गौरविले. मुघल साम्राज्याची त्यांनी असिम लढा दिला. त्यांचे सार्वभौमत्व शिवबानी कधीच मान्य केले नाही. हिंदुस्थानातील प्रत्येक हिंदूचा अभिमान, स्वाभिमान जागा केला. काशीहून आलेल्या गागाभट्टांनी धार्मिक सोहळ्याचे विधी कार्य पार पाडले. ज्येष्ठ शुद्ध त्रयोदशीचा अभूतपूर्व सोहळा तत्कालिन उपस्थित असलेल्या अनेक मातब्बर व्यक्तींच्या डोळ्यांचे पारणे फेडणारा. हृदयात कायम कोरलेला ठरला. या काळात छत्रपतींनी स्वतःच्या मस्तकावर छत्र धरून 'छत्रपती' असे नामकरण केले. स्वतःच्या नावाने सोन्याची नाणी पाडली. राज्याभिषेकाच्या दिवसापासून 'राज्याभिषेक शक सुरू केले. यामुळे तत्कालिन समाजात एक दिव्य विश्वास निर्माण झाला. प्रत्येकाच्या मनात आनंदाची कारंजी फुलली. एक ऐतिहासिक सोनेरी पहाट प्रत्येकाने अनुभवली. महाराष्ट्राच्या समृद्ध इतिहासाला पुढे हजारो वर्षे प्रेरणा देईल व हेच वैभव प्रत्येक मराठी मनाला आणि मनगटाला ताकद देईल असे अतुलनीय कार्य छत्रपतीने केले. जगाच्या इतिहासात याला तोड नाही हे खरेच!

औरंगजेबाची महत्त्वाकांक्षा अतिशय धार्मिक होती त्याला अखंड भारत इस्लामिक करावयाचे होते. त्यासाठी त्यांची हिंदूंची, सर्वसामान्य रयतेची श्रद्धामंदिरे तोडली. पूजास्थाने भ्रष्ट-नष्ट करण्याचा सपाटा लावला. मुर्त्या मातीत गाडल्या. मात्र अहंकाराने व आपल्या शक्तीचे प्रदर्शन घडविणाऱ्या औरंगजेबाला छत्रपतींनी जेरीस आणले. निष्ठावंत मूठभर मावळ्यांच्या सहकार्याने गनिमी तंत्राचा वापर करून आपल्या दूरदर्शी विचारांनी मुघल पातशहाच्या मनात भयकंप वातावरण निर्माण केले. परधर्मात गेलेल्या नेताजी पालकर व बयाजी निंबाळकरांसह असंख्यांना पुन्हा हिंदुधर्मात आणले व त्यांच्यासोबत जात-धर्म-भेद न मानता स्नेहभोजन केले. स्वधर्म आणि स्वराज्य या दोन शब्दांना खरा अर्थ कोणी जर दिला असेल तर तो फक्त शिवाजी आणि शिवाजी याच थोर नेत्यांनी. पुढे संभाजी राजे या शिवपूत्रांनी त्यांच्याही पुढे जाऊन धर्मासाठी स्वतःचे बलिदान समर्पित केले. दिल्लीवर भगवा फडकविल्याचे स्वप्न काही काळ अपूर्ण राहिले असले तरी यानंतर थोर मराठी यौद्धा, सरदार महादजी शिंदे यांनी दिल्लीवर भगवा फडकविलाच. शिवरायांचे स्वप्न त्यांनी पूर्ण केले. हीच आहे प्रेरणा, निष्ठा व न्याय. छत्रपती शिवाजी राजे केवळ महाराष्ट्राचेच नव्हे तर अखिल विश्वाचे आदर्श नेते आहेत.



असे अनेक इतिहास संशोधकांनी पुराव्यानिशी सिद्ध केलेले आहे. जर छत्रपती शिवाजी राजांची सत्य अशी ऐतिहासिक धैर्यशाली गाथा नसती तर आपल्या अंगणात आज तुळस दिसली नसती. मंदिराचे कळस दिसले नसते. अनेक मोठे वाडे उद्ध्वस्त झालेले पहावयास मिळाले असते. भारतीय आरमाराचे जनक म्हणून छत्रपतींचा गौरव करणे इष्ट ठरेल. परकीय जलचरांशी संघर्ष करताना त्यांनी अनेक जलदुर्ग उभारले. सागरी व्यापार सुरू केला. पोर्तुगीजांचा बंदोबस्त केला. फ्रेंचाशी व्यापार करताना सावधगिरी बाळगली. इंग्रजांनाही चपराक दिली. एकाचवेळी मुस्लिम इंग्रज पोर्तुगीज आदी शक्तींना सामोरे जाऊन त्यांची सागरी तटबंदी केली. कोकणच्या रयतेला भयापासून मुक्त केले. डोंगरी किल्ल्यांच्या माध्यमातून मोगलांना सळो की पळो केली. काही किल्ले लढाया जिंकून काबीज केले. खऱ्या अर्थाने रयतेच्या कल्याणकारी राजा या नात्याने आजही अखंड जगतात शिवाजी राजांचा उल्लेख केला जातो. पराक्रमाची शर्थ करणारा, जात धर्म पंथ यांना थारा न देता सर्व धर्मियांना आदर करणारा आणि आपल्या भगव्या ध्वजाचा मान सन्मान राखणारा शिवबा म्हणजे भारतीय मातीला पडलेले तेजस्वी स्वप्नच मानले तर ते अतिशयोक्तीचे ठरणार नाही.

मात्र आज याच महाराष्ट्राला मातीत दुर्दैवाने हिंदू या शब्दावरून वादविवाद घडवतात. छत्रपती शिवाजींच्या बद्दल अपमानास्पद उच्चार करणारे करंटे महाराष्ट्रात येऊन बदनामी करतात. आपला अभ्यास नसतानाही अकलेचे तारे तोडतात याबद्दल मनाला खंत वाटते. आम्हाला तर वाटतं आजच्या तरूण पिढीला शिवाजीराजे अभ्यासणे नितांत गरजेचे आहे.

## मराठी साहित्यिक दिनविशेष

**६ जून**

**१९००:-** 'भारतीय नाट्यशास्त्र' या मौलिक प्रबंधाच्या लेखिका गोदावरी वासुदेव केतकर यांचा जन्म. **१९०१:-** कांदबरीकार डॉ. रंगनाथ विनायक देशपांडे यांचा जन्म. पेशाने डॉक्टर. मानवी व्यक्तिमत्वाचा शोध आपल्या लेखनातून घेणाऱ्या देशपांड्यांनी 'आग्यामोहोळ' आणि ग्रामीण विश्व रेखाटणारी 'वेडी बाभळ' ही कादंबरी लिहिली. **१९०८:-** लेखक चिंतामण दत्तात्रेय आंबेकर यांचा जन्म. ह्यांची 'तमल्लिका' ही कादंबरी 'हिमवंती' ही कथा आणि 'वचनपूर्ती' व 'हिरवी नागीण' ही लघुकादंबरी प्रकाशित आणली आहे. **१९१३:-** लेखक, बालसाहित्यिक गोपाळ विनायक नामजोशी यांचा जन्म. 'गुंडू','छोटा सरदार', 'मामाच्या गावाला' ह्या कादंबरी सह 'बाळ चिलया' आणि 'सुधाराणी' ही बालनाटके आणि १०० हून अधिक गोष्टी विविध वृत्तपत्रातून प्रकाशित. **१९१४:-** समीक्षक महादेव नामदेव अदवंत यांचा जन्म. लघुकथाकार म्हणून कारकीर्द सुरु केलेल्या अदवंतांचे नाव झाले ते 'माणुसकीचा धर्म', 'मनाची मुशाफिरी' अशा लघुनिबंध संग्रहांमुळे. सहा शाहिरांचे 'पैंजण', 'विनायकांची कविता', 'दहा कथाकार' अशी संपादने त्यांनी केली. याशिवाय ग्रंथप्रासाद, 'बहुरुपी निबंध', 'लाडक्या लेकी भाग ४,५', 'सौंदर्यकुंज' हा कथासंग्रह आणि ज्ञानेश्वरी-चे काही अध्याय हे त्यांचे सहकार्याने केलेले संपादन साहित्य होय. **१९३३:-** तंत्रविद्या, यंत्र या विषयांवरील पुस्तकांचे लेखक शंकर गोपाळ भिडे यांचा जन्म. याविषयी १७ पुस्तके त्यांच्या नावावर आहेत. **१९४३:-** क्रिकेट, चित्रपट, अभिनेते, अभिनेत्री यांच्यावर लेखन करणारे लोकप्रिय लेखक शिरीष कणेकर यांचा जन्म. 'गाये चला जा' 'फिल्मबाजी', 'शिरीषान', 'यादों की बारात' अशी हिंदी चित्रपटासंबंधीच्या विविध पैलूंवर खुसखुशीत भाष्य करणारी त्यांची पुस्तके गाजली. तसेच क्रिकेट 'दशावतार' मिळून पन्नास एक पुस्तके त्यांच्या नावावर आहेत. क्रिकेट आणि सिनेमा या विषयावर ते एकपात्री कार्यक्रम सादर करीत असे. **१९४५:-** कथाकार आनंद विनायक जातेगावकर यांचा जन्म. 'मुखवटे', 'अस्वस्थ वर्तमान', 'ज्याचा त्याचा विठोबा' या कथासंग्रहाखेरीज महाभारतावर आधारित दोन पुस्तके त्यांच्या नावावर आहेत. 'कैफियत' ला राज्यशासनाचा पुरस्कार (२०११-१२) जाहीर झाला आहे. **१९४८:-** लेखक सुरेश जयराम पिप्रोडीया यांचा जन्म. ह्यांचे 'बाईसाहेब' हे नाटक, 'लफडा सदन' हा फार्स आणि 'राहू - केतू', 'लैला ओ लैला' ही विनोदी नाटके प्रसिध्द. **१९५०:-** साहित्यिका ताराबाई हरिचंद्र बोरकर यांचा जन्म. इयत्ता ७ वी उत्तीर्ण असलेल्या ताराबाईंनी 'झाडीच्या म्हणी' हे संशोधनात्मक, 'झाडीचे उखाणे' हे लोकसाहित्य तसेच झाडीच्या पाककृती, 'झाडीचे सण' ही माहितीपर पुस्तके लिहिलीत. **१९५०:-** पंढरपुरच्या आषाढी वारीला गेले असताना मार्गातच, वयाच्या अवघ्या ३५व्या वर्षी देहावसान झालेले लेखक आणि संत सीताराम किसन उके यांचे निधन. त्यांच्या ग्रंथसंपदेत 'कळवळ्याची हाक','प्रेमरस गुटिका', आणि 'भजनगंगा' ही भक्तीगीते संग्रह प्रकाशित. **१९५७:-** सुप्रसिध्द तत्ववेत्ते, अध्यात्म व तत्वज्ञानापर ग्रंथाचे लेखक प्रा. रामचंद्र दत्तात्रय रानडे यांचे निधन. त्यांचे बहुतेक लेखन इंग्रजीतून असून त्याचा मराठी अनुवाद झाला आहे. तथापि, त्यांनी 'ज्ञानेश्वर वचनामृत', 'संत वचनामृत', 'तुकाराम वचनामृत', 'रामदास वचनामृत आणि एकनाथ वचनामृत' हे अभ्यासक ग्रंथमालेतील त्यांचे पाच मराठी ग्रंथ. यातून त्या संतांचा साक्षात्कार मार्ग स्पष्ट केला. **१९७३:-** संस्कृत पंडित, ग्रंथ संपादक अच्युत दत्तात्रय पिसाळकर यांचे निधन. **१९८४:-** लेखक, कवी, पत्रकार, संगीतकार अमेय नितिन गुप्ते यांचा जन्म. विविध वृत्तपत्रातून लेखन करणाऱ्या अमेय यांचा 'पारिजात' काव्यसंग्रह प्रसिध्द झाला असून रा. ग. गडकऱ्यांच्या कविताही त्यांनी संगीतबध्द केल्या आहेत. **२००२:-** कवयित्री, लेखिका, अनुवादक शांता शेळके यांचे निधन. शांताबाईच्या १०६ पुस्तकांत 'येडबंबू शंभू' सारखी बालकविता, 'पावसाआधीचा पाऊस' सारखा ललितरम्य लेख, असे वैविध्य सोल....गीतकार म्हणून त्यांनी जगण्याचा मोठा पट कवेत घेतलाच, पण ललितलेखांतून त्या व्यक्त होत राहिल्या. 'वर्षा', 'गोंदण', 'पूर्वसंध्या', 'इत्यर्थ (काव्यसंग्रह), 'धर्म', 'पुनर्जन्म' (कादंबऱ्या), 'अनुबुध', 'मुक्ता', 'प्रेमिक (कथासंग्रह), वडीलधारी माणसे (व्यक्तिचित्र), धूळपाटी (आत्मपर), 'मेघदूत', 'जपानी हायकू' (अनुवाद) अशी बहुविध त्यांनी लीलया हाताळली. याखेरीज 'आनंदाचे झाड', 'एक पानी', 'शब्दांच्या दुनियेत', 'संस्मरणे' हे वैचारिक तर 'आसामी वृत्तपत्रांचा इतिहास', 'आंधळी', 'चौघीजणी', 'लालपुष्कर', 'नागा नंद', 'लोकांचे राज्य' हे अनुवादीत साहित्य आणि 'धूळपाटी' हे आत्मचरित्र अशी ग्रंथसंपदा.

**संजय वझरेकर**
**९९७५५७६६७५**

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

६ जून

१) श्री.विनायक महादेव बर्वे
श्रीबाग-२, अलिबाग, ६-६-१९४९
२) डॉ.उषा रमेश मालपाणी
मु.तळवडे,अलिबाग, ६-६-१९४२
३) श्री.राजेंद्र दतात्र्येय पाटील
अलिबाग, ६-६-१९५५

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)**
**९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

**आजचे अन्नदाते**

**सतीश नारायण कर्वे, वाढदिवस अलिबाग**

# शैक्षणिक साहित्याला महागाईची झळ

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

**रायगड जिल्ह्यातील शाळा १२ व १५ जूनपासून सुरू होत असून पालक व विद्यार्थी वह्या, पुस्तके, दप्तरासह शालेय साहित्य खरेदीसाठी दुकानात गर्दी करत आहेत. या वर्षी शालेय स्टेशनरी व वह्यांच्या किमतीत सुमारे २० टक्क्यांनी वाढ झाल्याने विद्यार्थी व पालकांना महागाईची झळ सोसावी लागत आहे. शैक्षणिक साहित्य खरेदी करणे गरजेचे असल्याने पालकांची पावले आता दुकानाकडे वळू लागली आहेत. इंधनाचे वाढलेले दर, विविध देशांमधील युद्ध परिस्थिती व त्यामुळे निर्माण झालेली कागद टंचाई याचा शालेय साहित्य दरवाढीवर परिणाम झाला आहे. पेन्सिलपासून लाँगबुकपर्यंत सर्वच किमती वाढल्याने पालकांचे शैक्षणिक बजेट कोलमडले आहे. ज्या पालकांना दोन किंवा त्यापेक्षा अधिक मुले आहेत त्यांचा या वर्षीचा खर्च वाढणार आहे.**

रायगड जिल्ह्यातील शहरी व ग्रामीण भागातील दुकानांमध्ये मोठ्या व लहान आकाराच्या वह्या, चित्रकला वही, प्रयोग वही, दप्तरे, नव्या वर्गाची पाठ्यपुस्तके,



टिफिन, पेनपेन्सिल, कंपास पेटी, पाण्याची बाटली, खोडरबर, टोकयंत्र, पुस्तके कव्हर, गम यांसारख्या वस्तूंची खरेदी करण्यासाठी पालक व मुले दुकानात गर्दी करत आहेत. जिल्ह्यातील सुमारे ६०० दुकाने शालेय साहित्यांनी सजली असून अनेक दुकानदारांनी सवलतीवरही भर दिला आहे.

विद्यार्थ्यांना आपल्या आवडीनुसार वह्या खरेदी करता येणे शक्य होणार आहे. यावर्षी विद्यार्थ्यांचा बदलता ट्रेड लक्षात घेता केजी टू पीजी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना आकर्षित करण्यासाठी वह्यांवरील नवनवीन आकर्षक मुखपृष्ठ नामांकित कंपन्यांनी तयार करून बाजारात आणल्या आहे. यात चित्रपट कलाकार, बीटीएस कलाकार, क्रिकेट व इतर खेळाडू ,धबधबे, डोंगर दऱ्या असे नैसर्गिक देखावे, देश विदेशातील उंच व प्रसिद्ध इमारती, स्थापत्य नमुने, कार्टून अशी एकापेक्षा एक सरस मुखपृष्ठ असलेल्या आकर्षक वह्या मुलांना आकर्षित करत आहेत.

देश विदेशातील तसेच स्थानिक आणि ब्रँडचे तयार केलेले शैक्षणिक साहित्य दुकानात उपलब्ध झाल्याने मुलांना आपल्या ब्रँडनुसार खरेदी करता येणार आहे. बाजारात सध्या डोम्स, नवनीत, कॅमलिन, क्लासमेट, सुंदरम, सुदर्शन, अप्सरा, युवा, सम्राट, रिगल या ब्रँडच्या वह्या व इतर साहित्य तसेच काही स्थानिक

### पालकांच्या खिशाला कात्री

कंपनीची साहित्य उपलब्ध झाली आहेत. महागाई वाढली असली तरीही ब्रँडेड खरेदी मुलांकडून केली जात आहे.

पेन्सिलपासून स्कूल बॅगपर्यंत सर्व साहित्याच्या दरामध्ये वाढ झाली आहे.३ रुपयाची साधी पेन्सिल ५-७ रुपयांना तर १० रुपयांचे पेन १५ रुपयांवर पोहचले आहे.लहान वह्यांच्या किमतीत डझनला ६० रुपयांची वाढ झाली आहे. याशिवाय कंपास आणि कंपास साहित्य १५ टक्क्यांनी तर विद्यार्थ्यांच्या पाठीवरील दप्तरचे दर १५ टक्क्यांनी वाढले आहेत.स्कूल बँग व टिफिनचे शेकडो प्रकार दुकानात उपलब्ध असल्याने त्यांची खरेदीही वाढली आहे. दुकानदारांनी विद्यार्थ्यांनी आपल्या दुकानातून खरेदी करावी याकरता काही सवलतीदेखील जाहीर केल्या आहेत. महागाईची झळ आता शाळेपर्यंत पोहोचली असली तरीही शैक्षणिक साहित्य गरजेचे असल्याने पालकांना ते खरेदी करावेच लागत असल्याचे पालक चंद्रकांत बामणे यांनी सांगितले.

# मुरूडचा पारा वाढला

**। मुरूड । वार्ताहर ।**



मुरूडचे तापमान ४५ अंशाच्या वरती गेलेल्या पाहाव्यास मिळवले आहे. अक्षरश: सूर्यदेव आग ओकत असल्याचा अनुभव मुरूडकरांना मिळाला आहे. ग्लोबल वॉर्मिंगचा इशारा मिळत असल्याने वेडीच उपायोजना करण्याची गरज आहे. वाढते प्रदूषण, औद्योगीकरण, शहरात होणारे गल्लीबोळातील रस्ते, खेडेगावातून होणारे अंतर्गत रस्ते, मोठ्या प्रमाणात होणारी वृक्षतोड, आधुनिकीकरणाच्या नावाखाली जमीनदोस्त होणारे डोंगर हे जर वेळीच थांबले नाही तर यंदा तापमान ४५ अंश पार तर पुढल्या वर्षी ५५ अंश पार होणार तर वेळीच उपाययोजना केली नाही तर मानव प्रजाती नष्ट व्हायला वेळ लागणार नाही.

सकाळी ८ वाजताच पारा ३६ अंशावर गेला दुपारी ४५.२ अंशावर चढला. त्यामुळे शहरातच नव्हे तर गावखेड्यातून सुद्धा घराबाहेर पडणारी सर्व सामान्य माणस घरातच बसून राहिले. त्यामुळे संपूर्ण बाजारपेठेत कमी प्रमाणात वर्दळ दिसत होती. रिक्षा चालकांनी सुद्धा उन्हात प्रवासी मिळत नसल्याने रिक्षा घरीच बंद ठेवने पसंत केले आहे. या वेळी प्रथमच मुरूडचा पारा इतक्या प्रचंड प्रमाणात चढला होता. याचे कारण मुरूड शहरातील विकास कामे यामध्ये शहरातील मातीचे रस्ते नष्ट झाले आहेत. त्यामुळे पावसाळ्यात पाणी जमिनीत मुरणार नाही. त्यामुळे उष्णता कमी होण्या ऐवजी वाढत जाणार अशी खंत जनमानसांतुन व्यक्त होत आहे.

पुन्हा एकदा शहरातील, ग्रामीण भागातील रस्ते मातीचे करावे लागतील त्यामुळे तापमान नियंत्रित करण्यासाठी मदत होईल अशी मागणी जनमानसातून जोर धरू लागली आहे.

# नर्सिंग असिस्टंटच्या माध्यमातून समाजसेवा शक्य- डॉ. नितीन गांधी



**। रायगड । प्रतिनिधी ।**

उज्वल भविष्य सामाजिक संस्था व जन शिक्षण संस्थान रायगड यांच्या संयुक्त विद्यमाने उज्वल भविष्य नानासाहेब कुंटे तांत्रिक विद्यालय वरसोली येथे 'असिस्टंट नर्सिंग' या कोर्सचे उद्घाटन करण्यात आले.

समाजातील गरीब व गरजू बेरोजगार युवक-युवतींना स्वतःच्या पायावर उभे राहून त्यांनी स्वयंरोजगार निर्माण करण्यासाठी संस्थेतर्फे पहिली बॅच मोफत शिकवण्यात येणार आहे. ही बॅच उज्वल भविष्य नानासाहेब कुंटे तांत्रिक विद्यालय व जन शिक्षण संस्थान रायगड यांच्या संयुक्त विद्यमाने चालवली जाणार असून विद्यार्थ्यांना कौशल भारत - कुशल भारत अंतर्गत केंद्र सरकार मान्यता प्राप्त कोर्स पूर्णत्वाचे प्रमाणपत्र दिले जाणार आहेत.

या बॅचमध्ये २० विद्यार्थ्यांनाच प्रवेश देण्यात आला आहे. संस्था मागील २० वर्षापासून सक्रीयपणे व्यवसाय प्रशिक्षण देण्याचे कार्य करीत आहे. कार्यक्रमाच्या प्रसंगी सुरुवातीला सर्व मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. नंतर जे.एस.एस.चे चेअरमन डॉ. नितीन गांधी यांनी विद्यार्थ्यांना असिस्टंट नर्सिंग कोर्सचे महत्व सांगितले. तसेच तांत्रिक विद्यालयाचे उदय जोशी यांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. जे.एस.एस.चे डायरेक्टर डॉ. विजय कोकणे, उज्वल भविष्य सामाजिक संस्थेचे अध्यक्षा उज्वला चंदनशिव व डॉ. राजाराम हुलवान यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. नंतर आभार मानून कार्यक्रमाचा समारोप केला. या उद्घाटन कार्यक्रमाकरिता नानासाहेब कुंटे तांत्रिक विद्यालयाचे उदय जोशी, सुरेंद्र जोशी, डॉ. नितीन गांधी, डॉ. विजय कोकणे, उज्वल भविष्य सामाजिक संस्थेचे अध्यक्ष उज्वला चंदनशिव, डॉ. राजाराम हुलवान, संचालक रोशन पंडित, डॉ. सतिष चिखलकर, जे. एस. एस. कर्मचारी वर्ग, कुमार ठाकूर, पूजा लाडे व सर्व विद्यार्थी वर्ग उपस्थित होते.

## कोकण रेल्वेमध्ये ११ जागांसाठी नोकरभरती

**मुंबई :** कोकण रेल्वेमध्ये भरतीसाठी अधिकृत वेबसाईटवर नोटिफिकेशन जाहीर केले आहे. पदासाठी लागणारी शैक्षणिक अर्हता, वयोमर्यादा, अर्जाची शेवटची तारीख, पगार याचा सविस्तर तपशील देण्यात आला आहे. कोकण रेल्वे कॉर्पोरेशनमध्ये विविध पदांच्या ११ रिक्त जागा भरण्यात येतील. यामध्ये सिनिअर टेनिकल असिस्टंटची १ जागा, प्रोजेट इंजिनीअरच्या ८ जागा, ड्राफ्टमनची १ जागा, असिस्टंट इंजिनीअर कॉन्ट्रॅटची १ जागेचा समावेश आहे. सिनीअर टेनिकल असिस्टंटपदासाठी मुलाखत २५ जून रोजी, प्रोजेट इंजिनीअरपदासाठी २७ जून रोजी, प्रोजेट इंजिनीअरसाठी २० जून रोजी, ड्राफ्ट्समनसाठी १५ जून आणि असिस्टंट इंजिनीअरसाठी २४ जून रोजी मुलाखत घेतली जाणार आहे.

# विविध उपक्रमांतून पर्यावरण दिन साजरा

**। महाड । प्रतिनिधी ।**

जागतिक पर्यावरण दिन विविध उपक्रमातून साजरा करण्यात आला. शहरामध्ये ठिकठिकाणी वृक्ष लागवड आणि पर्यावरण संवर्धनाविषयी जनजागृती करण्यात आली. फ्रेंड्स ग्रुप या संस्थेतर्फे कृषी महाविद्यालय, मोतीराम जगताप कृषी विद्यालय आणि महाड, वन विभागातर्फे वृक्ष वाटप करण्यात आले तर सोसायटी फेडरेशन आणि नगरपालिका यांच्यावतीने रोपांची लागवड करण्यात आली.

सामाजिक, सांस्कृतिक आणि क्रीडा क्षेत्रात सहभागी असलेल्या महाड शहरातील प्रामुख्याने तरुणांच्या सहभाग असलेल्या फ्रेंड्स ग्रुपतर्फे जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून गेल्या काही वर्षापासून झाडांच्या रोपांचे मोफत वाटप करण्यचीं येत आहे. महाड तालुक्यामध्ये झाडे लावा आणि झाडे जगवा हा उपक्रम फ्रेंड्स ग्रुपच्या तरुण कार्यकर्त्यांनी हाती घेतला आहे, अशी माहिती संस्थेचे अध्यक्ष सुदेश कळमकर यांनी दिली.

आचळोली येथील कृषी महाविद्यालय,



**●महाडमध्ये फ्रेंड्स ग्रुप तर्फे रोपांचे वाटप**

**●नगर पालिकेकडून रोपांची लागवड**

मोतीराम जगताप कृषी विद्यालय, कोकरे आणि वनविभाग महाड यांचे या कार्यक्रम ला अत्यंत मोलाचे सहकार्य लाभले आहे. काजू, आंबा, चिंच, फणस, कडुलिंब, गुलमोहर, करंज यासह अन्ये एक हजार पेक्षा अधिक रोपांचे वाटप शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकामध्ये आयोजित करण्यात आले होते.

महाड नगरपरिषद महाड व रायगड जिल्हा हाऊसिंग फेडरेशनमार्फत माझी वसुंधरा अभियान अंतर्गत महाडमधील हाऊसिंग सोसायटीमध्ये वृक्षारोपणचा कार्यक्रम जागतिक पर्यावरण दिनानिमित्त आयोजित करण्यात आला. दहा हाऊसिंग सोसायटीमध्ये महाड नगर परिषदेचे मुख्याधिकारी धनंजय कोळेकर, अधिकारी तसेच रायगड जिल्हा हाऊसिंग फेडरेशनचे अध्यक्ष राजाराम पाटील, उपाध्यक्ष श्रीकृष्ण बाळ, सचिव गंगाधर साळवी व पदाधिकारी यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.



**जिल्ह्यात पनवेलसह अनेक भागांमध्ये पावसाने हजेरी लावली आहे. लवकरच शाळादेखील सुरु होत आहेत. मुलांना कार्टुन फार आवडतात. त्यांच्या आवडीच्या कार्टुनच्या छत्र्या बाजारात दाखल झाल्या आहेत. खरेदीसाठी दुकानांमध्ये गर्दी होत आहे.**

**(छायाचित्र : राजेश डांगळे)**

# कृषी विभागाकडून शेतकऱ्यांना आवाहन

**। रायगड । प्रतिनिधी ।**

शेततळे खोदण्यासाठी शेतकऱ्यांना तब्बल दीड लाख रुपयांचे अनुदान देण्यात येते. त्यामध्ये शेततळे खोदण्यासाठी आणि अस्तरीकरणासाठी प्रत्येकी ७५ हजार देण्यात येतात. याबाबतची अधिक माहिती महाडीबीटीच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

शेतकऱ्यांना शेततळ्यासाठी तब्बल दीड लाख रुपयांचे अनुदान दिले जात आहे. योजनेत शेतकऱ्यांना १५ बाय १५ चे शेततळे खोदण्यासाठी १८ हजार ६२१ रुपये अनुदान मिळते तसेच अस्तरीकरणासाठी २८ हजार २७५ रुपयांचे अनुदान मिळते, २० बाय १५ चे शेततळे खोदण्यासाठी २६ हजार ६७४ रुपये आणि अस्तरीकरणासाठी ३१ हजार ५९८ रुपये अनुदान मिळते.

२० बाय २० चे शेततळे खोदण्यासाठी ३८ हजार ४१७ रुपये आणि अस्तरीकरणासाठी ४१,२१८ रुपयांचे अनुदान मिळते. २५ बाय २० चे शेततळे खोदण्यासाठी ५० हजार ६१ रुपयाचे अनुदान मिळते. २५ बाय २५ चे शेततळे खोदण्यासाठी ६५,१९४ रुपयांचे अनुदान मिळते. २० बाय २५ चे शेततळे खोदण्यासाठी ७५ हजार रुपयांचे अनुदान मिळते. ३० बाय ३० चे शेततळे खोदण्यासाठी ७५ हजार रुपयांचे, अस्तरीकरणासाठी ७५ हजार रुपयांचे असे दीड लाख रुपयांचे अनुदान मिळणार आहे.

संकेतस्थळावर शेतकरी एकाच वेळी अर्ज करू शकतात. लॉटरी पद्धतीने योजनेसाठी शेतकऱ्याची निवड होत नाही तोपर्यंत शेतकऱ्याने एकदा केलेला अर्ज ग्राह्य धरला जातो. म्हणजेच शेतकऱ्यांला प्रत्येक योजनेसाठी स्वतंत्र अर्ज करावा लागत नाही आणि वारंवार अर्ज करावा लागत नाही. दरमहा प्रत्येक योजनेच्या लाभार्थ्यांची लॉटरी पद्धतीने निवड करण्यात येते.

## महिलेला लाखो रूपयांचा गंडा

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

अलिबाग तालुक्यातील पेझारी येथील एका महिलेला लाखो रूपयांचा गंडा घातल्याचा प्रकार समोर आला आहे. लघुउद्योगासाठी कर्ज देण्याचा बहाणा करीत सहा लाख अठ्ठावन्न हजार पाचशे शहात्तर रूपयांची लूट केली आहे.

ही घटना १२ डिसेंबर २०२३ ते ४ जून २०२३ या कालावधीत घडली. यातील एक आरोपी स्थानिक असून दुसरा आरोपी बाहेरील असल्याची माहिती समोर येत आहे. फिर्यादी महिलेचा विश्वास संपादन करून तिला लघुउद्योगासाठी सवलतीच्या दरात कर्जाद्वारे मशीन देण्याचे आमिष दाखविले. त्यांच्यावर विश्वास ठेवून महिलेने काही रक्कमेची गुंतवणूक केली. मात्र, या आरोपींनी साडेसहा लाख रकमेचा अपहार करत मशिनरी न देता तिची फसवणूक केली. ही बाब महिलेच्या लक्षात आल्यावर त्यांनी पोयनाड पोलीस ठाण्यात दोघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पोलीस अधिक तपास करत आहेत.

# माणगावमध्ये पावसाची हजेरी



**। माणगाव । प्रतिनिधी ।**

तालुक्यात दुपारी पावसाने हजेरी लावल्याने वातावरणात गारवा आला आहे. अचानक आलेल्या पावसाने मात्र नागरिकांची त्रेधातिरपीट उडाली. पावसामुळे रस्त्यावर पाणी साचले होते. पाऊस थोड्या कालावधीसाठी बसरला असला तरी नागरिकांनी मान्सूनचा आनंद घेतला.

दुपारपासूनच ढगाळ वातावरण झाले होते. त्यानंतर पावसाच्या सरी बरसण्यास सुरुवात झाली. लखलखणाऱ्या विजांनी नागरिक घाबरले होते. गेल्या काही दिवसांपासून उष्णता वाढली आहे. त्यामुळे नागरिक उकाड्याने चांगलेच हैराण झाले आहेत.

पावसाने आज बरसून वातावरणात गारवा आला आहे. पावसाला वेळेवर सुरुवात होणार असल्याने शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. त्यांनी आता शेतीच्या कामांना सुरुवात केली आहे.

जिल्हा प्रशासनानेदेखील मान्सून पूर्व कामांचा आढावा घेण्याच्या कामांना गती दिली आहे. महानगर पालिका, नगर पालिका, नगर परिषद, नगर पंचायतींमधील नालेसफाईची कामे अंतिम टप्प्यात आली असल्याचा दावा संबंधित प्रशासनाने केला आहे.

## पणजीत सर्वाधिक पावसाची नोंद

**गोवा :** मान्सून कर्नाटक राज्य व्यापत गोव्यातील दक्षिण भागात मंगळवारी दाखल झाला. येत्या काही दिवसांत तो संपूर्ण गोवा व्यापणार आहे. गेल्या चोवीस तासांत पणजीत सर्वाधिक ४९.२ पावसाची नोंद झाली आहे तर, मुरगावमध्ये १३.४ आणि म्हापसा येथे १२.२ पावसाची नोंद झाली आहे.

मॉन्सून अरबी समुद्र, गोवा आणि कर्नाटक, तेलंगणाच्या आणखी काही भागांत पुढे सरकत असल्याचे हवामान विभागाने म्हटले आहे. केरळमध्ये ३१ मे रोजी मॉन्सून दाखल झाला होता. सर्वसामान्यपणे केरळात मान्सून दाखल झाल्यानंतर चार-पाच दिवसांत गोव्यात दाखल होतो. त्यानुसार यंदा राज्यात वेळेत मॉन्सून दाखल झाला आहे. लोकसभा निकालाच्या दिवशी (०४ जून) राजधानी पणजीसह राज्यात इतर ठिकाणी पावसाने हजेरी लावली. पणजीमध्ये एक तास मुसळधार पाऊस पडला. शहरातील सर्व रस्ते जलमय झाले होते. पणजी आणि पर्वरीला जोडणारा मांडवी पूल जलमल झाला होता. पुलावर साचलेल्या पाण्यातूनच वाहनधारकांना मार्ग काढताना कसरत करावी लागली.

# शेती मशागतीची कामे अंतिम टप्प्यात

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्ह्यामध्ये पाऊस कधीही पडण्याची शक्यता आहे. त्यामुळे जिल्ह्यातील शेतकरी मशागतीची कामे युद्धपातळीवर करू लागले आहेत. ही कामे अंतिम टप्प्यात असून चार दिवसात संपण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

रायगड जिल्ह्यात पावसाच्या पाण्यावर अवलंबून भातशेती मोठ्या प्रमाणात केली जाते. जिल्ह्यातील शेतकरी जून ते सप्टेंबर या कालावधीत शेती करण्याकडे अधिक भर देतात. जिल्ह्यात गेल्या महिन्याभरापासून शेती मशागतीची कामे सुरू आहेत. काही भागांमध्ये ही कामे पूर्ण देखील झाली आहेत. त्यामध्ये बांधबंदिस्ती, गवत जाळणे, राब जाळणे, शेतात असलेले काटे काढणे अशा अनेक प्रकारची कामे करण्यात आली आहेत. उन्हाळा असल्याने काही शेतकरी पहाटेच्या वेळी तर काही शेतकरी संध्याकाळी ४ नंतर शेतात जाऊन ही कामे करत असल्याचे दिसून आले आहे.

जून महिना उजाडला आहे. भारतीय हवामान खात्याच्या सूचनेनुसार यंदा पाऊस लवकर पडणार असल्याचा इशारा दिला आहे. त्यामुळे शेती मशागतीची कामे लवकरात लवकर पूर्ण करण्यासाठी शेतकरी कामाला लागले असून ही कामे अंतिम टप्प्यात असल्याचे दिसून येत आहे.

## विहिरींचा गाळ काढण्यास मान्यता

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्ह्यातील धरणांबरोबरच विहिरींमध्ये गाळ साचल्याने पाण्याचा तुटवडा निर्माण झाला आहे. ही टंचाई दूर करण्यासाठी जिल्हा प्रशासनाने १७ विहिरींचे गाळ काढणे व त्या खोल करण्यासाठी मान्यता दिली आहे.

जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात ठिकठिकाणी विहिरी आहेत. या विहिरींची देखभाल दुरूस्ती केली जाते. मात्र त्यांचा गाळ काढण्यास स्थानिक प्रशासन उदासीन ठरत आहे. त्याचा परिणाम विहिरींमध्ये गाळ जास्त आणि पाणी कमी अशी परिस्थिती निर्माण होते. पाण्याची टंचाई निर्माण होऊ नये यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयाकडून १७ विहिरींचे गाळ काढण्याची परवानगी देण्यात आली आहे. त्यामध्ये अलिबाग तालुक्यातील १३ आणि महाडमधील ४ विहिरींचा समावेश असल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली.

# मासेमारीची हंगाम फक्त २०० कोटींचा

**। रत्नागिरी । वृत्तसंस्था ।**

परराज्यातील स्पीडबोटींचे अतिक्रमण, विजेच्या प्रखर झोताच्या सहाय्याने मासेमारी, इंधनाचे वाढते दर आणि जोडीला अपेक्षीत मासळी न मिळाल्याने यावर्षीचा मत्स्यव्यावसाय 'ना नफा ना तोटा' असाच राहीला आहे. १ जूनपासून हंगाम संपुष्टात आला असल्यामुळे नौका बंदरात स्थिरावल्या आहेत. वर्षभरात होणारी सुमारे ३०० कोटींची उलाढाल यंदा २०० कोटींवर आल्याची खंत मच्छिमारांनी व्यक्त केली.

यंदाच्या मासेमारी हंगाम सुरू झाल्यानंतर मोठी वादळे कोकण किनारपट्टीवर आली नसली तरीही अधूनमधून वातावरणातील बदलांमुळे वेगवान वाऱ्यांचा अडथळा होताच. त्यामुळे सप्टेंबर ते डिसेंबर या



कालावधीत सुमारे १० वेळा मासेमारी बंद ठेवण्याची वेळ आली होती. त्याचा फटका मच्छीमारांना बसला. पाच वर्षांनतर यंदा तार्ली मासा मोठ्या प्रमाणात मच्छीमारांच्या जाळ्यात सापडला. तर बांगडा मासा मागील दोन वर्षांच्या तुलनेत यंदा अधिक सापडला. तर सुरमई, शिंगाडा, पापलेट या माशांची वानवा यंदाही होतीच. अपेक्षेपेक्षा कमी मासा मिळाल्याने त्याचा परिणाम मच्छिमारांच्या उलाढालीवर झाला. दहा महिन्यांच्या हंगामात पर्ससिनेट मासेमारी ४ महिने होती. त्यातील ५० टक्केच दिवस मासे हाती आले. तर उर्वरित दिवस वाया गेले. या कालावधीत मच्छिमारांना रिकाम्या हाती परतावे लागले.

राजापूर तालुक्यातील साखरीनाटे हे जिल्ह्यातील दोन नंबरचे बंदर आहे. या बंदरात दरदिवशी कोट्यावधींची उलाढाल होते. या ठिकाणी सुमारे २५ पर्ससिनेट, १५० ते २०० फिशिंग ट्रॉलर, १०० यांत्रिक होड्या, सुमारे ५० बिगर यांत्रिक होड्या अशा मिळून ३०० हून अधिक मच्छिमार नौका मच्छिमारी करतात. तारली, शिंगाळा, सुरमई, पापलेट, सरंगा आदी माशांना स्थानिक बाजारपेठेत परदेशातून मोठी मागणी आहे. या व्यवसायातून दरवर्षी कोट्यवधींची उलाढाल होते. गेल्या काही वर्षामध्ये मच्छिमारांना चांगला पैसा मिळवून देणारे तारली, सुरमई, पापलेट, सरंगा आदी मासे गायब झाले आहेत. गतवर्षीपेक्षा तुलनेत यंदा आर्थिक उलाढालीचा हंगाम संमिश्र राहीला. सुरुवातीला समुद्रात मासे मिळण्याचे प्रमाण अत्यल्प होते. त्यामुळे मच्छीमार आर्थिकदृष्ट्या अडचणीत सापडले होते.

हंगामाच्या शेवटी बऱ्यापैकी मासे मिळाल्यामुळे मच्छीमार सुखावले. साखरीनाटे बंदरात वर्षभराच्या हंगामात सुमारे वीस हजार टन मासे मिळतात. मात्र, यंदा त्यामध्ये घट झाली आहे. सुमारे १५ हजार टन मासे मिळाले त्यामुळे आर्थिक फटका बसला आहे. पुढील हंगाम तरी चांगला जाईल का अशी चिंता मच्छीमारांना लागली आहे.

निवडक

## हजारो वृक्षांची लागवड

**रसायनी :** बिर्ला कार्बन इंडिया आणि पाताळगंगा नदी आणि पर्यावरण संवर्धन चॅरिटेबल ट्रस्ट यांचा संयुक्त विद्यमानाने जागतिक पर्यावरण दिनानिमित्त सावरोली खारपाडा रोडवरील आंबिवली ते वाशिवलीमध्ये रस्त्याच्या दुतर्फा आंबा, फणस, जांभूळ, पेरू, वड, पिंपळ आदी जातीच्या दोन हजारपेक्षा अधिक वृक्षांची लागवड करण्यात आली. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून प्रशांत भोसले, रवींद्र रघुवंशी, संजीव भनोत, योगेश गोरे, निखिल भामरे, अरुण जाधव आदी अधिकारी वर्ग उपस्थित होते.

## विद्यार्थ्यांना भेटवस्तूचे वाटप

**रसायनी :** सु.ए.सो माध्यमिक विद्यालय भाताण शाळेचे स्कूल कमिटी चेअरमन आर. सी. घरत, महेंद्र घरत, माजी उपसभापती वसंत काठावले यांच्या जन्म दिवसाचे औचित्य साधून इयत्ता दहावीच्या सन २०२३-२४ मध्ये पास झालेल्या सर्व विद्यार्थ्यांना भेटवस्तू देऊन विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले. हा कौतुक सोहळा मोठ्या उत्साहात माजी उपसभापती वसंत पांडुरंग काठावले यांच्या आवारात पार पडला.यावेळी गुणवंत विद्यार्थ्यांचे कौतुक करून त्यांना उपस्थितांनी मार्गदर्शन केले.

## पर्यावरण दिन साजरा

**पनवेल :** ५ जून जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून झाडे दान देऊन जागतिक पर्यावरण दिन साजरा करण्याचे ठरविले. रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, फणसवाडी येथे ३ वड, २ पिंपळ, ३ कडुलिंबांच्या झाडांचे वृक्षारोपण करून जागतिक पर्यावण दिन साजरा केला.याप्रसंगी डॉ. प्रा. नीलिमा मोरे, अरविंद मोरे, स्नेहा गावंड, सविता सरगर, वैशाली पारधी, प्रा. बिजली दडपे, प्रतिमा जाधव, समाजसेविका सुमन जयवंतराव ताजने व विद्यार्थी उपस्थित होते.

## जगदिश देशमुख सेवानिवृत्त

**रसायनी :** शासन कृषी विभागात ३७ वर्ष ७ महिने २५ दिवस सेवा पूर्ण करून मंडळ कृषी अधिकारी या पदावरून जगदीश देशमुख सेवा निवृत्त झाले. त्यांचा सत्कार व निरोप सभारंभ कृषी विभागाने आयोजित केला होता. जगदिश देशमुख हे खालापूर येथे कृषी सहायक म्हणुन ७ ऑक्टोबर १९८६ रोजी नोकरीस रुजू झाले, आपल्या ३७ वर्षाच्या सेवेत त्यांनी खालापूर तालुक्यात ३२ वर्ष सेवा केलेली आहे. २० वर्ष खालापूर तालुक्यात कृषी सहायक म्हणून काम केले.

## वाहनचालकांवर कारवाई

**अलिबाग :** बेशिस्त आणि बेदरकारपणे वाहन चालवणाऱ्यांच्या संख्येत वाढ झाली आहे. रायगड जिल्हा पोलिसांच्या अखत्यारीत असणाऱ्या कार्यक्षेत्रातील बेशिस्त वाहनचालकांवर रायगड जिल्हा पोलिसांच्या वाहतूक शाखेने कारवाईची मोहीम आखली आहे. ४ जून रोजी रायगड रायगड जिल्हा वाहतूक पोलिसांनी ७८ वाहनचालकांवर दंडात्मक कारवाई केली. वाहतूक पोलिसांनी या वाहनचालकांकडून ८४ हजार रूपयांचा दंड वसूल केला आहे.

# वनराई बंधाऱ्यांचे पाणी शेतीला

## ■ कृषी विभागाचे ७५६ वनराई बंधारे; १४२६ हेक्टर शेतीला लाभ

**। रायगड । प्रतिनिधी।**

**रायगड जिल्हयाच्या कृषी विभागाने गेल्या वर्षात एकूण ७५६ वनराई बंधारे बांधले आहेत. या बंधाऱ्यांमुळे १७८८ टीएमसी पाणीसाठा निर्माण झाला आहे. या पाण्याचा जिल्ह्यातील १४२६ हेक्टरवरील शेती व आजुबाजूच्या परिसराला लाभ झाला आहे.**



जिल्ह्यात पावसाला संपता संपताच पाण्याची टंचाई जाणवू लागते. पाण्याचे दुर्भिक्ष्य हे माणसासह प्राणी-पशुपक्षी आणि संपूर्ण परिसरावर परिणाम करते. यावर वनराई बंधारे ही संकल्पना प्रभावी ठरते. या वनराई बंधाऱ्यामुळे भूजल पातळीत वाढ होण्यास लाभ होतो. नाला किंवा ओढा यातील पाणी स्थानिक पातळीवर उपलब्ध होते. उन्हाळ्यात पाण्याचे स्त्रोत तळ गाठतात. त्यामुळे वनराई बंधारे शेतकऱ्यांसह पशु-पक्ष्यांसाठी वरदान ठरत ठरतात.

वाहत्या पाण्याच्या ठिकाणी सिमेंटच्या गोणींमध्ये माती भरुन बंधाऱ्यांची निर्मिती केली तर पाण्याच्या पातळीत वाढ होऊन यातून पुढील अनेक दिवस गुराढोरांची तहान भागविली जाऊ शकते. त्याचप्रमाणे शेतकऱ्यांना शेती करणेदेखील सोयीचे होऊन त्यातून चांगली पिके घेता येतात.गेल्या काही वर्षात गाव पातळीवर बंधारा बांधून पाणी अडवा पाणी जिरवा ही संकल्पना राबविली जात आहे. यामुळे वनराई बंधारे शेतकरी आणि पशु-पक्ष्यांसाठी वरदान ठरत आहेत.

पावसाळा संपताच पाण्याचे विविध स्त्रोत्र तळ गाठत असतात. मात्र, काही ठिकाणी हेच पाणी आपल्यासाठी मोठे वरदान ठरत आहे. बंधारा वनराई संवर्धनाचे काम करतो, म्हणून यास वनराई बंधारा महटले जाते. बांधकाम सिमेंटची रिकामी पोती, माती, वाळू, दगड यांच्या साहाय्याने बांध घालून पाणी अडविता येते. यासाठी फारसा खर्च येत नाही.

या बंधाऱ्यामुळे जनावरे, पक्षी, जंगली प्राणी यांची तहान भागविण्यासाठी मोलाची मदत करणार आहे. यामुळे महत्त्व जाणून घेऊन बंधारा बांधून पाणी अडविले पाहिजे. यासाठी ग्रामपंचायतीने लक्ष घालून ही संकल्पना राबविणे महत्त्वाचे आहे.

रायगड जिल्ह्याच्या कृषी विभागातर्फे अलिबाग तालुक्यात ७३ बंधारे बांधले असून त्यातून ८० टीएमसी, पेण तालुक्यात ५८ बंधारे बांधले असून त्यातून १४५ टीएमसी, खालापूर तालुक्यात ३९ बंधारे बांधले असून त्यातून ९७ टीएमसी, पनवेल तालुक्यात ४८ बंधारे बांधले असून त्यातून १२० टीएमसी, कर्जत तालुक्यात २१३ बंधारे बांधले असून त्यातून ५३२ टीएमसी, उरण तालुक्यात २७ बंधारे बांधले असून त्यातून ६७.५० टीएमसी, माणगाव तालुक्यात १०२ बंधारे बांधले असून त्यातून २५५ टीएमसी, रोहा तालुक्यात ३२ बंधारे बांधले असून त्यातून ८० टीएमसी, तळा तालुक्यात २१ बंधारे बांधले असून त्यातून ५२ टीएमसी, सुधागड तालुक्यात ३७ बंधारे बांधले असून त्यातून ९२ टीएमसी, महाड तालुक्यात २४ बंधारे बांधले असून त्यातून ६० टीएमसी, पोलादपूर तालुक्यात १६ बंधारे बांधले असून त्यातून ३५ टीएमसी, म्हसळा तालुक्यात १४ बंधारे बांधले असून त्यातून ३५ टीएमसी, श्रीवर्धन तालुक्यात १६ बंधारे बांधले असून ४० टीएमसी असा एकूण सुमारे १७८८ टीएमसी पाणीसाठा उपलब्ध झाला.

# पक्ष्यांकडून पावसाच्या आगमनाचे संकेत

**। माथेरान । वार्ताहर ।**

माथेरानमधील निसर्गातील विविध पक्षी, कीटक, प्राणी यांना पावसाच्या आगमनाची चाहूल लागली असून येथील बहुसंख्य पक्षांची घरटी बांधून पूर्ण झाली आहेत. मुंग्यांनी देखील आधीच रसद गोळा करून ठेवली आहे. वारुळाची म्हणजेच वाळवीची घरांची दुरुस्ती पूर्ण करून ठेवली आहे.

माथेरानमधील निसर्गमित्र संस्थेचे अध्यक्ष पवन गडवीर यांनी दिलेल्या माहितीप्रमाणे येथील पशु-पक्ष्यांना पावसाच्या आगमनाची चाहूल लागली आहे. येथील जंगलात भटकंती करीत असतात अशा अनेक घटनांच्या नोंदी त्यांनी येथे केल्या आहेत. पक्ष्यांच्या विणीचा हंगाम सुरू झाला आहे. त्यामुळे पक्षांनी लवकर घरटी बांधून पूर्ण केली आहेत.बुलबुल, कोकिळा, टिटवी, कुकुटकुंभा, कावळा यांचे तर अंडी उबवण्याचे काम सुरू झाले आहे.तसेच काही पक्षांची पिल्ले घरट्यातून बाहेर देखील पडू लागली आहेत. दोन दिवसांपूर्वी माथेरानच्या मुख्य बाजारपेठ येथील एका झाडावरून कोकिळेचे पिल्लू हवेत उडण्याचा प्रयत्न करताना सारखे रस्त्यावर पडत होते. हे दृश्य पाहण्यासाठी पर्यटकांनी आणि नागरिकांनी गर्दी केली होती. तसेच मुंग्यांची सुद्धा खाणे साठविण्याची प्रक्रिया पूर्ण झाली असून वाळवीची वारुळे देखील डागडुजी करून पूर्ण झाली आहेत.



चातक पक्षी 'पिऊ पिऊ' असे ओरडू लागला की समजावे पहिल्या पावसाचे दिवस जवळ आले. कावळीणीने किती अंडी दिली आहेत यावरून सुद्धा पावसाचा अंदाज लावला जातो. चार अंडी दिली तर चांगला पाऊस, दोन अंडी दिली तर कमी पाऊस आणि एकच अंड दिलं तर अतिशय कमी पाऊस पडणार असे संकेत मिळतात. जंगलात झाडे पोखरणाऱ्या वाळवीला कधी पंख फुटत नाहीत परंतु पावसाळ्यापूर्वी वारुळातून थवेच्या थवे उडू लागले की पावसाचे लवकर आगमन होते.पक्षी,किटक यांच्या विशिष्ट हालचालींवरून यंदा पावसाचे आगमन लवकर होणार, असे पवन गडवीर यांनी सांगितले.

# लाखो रुपयांचा दारूसाठा केला नष्ट

## पनवेल शहर पोलिसांची कारवाई

**। पनवेल । वार्ताहर ।**

पनवेल शहर पोलीस ठाणेकडील सन २००८ ते २०२३ या कालावधीमधील विविध दाखल ३८ गुन्ह्यांमधील दारूच्या बॉटल, कॅन व अन्य जप्त करण्यात आलेला मुद्देमाल न्यायालयाच्या आदेशाने करंजाडे येथे नष्ट करण्यात आला आहे.



पनवेल शहर पोलिसांनी विविध दारूबंदी गुन्ह्यांमध्ये दारूच्या बॉटल, कॅन व अन्य मुददेमाल जप्त केला होता. या गुन्ह्यांचा तपास पूर्ण होवून आरोपींविरूध्द न्यायालयामध्ये दोषारोपपत्र सादर करण्यात आले. जप्त मुद्देमाल मोठ्या प्रमाणात असल्याने पोलीस ठाणे मुद्देमाल कक्षामध्ये ठेवण्यास जागा अपुरी पडत होती. या गुन्ह्यातील जप्त मुद्देमाल पोलीस ठाणे येथे दिर्घ कालावधी पासून पडून असल्याने बदलत्या हवामानाचा परिणाम होवून नाश होत होता.

दारूचे कॅन उंदीर कुरतडून नष्ट करीत होते. यामुळे बदलत्या हवामानात परिणाम होवून उग्र वास येत होता. त्याचा परिणाम पोलीस ठाण्याकडील पोलीस अधिकारी, अंमलदार, तसेच पोलीस ठाणे येथे काम काजाकरिता येणारे नागरिक यांच्या आरोग्यावर होत होता. याकरिता पोलीस ठाण्यातील साठयाची विल्हेवाट लावणे आवश्यक असल्याने प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, पनवेल यांच्याकडून ३८ गुन्ह्यांमधील दारूचा मुद्देमाल नाश करण्याबाबत आदेश प्राप्त करण्यात आले होते.

त्याप्रमाणे विशेष पथकाने पनवेल शहर पोलीस ठाण्याकडील एकुण ३८ गुन्ह्यांमधील ९० मिलीच्या ७६७ बाटल्या, १९८० मिलीच्या १९४२ बाटल्या , ७५० मिलीच्या १५८५ बाटल्या, ६०० मिलीच्या ८९ बाटल्या, अशा एकूण ४३७५ बाटल्या असा साडेसात लाखांचा मुद्देमाल नष्ट करण्यात आला.

पोनि. फणसेकर, राज्य उत्पादन अधिकारी पनवेल शहर, वाय एस लोळे, दुय्यम निरीक्षक उत्पादन शुल्क, पनवेल शहर एस ए जाधव, दुय्यम निरीक्षक उत्पादन शुल्क, पनवेल शहर, तसेच पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे, पोलीस निरीक्षक प्रशासन भगत, सपोनि राजपुत, सपोनि शेटे पोलीस ठाण्याचा इतर स्टाफ याचे उपस्थितीत करंजाडे सेक्टर -५ या सुरक्षित ठिकाणी पर्यावरणाची कोणत्याही प्रकारची हानी न होता मुद्देमालाचा नाश करण्यात आला असल्याची माहिती नितीन ठाकरे यांनी दिली.

## भालचंद्र पिसाट यांचे निधन

**रोहा :** घोसाळे गावचे रहिवासी असणारे व सेवानिवृत्त आदर्श शिक्षक भालचंद्र मोरेश्वर पिसाट गुरूजी यांचे २६ मे रोजी वयाच्या ९४ व्या वर्षी राहत्या निवासस्थानी वृद्धापकाळाने निधन झाले.



त्यांनी सेवाकाळात ठिकठिकाणी सेवा करून विद्यार्थी व शाळेचे हित जोपासून सामाजिक बांधिलकीच्या नात्यातून काम केले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, दोन मुली,सुन,जावई, नातवंडे असा परिवार असल्याची माहिती त्यांच्या निकटवर्तीयांकडून देण्यात आली आहे.



# उल्हास नदीमध्ये सिमेंट बंधाऱ्याचे काम सुरु

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत शहरातून वाहणाऱ्या उल्हास नदीवर श्री प्रति पंढरपूर क्षेत्र विकसित केले आहे. उल्हास नदीच्या तीरावर वसलेले प्रति पंढरपूर येथे असलेल्या उल्हास नदीमध्ये भरपूर पाणी असावे यासाठी सिमेंट बंधारा बांधण्यात येणार होता. दरम्यान,उल्हास नदीमध्ये बांधण्यात येत असलेल्या सिमेंट बंधाऱ्याचे काम सुरु झाल्याने पावसाळ्यानंतर उल्हास नदी पात्रात तेथील परिसर जलमय झालेला दिसून येणार आहे.

कर्जत शहरातील आमराई परिसरात ५२ फूट उंचीची श्री विठ्ठलाची मूर्ती उभी राहिली. या मूर्तीच्या उद्घाटन सोहळ्याला राज्याचे मुख्यमंत्री येणार होते. त्यावेळी कोरडी असलेल्या उल्हास नदीमध्ये पाणी दिसून यावे, यासाठी उल्हास नदीमध्ये मातीचा बांध घालण्यात आला. त्यावेळी त्या उद्घाटन सोहळ्याला आलेल्या वारकऱ्यांनी उल्हास नदीमधील पाणी पाहून आळंदीमध्ये असल्याचा भास अनुभवाला होता. त्यामुळे त्या भागात उल्हास नदीमध्ये सिमेंट कोल्हापूर टाईपचा बंधारा बांधण्यात यावा अशी मागणी होत होती. उल्हास नदीमध्ये कोलापूर टाईपचा बंधारा बांधण्याची परवानगी मिळाली आहे. कोल्हापूर टाईप बंधारा या प्रकल्पासाठी शासनाच्या पाटबंधारे विभागाने तब्बल ७५ लाख निधी दिला होता.

त्या निधीमधून बांधण्यात येणारे कोल्हापूर टाईप बंधाऱ्याचे काम सुरु झाले आहे. सरकारी विश्रामगृहाच्या मागे असलेल्या मुद्रे स्मशानभूमीच्या मागे हा सिमेंट बंधारा बांधण्यात येत आहे. साधारण १०० मित्र लांबीचा हा सिमेंट बंधारा पावसाळा सुरु होण्याआधी पूर्ण करण्याचे आव्हान पाटबंधारे खात्यावर आहे. या बंधाऱ्यामुळे ऑक्टोबर पासून तेथील परिसर पूर्वी कोरडा असलेला नदी परिसर पुढील वर्षांपासून जलमय झालेला दिसून येणार आहे. त्यामुळे भविष्यात प्रति पंढरपूर क्षेत्र परिसर आळंदी सारखा दिसू लागणार आहे.

# पर्यावरण दिनानिमित्ताने पुस्तकाचे प्रकाशन

**। मुरूड । वार्ताहर ।**

पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी मानवाकडून कोणकोणत्या बाबींची दक्षता घेतली पाहिजे. कांदळवन तोडीचे प्रमाण घटले पाहिजे. त्याचप्रमाणे पावसाचे प्रमाण कायम म्हणजेच सर्वत्र पाऊस हा किमान २२०० मिलीमीटर एवढा पडणे खूप गरजेचे आहे. यासाठी जनजागृती करण्यासाठी परिमंडळ वनाधिकारी डॉ.निलेश चांदोरकर यांनी एक पुस्तक लिहिले असून त्याचा नुकताच एक प्रकाशन सोहळा संपन्न झाला आहे.

जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून परिमंडळ वनअधिकारी डॉ. निलेश चांदोरकर, वनविभाग लिखित कांदळवनांच्या तोडीचा किनारपट्टीवरील लोकांच्या जीवनावर झालेला परिणाम तसेच वनहक्क कायदा २००६ च्या अंमलबजावणीचा पश्चिम घाटातील सरकारी वन क्षेत्रावर झालेला परिणाम या दोन विषयांवरील पुस्तकांच्या इंग्रजी आवृत्तीचा प्रकाशन सोहळा नुकताच संपन्न झाला. यावेळी नवी मुंबईच्या अतिरिक्त पोलीस आयुक्त मीरा बनसोडे यांच्या शुभ हस्ते पुस्तकाच्या प्रकाशन सोहळा संप्पन्न झाला.

सदरील कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जयशिल पालकर, पर्यावरण व राजकीय समन्वयक, संदेश ठाकूर, शैलेश खोत, गायत्री पारकर, वास्तू विशारद सुजित विचारे, सोनाली विचारे आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

विविध वक्त्यांनी आपले विचार व्यक्त करून ऱ्हास होत चालेल्या पर्यारवरणाविषयी चिंता व्यक्त केली. यासाठी शासन स्तरावर पर्यावरण जतन होण्यासाठी कडक कायदे अमलात आणले जावे, असे मत व्यक्त करण्यात आले.

# शेती करण्यासाठी आधुनिक यंत्राचा वापर

■ **अल्प वेळात शेतीची कामे पुर्ण**

■ **शेतमजूर शेतीच्या कामास मिळणे झाले अश्यक्य**

**। पाताळगंगा । वार्ताहर ।**

आज यांत्रिकीकरणाच्या युगामध्ये शेतीमधील कामे आधुनिक पद्धतीच्या यंत्राद्वारे केली जातात त्यामुळे ग्रामीण भागात पुर्वी गावोगावी बैलाद्वारे करण्यात येणारी शेतीची मशागत इतिहासजमा होत आहे. व त्याची जागा ट्रॅक्टरसारख्या अत्याधुनिक यंत्रणेने घेतली आहे.



ग्रामीण भागात पुर्वी गावोगावी आढळणारे जनावरांचे कळप आता कमी होत असल्याने पाळीव जनावरांच्या संख्येत लक्षणीय घट झाली आहे. त्यातच सतत जनावरांचा चारा व पाण्याची समस्या गंभीर बनत असल्याने जगाचा पोशिंदा असलेला बळीराजा सध्या संकटात सापडला आहे. पूर्वी शेती मशागतीसाठी बैलाचा वापर करत. आज ही होत आहे मात्र मोठ्या प्रमाणात पहावयास मिळत नाही. शेतकऱ्यांचा मित्र म्हणून बैलाची ओळख ग्रामीण भागामध्ये निर्माण झाली होती.

त्या बैलांना जन्म देणारी गोमाता म्हणून ओळखले जाते.मात्र विज्ञानाच्या प्रगतीमुळे शेतकरी आता यांत्रिकीकरणाकडे वळून अत्याधुनिक पद्धतीने शेती करीत आहे. त्यातच नांगराच्या सहाय्याने शेती करण्यासाठी व बैलाद्वारे शेतीची मशागत करण्यासाठी साल गडीही मिळणे कठिण झाले आहे. शेतगड्याच्या वेतनाचे भाव हे गगनाला भिडले आहेत. त्यामुळे नांगराने शेती करणे शेतकऱ्यांना परवडत नाही.

ज्याच्याकडे जितके नांगर तितका शेतीचा दर्जा मोठा असा फार पूर्वी शेतकऱ्यांचा समज होता. परंतु, आता यांत्रिकीकरणाच्या युगामध्ये बैलाची जागा ट्रॅक्टरने घेतली आहे व ट्रॅक्टरच्या सहाय्याने शेतातील नांगरणी, उखलण पेरणी इत्यादी कामे केली जातात. परंतु, आज या यांत्रिकीकरणाच्या जमान्यामध्ये शेतकरी अत्याधुनिक यंत्राकडे वळाला असून नवनवीन टेक्नॉलॉजी वापरून शेतीमध्ये वेगवेगळे प्रयोग करत मोठ्या प्रमाणात उत्पादन घेण्याकडे शेतकऱ्यांचा कल वाढला आहे.

## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- सहारा ट्रॅव्हल्स अलिबाग मध्ये स्थानिक ड्रायव्हर पाहिजे वय २५ ते ४५( Jsw duty) ९२७०५६०४५६
- घरकाम व मुलांना सांभाळणे साठी बाई हवी पंतनगर अलिबाग येथे. पूर्णवेळ राहणारी किंवा सकाळी ८.००ते ६ संपर्क-९८६७२१५४९५/८०९७२०५९३९
- ५०००० रूपये किमतीचा CNC मशीन ऑपरेटिंगचा कोर्स मोफत, मोफत, मोफत. पात्रता : १२ वी किंवा १५ वी पास, वयोमर्यादा- ३० वर्षेपर्यंत. पगार- १०००० रूपये, ८ तास ड्युटी, संपर्क : ९०४९६५५५२३
- टायपिंग आणि झेरॉक्सकरीता मुले मुली पाहिजेत. संपर्क : ९२७१५९४४२०

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

# दिव्यांग युवक बनले आरोग्य दूत

## ■ ग्रामीण श्रमिक प्रतिष्ठानचा अलिबागमध्ये स्वाधार पुनर्वसन पॅटर्न

**। रायगड । प्रतिनिधी ।**

**ग्रामीण श्रमिक प्रतिष्ठान संचलित स्वाधार दिव्यांग प्रशिक्षण व पुनर्वसन केंद्र वरसोली – अलिबाग येथे भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड यांच्या सामाजिक उत्तरदायित्व कार्यक्रमांतर्गत सहा महिने कालावधीचा शास्त्रीय ॲक्युप्रेशर व मसाज चिकित्सा प्रशिक्षण कार्यक्रम राबवला जातो.**

दिव्यांगांच्या पुनर्वसनाची व्याख्याच बदलून टाकणारे स्वाधार केंद्र १९८१ पासून अविरतपणे ग्रामीण अंध अपंगांच्या प्रशिक्षण व पुनर्वसनासाठी कार्यरत आहे.



अलिबाग व कोकण भागातील दिव्यांग युवकांच्या पुनर्वसनासाठी प्रतिष्ठानने विभागीयप्रशिक्षणकेंद्राची स्थापना फेब्रुवारी २०२३ केली. या विभागीय प्रशिक्षण केंद्रात मागील १ वर्षांपासून अंध दिव्यांगांसाठी ॲक्युप्रेशर व मसाजचे प्रशिक्षण दिले जाते. ६ महिन्याचे प्रशिक्षण पूर्ण झाल्यामुळे अंध दिव्यांगांचा या प्रशिक्षण कार्यक्रमाच्या दुसऱ्या बॅचचा निरोप समारंभ व प्रमाणपत्र वितरण कार्यक्रम मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडला. प्रशिक्षण घेतलेले हे अंध विद्यार्थी आता विविध आजाराने त्रस्त रुग्णांना सेवा देण्यासाठी तयार झाले आहेत. डोळे असून उपयोग नाही तर जगण्याची दृष्टी हवी आणि ही जगण्याची दृष्टी स्वाधार केंद्र या प्रशिक्षण केंद्राच्या माध्यमातून अंध दिव्यांगांना देत आहे. आपण घेतलेले प्रशिक्षण हे तसेच न ठेवता त्याचा उपयोग करून आयुष्यात पुढे जावे, असे प्रमुख पाहुण्यांनी बोलताना सांगितले.

या कार्यक्रमासाठी भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड कंपनीचे सीएसआर मॅनेजर प्रसाद पाखरे, चीफ मॅनेजर ॲडमीन अँड एच आर नवनाथ इंगळे, डॉ. निशिकांत पाटील, साउंड हिलींग थेरपिस्ट पल्लवी जांभोरे, कृषीवलचे व्यवस्थापक रूपेश पाटील, कृषीवलच्या दर्शना पाटील, वरसोली ग्रामपंचायत सदस्या नमिता माळवी, पूजा खोत, प्रशांत सुडे, प्रेरणा सुडे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमासाठी सुमित पाटील, हरिभाऊ घोडके, राहुल गवळी, सत्यजित गुरव आदींनी परिश्रम घेतले.

> योग्य कौशल्य असूनही फक्त अंध असल्याने रोजगारासाठी व नोकरीसाठी संघर्ष करावा लागत होता. अंध असल्यामुळे कोणी रोजगार देण्यासही तयार नव्हते. पण स्वाधार मार्फत ॲक्युप्रेशर व मसाजचे प्रशिक्षण मिळाल्यामुळे मी आज स्वतःच्या पायावरती उभा आहे. व मी स्वतः घरच्यांचा आधार बनलो आहे.
> **अभिषेक आमले,अंध दिव्यांग**

# विधिमंडळाच्या मान्यतेशिवाय सरकार खर्च करू शकत नाही

## अनंत कळसे यांचे प्रतिपादन

**। मुंबई । प्रतिनिधी।**

संसदीय कार्यपद्धतीत विधिमंडळाची भूमिका महत्त्वाची असून, प्रशासनावर नियंत्रण ठेवण्याचे महत्त्वपूर्ण कार्य विधिमंडळाद्वारे केले जाते, त्यादृष्टीने विधिमंडळाची जबाबदारी ही व्यापक असल्याचे प्रतिपादन राज्य विधान मंडळाचे माजी प्रधान सचिव अनंत कळसे यांनी केले.

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय तसेच मंत्रालय आणि विधिमंडळ वार्ताहर संघाच्या संयुक्त विद्यमाने मंत्रालयातील वार्ताहर कक्षात 'माध्यम साक्षरता अभियान'अंतर्गत 'ओळख विधिमंडळ कामकाजाची' या विषयावर एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. कार्यशाळेच्या द्वितीय सत्रात 'विधिमंडळ कामकाजाचे वृत्तांकन, विधिमंडळ चर्चा आणि विशेषाधिकार' या संदर्भात अनंत कळसे यांनी मार्गदर्शन केले.

शासन आणि प्रशासन या दोन्ही यंत्रणांकडून योग्य पद्धतीने निश्चित केलेल्या कार्यपद्धतीच्या नियमावलीचे पालन करुन घेणारी विधिमंडळ ही अत्यंत सक्षम यंत्रणा आहे. त्यामुळे शासनाचे धोरणात्मक निर्णय जाहीर करण्यापूर्वी विधिमंडळांच्या सभागृहात ते आधी मांडावे लागतात. संसद, विधिमंडळात प्रशासनावर नियंत्रण ठेवण्याचे अत्यंत महत्त्वाचे कार्य पार पाडण्यासाठी सदस्यांद्वारे सहा प्रकाराची आयुधे वापरली जातात. यामध्ये महत्त्वपूर्ण विषयांवरील सभागृहात चर्चा करणे, तारांकित, अतारांकित प्रश्न उपस्थित करणे, अर्थसंकल्प सभागृहात सादर करुन त्याला मंजुरी घेणे, विधिमंडळाच्या विविध प्रकारच्या समित्यांद्वारे प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर लक्ष ठेवणे, कायदा निर्मिती प्रक्रिया आणि विधिमंडळाच्या विशेषाधिकाराचा वापर या वेगवेगळ्या सहा प्रकारच्या माध्यमातून विधिमंडळ प्रशासनावर नियंत्रण ठेवत असते.

विधिमंडळाच्या सभागृहात मान्यतेसाठी सादर करण्यात येणारा अर्थसंकल्प हा प्रशानसनावर नियंत्रण ठेवण्यातील सर्वाधिक महत्वाचे आयुध आहे. विधिमंडळाच्या मान्यतेशिवाय शासन एक रुपया सुद्धा खर्च करु शकत नाही, त्यामुळे अर्थसंकल्पाला सभागृहाची मंजुरी मिळणे ही बंधनकारक बाब असून, त्याच सोबत प्रशासनावर नियंत्रणाचे हेप्रभावी आयुध आहे. त्याचप्रमाणे प्रशासनाच्या विविध विभागांमार्फत करण्यात येणाऱ्या कामकाजावर बारकाईने लक्ष ठेवण्यासाठी विधिमंडळाच्या विविध विषयांवरील समित्या असतात. अशा एकूण ४० समित्यांद्वारा विधिमंडळ प्रशासनाच्या कार्यपद्धतीचे अवलोकन करत असते, त्यामुळे या समित्या देखील नियंत्रणाचे उपयुक्त आयुध आहे. त्याचप्रमाणे विधिमंडळाचे विशेषाधिकारांचा वापर करुन प्रशासनाला नियमावलीच्या चौकटीत योग्य पद्धतीने कार्यपद्धती पार पाडण्यासाठी कृतीशील असते. विधिमंडळाची ही व्यापक जबाबदारी लक्षात घेऊन विधिमंडळाचे अधिकार, कामकाजपद्धती याचा सविस्तर अभ्यास असणे ही बाब आवश्यक असून सर्व संबंधितांना आपले काम अधिक यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी उपयुक्त ठरणारी असल्याचे अनंत कळसे यांनी सांगितले.

## e-TENDER NOTICE –

MAHATRANSCO Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website https://srmetender.mahatransco.in/ for the following Tender specification.


| RFX | Description | Esti. Cost |
|---|---|---|
| Tend-08/ 24-25 7000031260 | Replacement of EHV CTs & PTs at various substations under EHV (O&M) Circle, Panvel. **Tender Fee- Rs. 500/-+ GST** | Rs. 23.91 Lakhs |

**EMD 1% of estimated cost, submission of bids from 04.06.2024 to 12.06.2024 at 11:00 hrs, Opening date: 12.06.2024 at 11:30 Hrs.** For further details visit our website **https://srmetender.mahatransco.in/** Contact Person: The Executive Engineer(Adm) Tel No. 022-27459624, Mob. No. 9769006131.
E-mail ID se7200@mahatransco.in

Sd/-
**SUPERINTENDING ENGINEER EHV (O&M) CIRCLE, PANVEL**

# किक बॉक्सिंगच्या जिल्हाध्यक्षपदी कल्पेश शिंदे

**नागोठणे :**
नागोठण्याजवळील कडसुरे (ता.रोहा) येथील तरुण कराटे प्रशिक्षक व मार्शल आर्ट स्पोर्ट्स अकॅडमी रायगड संस्थेचे संस्थापक मास्टर कल्पेश शिंदे यांची स्टीअर फाऊंडेशनच्या किक बॉक्सिंग या खेळाच्या रायगड जिल्हा प्रमुखपदी नुकतीच निवड करण्यात आली आहे.



मास्टर कल्पेश शिंदे यांच्यामार्फत गेले बारा वर्षे रायगड जिल्ह्यामध्ये महिला सक्षमीकरणाचे काम सुरू आहे. रायगड जिल्ह्यातील शाळा, कॉलेज, वस्तिगृह अशा ठिकाणी जाऊन एक दिवसीय विनामूल्य महिला प्रशिक्षण शिबीर ते देत आहेत. तसेच महिलांवर होणारे अत्याचार रोखण्याकरिता कल्पेश शिंदे पाऊले उचलत आहेत. आपल्या कलेचा उपयोग हा समाजसेवेसाठी होईल यासाठी ते प्रयत्नशील असतात. तसेच कल्पेश शिंदे यांनी कराटेच्या माध्यमातून रायगड जिल्ह्यातील सर्व सामान्य कुटुंबातील विद्यार्थ्यांना उत्तम प्रशिक्षण दिल्याने ते विद्यार्थी आज आपल्या रायगड जिल्ह्यासह देशाचे नाव उज्वल करीत आहेत. कल्पेश शिंदे यांच्यामुळे गरिबातल्या गरीब विद्यार्थ्यांना कराटेचे उत्तम प्रशिक्षण देऊन हे विद्यार्थी कराटे स्पर्धेमध्ये सहभाग घेत असतात. कल्पेश शिंदे यांच्या मार्शल आर्ट स्पोर्ट अकॅडमी संस्थेकडे आदिवासी विभागातील सर्वसामान्य गरीब गरजू दोनशेहून अधिक युवती कराटेचा विनामूल्य ट्रेनिंग घेत आहेत. या चांगल्या कार्यामुळे मास्टर कल्पेश शिंदे यांना स्टीअर फाऊंडेशन रायगड जिल्हा अध्यक्ष किक बॉक्सिंग या खेळाच्या जिल्हाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. त्यासाठी सर्व क्षेत्रातून कल्पेश शिंदे यांचे कौतुक व अभिनंदन होत आहे. आपल्याला मिळालेल्या संधीचे व जबाबदारीचे सोने करणार असल्याचे कल्पेश शिंदे म्हणाले.

## Change in Name

I have change my name from **KOOR RABIYA ASHIFALI to RABIYABIBI ASAFALI KOOR.** R/O At.Urdu Highschool, Sogaon, Mapgaon, Raigad, Maharashtra Dated : 04/06/2024

## SRM E –TENDER NOTICE

MAHATRANSCO Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender specification.**

| Sr. No. | Tender/ Notice No. | Particulars of Tender | Estimated Cost of Tender |
|---|---|---|---|
| 1. | **Tender No:-** EE/EHV (O &M ) /DIVN/MHD/Tech/E -Tender-17/2024-25Dtd.06.06.2024 **RFx No.**7000031350 | **Sub.: -** Invitation SRM E-tender for the work of attending emergency breakdown and planned maintenance activities of various 220 KV /100 KV EHV line under KTL S/Dn., Mahad under EHV(O&M) Dn., Mahad for the year 2024-25. | **Rs. up to 25,00,000/- (Including GST+ 1% Labour CESS)** |

EMD will be the 1% of the estimated cost or 5000/- whichever is the highest & tender fee will be the 500/- + GST.

Bid submission is from 06.06.2024 @ 00:00 hrs to 12.06.2024 @23:59Hrs for above tender for further details visit our website:-**https://srmetender.mahatransco.in**

**Contact Person:-** The Addl.Executive Engineer, (O) : Phone No.7373101089

Note:All eligible Supplier / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL

~Sd~
**Executive Engineer, EHV(O&M) Dn., Mahad**

## e-Tender NOTICE

MAHATRANSCO Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website https://srmetender.mahatransco.in/ for the following Tender specification.

| Sr. No. | Tender No. EE/ 400kV R.S. (O&M) Dn/NGTN/Tech/ | Description | Estimated cost in lakhs | Submission date |
|---|---|---|---|---|
| 1. | e-Tender-08/24-25 /7000031298 | Providing 21 No of Skilled labour (ITI certified Technicians in Electrical / Wireman trade) for field work under 400kV R.S. (O&M) Dn. Nagothane for F.Y. 2024-25 | **Rs 48,64,768.58/-** | **11.06.2024 up to 23:59 hrs** |
| 2. | e-Tender-09/24-25 /7000031301 | Work of Providing 2 no of skilled labour (LDC cum computer operator) & 2 no unskilled labour (peon) at 400kV R.S. (O&M) Dn., Nagothane for 2024-25 | **Rs 8,66,241.11/-** | **11.06.2024 up to 23:59 hrs** |

EMD fee 1% of estimate amount & Tender fee Rs. 500/- + GST For further details visit our website **https://srmetender.mahatransco.in/** Contact Person: MITESH GOYAL Mob No. 9461456635 Email ID: **ee7230@mahatransco.in** Note: All eligible supplier/Contractors are mandated to get enrolled on SRM E Tenders (New) portal of MSETCL.

Sd/-
**EXECUTIVE ENGINEER, 400kV R.S. (O&M) Dn. Nagothane**

## जाहीर नोटीस

सर्व नागरीकांना या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, आमचे अशिल श्री. मनोज दामोदर म्हात्रे यानी मौजे अंत्राट तर्फे नीड, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेली मिळकत तीचे मालक खालील प्रमाणे यांचेकडुन विकत घेण्याचे ठरवीले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन : मौजे अंत्राट तर्फे नीड, ता. कर्जत, जि. रायगड**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.चा.मी) | आकार (रु.पै) |
|---|---|---|---|---|
| श्री.मारूती काशिनाथ जाधव | ३४ | २/ड | ०-२५-०० | २-३० |

वरील मिळकती हया आमचे अशिलांस विकत देणेचे ठरविले आहे. तरी वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा साठेकरार, ताबा कब्जा, कुळवहीवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, फरोक्त, चार्ज, लिज, अटॅचमेंट, लिएन वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास हि जाहीर नोटीस प्रसीद्ध झाल्यापासून २१ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे अशिल खरेदी खताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही.

कळावे.

दि. ६/०६/२०२४.

**ॲड. निलेश रखमाजी पादीर**
मो.-९७६७६३७१००
९२७२५६२१५८

**ॲड. दिपक रखमाजी पादीर**
मु. पो. नेरळ (मोहाचीवाडी),
ता. कर्जत, जि. रायगड
मो.-९८५०७६७५६८

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली बागायत मिळकत, विद्यमान मिळकत मालक श्री. रविंद्र वसंत राऊळ यांचेकडून जाणे-येणेच्या रस्त्याच्या हक्कासह कायम विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे नागांव, ता. अलिबाग, जि. रायगड येथील बागायत मिळकत.**

| भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे. आर | आकार रु. पै. |
|---|---|---|
| १०४५/३ | ०-१७-५० पो.ख. ०-००-८० ०-१८-३० | ५-१३ |

वरील मिळकती पैकी पूर्वेकडील ०-१२-३० हे.आर क्षेत्र

वरील वर्णन केलेली बागायत मिळकत, खुद्द मालकीची असून निर्वेध व बोजाविरहीत असलेबाबत मिळकत मालकांचे म्हणणे आहे.

तरीही वरील वर्णन केलेल्या मिळकतीचे संदर्भात कोणाचाही, कसलाही हक्क, हितसंबंध, मालकी, दान, गहाण, फरोक्त, साठेकरार, वक्षीस, बोजा, जाणे-येणेचा मार्ग वगैरे असल्यास त्यांनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह नोटीस प्रसिध्द झालेपासून सात (७) दिवसांचे आत खाली सही करणार यांचेकडे आपली हरकत नोंदवावी.

वरील मुदतीत तशा प्रकारची हरकत न आल्यास कोणाचाही कसलाही हक्क, हितसंबंध नाही व तो असल्यास आमचे अशिलांचे लाभांत सोडून दिला आहे असे समजून सदरचा व्यवहार पूर्ण केला जाईल व मागाहून आलेली तक्रार आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

अलिबाग
कळावे,
दिनांक: ०५/०६/२०२४

सही /-
**ॲड. प्रणाली पाटील**
सरिता सदन, जे. एस. एम कॉलेज रोड,
ता. अलिबाग- जि. रायगड
मोबाईल नं. ८३८०८०८००२

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची जमिन मिळकत तिचे मालक गणपत शंकर बदे व नामदेव तुकाराम कोंडीलकर यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तिचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे :-

**मौजे - नागेवाडी, तालुका कर्जत, जिल्हा रायगड येथील जमिन मिळकत**

| भूमापन क्रं व उपविभाग/ सर्व्हे नंबर/हिस्सा नंबर | एकुण क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|
| ५८/१/अ | १-५०-०० हे आर पॉ | ३-०२ |

या मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, बयानापावती, खरेदीखत, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीज, कब्जा, लोन, भाडेपट्टा, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत लेखी पुराव्यासह खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेत्री-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक : ०६/०६/२०२४

**ॲड. निलेश कान्हु मोरे मोबा**. ९८२२६९११०९
ॲड. वृषाली रघुनाथ मोरे मोबा. ८५३०१४६८५४
ऑफिस पत्ता- शॉप नं. २९, तळ मजला,
हिरापन्ना शॉपिंग प्लाझा बिल्डींग, भारत
गॅस समोर, अमराई रोड, कर्जत
ता.कर्जत, जि. रायगड ४१०२०१

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची जमिन मिळकत तिचे मालक विरेंद्र राजाराम दांडेकर व श्रदधा विरेंद्र दांडेकर यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तिचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे :-

**मौजे - हुमगाव, तालुका कर्जत, जिल्हा रायगड येथील जमिन मिळकत**

| भूमापन क्रं व उपविभाग / सर्व्हे नंबर/हिस्सा नंबर | एकुण क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|
| १९/३/अ | ०-२५-३० हे आर पॉ | १-७५ |

या मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, बयानापावती, खरेदीखत, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीज, कब्जा, लोन, भाडेपट्टा, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत लेखी पुराव्यासह खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेत्री-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक : ०६/०६/२०२४

**ॲड. निलेश कान्हु मोरे** मोबा. ९८२२६९११०९
ॲड. वृषाली रघुनाथ मोरे मोबा. ८५३०१४६८५४
ऑफिस पत्ता- शॉप नं. २९, तळ मजला,
हिरापन्ना शॉपिंग प्लाझा बिल्डींग, भारत
गॅस समोर, अमराई रोड, कर्जत
ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१


## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**


# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने– तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने– मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड– कुंदन– पोलकी–सेट– मॅचिंग बांगड्या– कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**


## जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील वर्णन केलेली शेती मिळवत असून त्या मिळकतीचे विद्यमान मालक श्री. नंदकुमार पांडुरंग घरत रा. मु.पो. वरसोली ता. अलिबाग, जि. रायगड यांच्याकडून सदरची मिळकत कायम विकत घेणेबाबत व्यवहार ठरविलेला असून तशा आशयाचा साठेकरार विद्यमान मालकांनी आमचे अशिलाना करून दिलेला आहे. सदर मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी दिल्यावरून आमच्या अशिलांनी सदरचा व्यवहार ठरविलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार रु. पैसे |
|---|---|---|---|
| भादाणे ता. अलिबाग | ११९/३ | ०-२४-३० ०-१७-१० एकूण ०-४१-४० | ४.१२ |

सदर वर नमूद केलेली मिळकत ही या जाहीर नोटीसचा विषय आहे.

सदर मिळकतीबाबत अन्य कोणाचा कसलाही हक्क हितसंबंध बोजा अथवा गहाण, दान, लीज, पोटगी, हवाला, साठेकरार, खरेदी, मेंटेनन्स, मेहेर, कर्ज वगैरेबाबत कसलाही हक्क हितसंबंध व हरकत असल्यास अशा व्यक्तींनी सदर हरकतीबाबत त्या हरकती संबंधीच्या लेखी कागदोपत्री पुराव्यांसह आपली हरकत खालील सही करणार यांच्याकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून (१४) चौदा दिवसांचे आत आणून द्याव्यात. याप्रकारे ठरलेल्या मुदतीत कोणाची कोणत्याही प्रकारची कसलीही हरकत आली नाही तर सदर मिळकत निर्वेध आहे व या मिळकतीबाबत क्लीअर व मार्केटेबल टायटल आहे, असे समजून माझे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील व यानंतर कोणाचीही कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही व आमच्या अशिलांस सदर मिळकतीचा नंतर निर्वेध असल्याचा दाखला देण्यात येईल, हे सर्वास कळावे.

अलिबाग
तारीख ०५/०५/२०२४

सही/-
**ॲड. शैलेश प्रभाकर पाटील**
दुय्यम निबंधक अलिबाग कार्यालयासमोर
पो. अलिबाग ता. अलिबाग जि. रायगड.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकारांनी मौजे कोंदिवडे, ता.कर्जत, जि.रायगड येथील खालील वर्णनाच्या मिळकती, त्या मिळकतीचे मालक नय्यर शमशुल इस्लाम यांचे कडून विकत घेणेचे ठरविले आहे.

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्रफळ हे. आर. | आकार रु. पै |
|---|---|---|---|
| ३४ | १/अ/२ | ०.०५.०० | ०.०८ |
| ३४ | १/अ/४ | ०.३६.०० | ५.३६ |
| ३५ | ३ | ०.४२.०० | ०.५६ |
| ३६ | २/अ/१ | १.११.०० | ५.५६ |
| ३६ | २ /ब/ १ | ०.२२.८० | ०.२५ |
| ३७ | - | ०.६४.०० | १.०० |
| ३८ | १ | ०.१२.९० | ०.८७ |
| ३८ | २ | ०.०५.१० | ०.०३ |
| ३८ | ४ | ०.५४.४० | ३.७५ |

सबब सदर मिळकतींच्या व्यवहाराबाबत कोणाचीही दान, गहाण, फरोक्त, साठेकरार, लिज, लीन, ताबेकब्जा अथवा अन्य कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिध्द झाले पासून १० दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी.

वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकती ह्या निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून वरील मिळकतींचा व्यवहार आम चे पक्षकारांकडून त्या मिळकतीचे मालकांबरोबर, पुर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक :-०६/०६/२०२४

**ॲड. सी. बी. ओसवाल**
बी.कॉम.एल.एल.बी.
दिनकर-निमकर अपार्टमेन्ट
बाजारपेठ कर्जत, ता. कर्जत,
जि. रायगड - ४१०२०१

## जाहिर नोटीस

तमाम जनतेस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यांस येते की मौजे कुरनाड, ता.पेण, जि.रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत माझे अशिल श्री. प्रभाकर रामभाउ घरत यांनी त्याचे नमुद विद्यमान मालक चंद्रकांत पांडुरंग आयरे यांच्याकडुन रजिस्टर खरेदी खतान्वये विकत घेण्याचे ठरविले आहे. त्याचे वर्णन खालील प्रमाणे

| गाव | सर्व्हेनं./गट नं./हि.नं. | क्षेत्र हे.आर. | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|
| कुरनाड | १५८ | ०.४१.०० पो.ख. ०.०२.०० एकूण क्षेत्र ०.४३.०० | ०.५८ |

वरील संपुर्ण क्षेत्र हे आमचे अशिल नोंदणीकृत खरेदीखताने खरेदी करीत आहेत.

तरी वर नमुद मिळकतीवर व मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, बक्षिस, वारस हक्क, पोटगी, लिन, चार्ज, ताबा, वहिवाट, साठेकरार, फरोक्त, इजमेंट बोजा अथवा कोणत्याही स्वरूपाचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झालेपासून १५ (पंधरा) दिवसाचे आत खालील सही करणार यांचे पत्त्यावर प्रथम दर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात हरकत द्यावी वरिल मुदतीत कोणाचीही लेखी हरकत न आल्यास सदरील मिळकतीमध्ये कोणाचाही हक्क हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी तो सोडून दिला आहे असे समजुन सदरील मिळकती निर्वेध व बोजारहित आहेत असे समजून आमचे आशिल सदर मिळकतीमध्ये खरेदीखताचे व्यवहार पुर्ण करतील. मागाहुन मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.
टिपः सदर नोटीस ही खरेदीखत लिहून घेणार यांच्या सांगण्यावरून देण्यात येत आहे.

सही/-
ठिकाण: पेण
दि.०६/०६/२०२४

**ॲड हेमा ज. पाटील (घोडिंदे)**
साई श्रध्दा सबुरी बिल्डिंग बी-विंग,
ब्लॉक नं. ००२, प्रभु आळी, पेण

## जाहिर नोटीस

तमाम जनतेस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यांस येते की मौजे जांभोशी, ता.पेण, जि.रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत माझे अशिल श्री.स्वप्नील अशोक मोकळ यांनी त्याचे नमुद विद्यमान मालक शांताराम विठू पांढरे व इतर यांच्याकडुन रजिस्टर खरेदी खतान्वये विकत घेण्याचे ठरविले आहे. त्याचे वर्णन खालील प्रमाणे

| गाव | सर्व्हे नं./गट नं./हि.नं. | क्षेत्र हे.आर. | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|
| जांभोशी | १६६ | ०.३१.४० पो.ख. ०.०१.०० एकूण क्षेत्र ०.३२.४० | ५.७५ |

वरील संपुर्ण क्षेत्र हे आमचे अशिल नोंदणीकृत खरेदीखताने खरेदी करीत आहेत.

तरी वर नमुद मिळकतीवर व मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, बक्षिस, वारस हक्क, पोटगी, लिन, चार्ज, ताबा, वहिवाट, साठेकरार, फरोक्त, इजमेंट बोजा अथवा कोणत्याही स्वरूपाचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झालेपासून १५ (पंधरा) दिवसाचे आत खालील सही करणार यांचे पत्त्यावर प्रथम दर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात हरकत द्यावी वरिल मुदतीत कोणाचीही लेखी हरकत न आल्यास सदरील मिळकतीमध्ये कोणाचाही हक्क हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी तो सोडून दिला आहे असे समजुन सदरील मिळकती निर्वेध व बोजारहित आहेत असे समजून आमचे आशिल सदर मिळकतीमध्ये खरेदीखताचे व्यवहार पुर्ण करतील. मागाहुन मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.
टिपः सदर नोटीस ही खरेदीखत लिहून घेणार यांच्या सांगण्यावरून देण्यात येत आहे.

सही/-
ठिकाण: पेण
दि.०६/०६/२०२४

**ॲड हेमा ज. पाटील (घोडिंदे)**
साई श्रध्दा सबुरी बिल्डिंग बी-विंग,
ब्लॉक नं. ००२, प्रभु आळी, पेण

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहिर नोटिसीने कळविण्यात येते की, सदर मिळकतीचे विद्यामान मालक १) नेहा लतेश जळगावकर २) अंजली शंकर पाटील यांचे मालकीची व प्रत्यक्ष ताबे कब्जातील मिळकत आहे. सदर मिळकतीच्या विक्री संदर्भात बोलणी आमचे आशिलयांच्याबरोबर मिळकतीच्या मालकांनी केलेली आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालिल प्रमाणे :-

**-: मिळकतीचे वर्णन :-**

मौजे कोपर, ता. अलिबाग, जि. रायगड येथील भुमापन क्रमांक व उपविभाग ११०/१ जिरायत क्षेत्र ०-४२-५० हे.आर., पो.ख. ०-०५-०० हे.आर., एकुण क्षेत्र ०-४७-५० हे.आर.,पैकी मिळकतीचे मालक यांच्या नावे असलेले क्षेत्र ०-२१-२५ हे. आर., पो.ख. ०-०२-५० हे. आर., एकूण क्षेत्र ०-२३-७५ हे.आर., आकार २.७८ रु. पैसे. या मिळकतीच्या खरेदी विक्री बाबत.

तरी वरील मिळकतीच्या बाबतीत कोणाचाही कुळवहिवाट, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण, बोजा, बक्षिस, दान, जप्ती, लिज् अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास हि नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवासांचे आत खाली सही करणार यांच्याकडे आपल्या हरकती पुराव्यासह लेखी दाखल करण्यात याव्यात. याप्रमाणे मुदतीत हरकत न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे. असे समजून त्या संबंधी कोणाचेही कायदेशीर हक्क, हितसंबंध नाहीत असे गृहीत धरुन त्या कायदेशीर बाबींची पुर्तता करतील व मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत आमचे पक्षकारांवर बंधनकारक राहणार नाही हे कळावे.

ठिकाण: अलिबाग
दिनांक: ०५/०६/२०२४

सही/-
**ॲड. तनुष्का पेडणेकर**
ता. अलिबाग, जि. रायगड
मो.नं. ७०५७८८१६६६

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टा मध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालका कडुन कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यारपत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावरही नोटीस प्रसिध्द झाल्या पासून ०७ (सात) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाहय हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

**मौजे ताडवाडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत**

| मालकाचे नांव | सर्व्हे नं. | प्लॉट नं. | क्षेत्र चौ.मी | आकार रु.-पै. |
|---|---|---|---|---|
| मालती पांडये विश्वबंधू पांडये | १०२ | ३३४ | २५३.०० | २५-३० |
| विश्वबंधू पंडया (मयत) पूनित विश्वबंधू पंडया मालती विश्वबंधू पंडया | १०२ | ३४३ | २५३.०० | २५-३० |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता :- मु. पो. कशेळे,
कर्जत-मुरबाड रोड, सरकारी दवाखान्या समोर,
ता. कर्जत, जि. रायगड. ४१०२०१

सही/-
**ॲड. भुपेश तानाजी पेमारे**
दिनांक : ०६/०६/२०२४
मो.नं. ९१५८२७७७२८

निवडक

### संघाचा प्रशिक्षक कोण?

**मुंबई :** राहुल द्रविड यांच्यानंतर भारतीय क्रिकेट संघाचे प्रशिक्षक कोण होणार याबाबत बरीच चर्चा रंगली आहे. बीसीसीआयने या पदासाठी अर्ज मागवले आहेत. या पदाच्या शर्यतीत माजी खेळाडू गौतम गंभीर आघाडीवर आहे. बीसीसीआयचे माजी अध्यक्ष सौरव गांगुली यांनीदेखील या पदासाठी इच्छुक असल्याचे सांगितले आहे. मला टीम इंडियाचे प्रशिक्षकपद सांभाळायला आवडेल. तसेच जर गौतम गंभीर हे पद स्वीकारत असेल तर तो या पदासाठी योग्य उमेदवार असेल, असेही गांगुलींनी नमूद केले.

### हनुमा विहारीला एनओसी

**आंध्रप्रदेश :** भारतीय क्रिकेटपटू हनुमा विहारी याचे आंध्रप्रदेश क्रिकेट संघ व्यवस्थापनाशी झालेल्या वादामुळे विहारी गेल्या काही महिन्यांपासून देशांतर्गत क्रिकेटपासून दूर आहे. त्याला आंध्रच्या संघातून खेळण्याची संधी मिळत नव्हती. तसेच आंध्र क्रिकेट असोसिएशनने (एसीए) ना हरकत प्रमाणपत्र (एनओसी) न दिल्याने हनुमाला इतर कोणत्याही संघाकडून खेळता येत नव्हते. मात्र आता एसीएने हनुमाला हे प्रमाणपत्र दिले आहे. त्यामुळे तो इतर संघांकडून देशांतर्गत क्रिकेट खेळताना दिसणार आहे.

### धोनीची युरोप ट्रीप

**मुंबई :** आयपीएल २०२४ च्या हंगामानंतर चेन्नई सुपर किंग्जचा स्टार प्लेयर एमएस धोनी आपल्या कुटुंबासह युरोप ट्रीप एन्जॉय करताना दिसला आहे. धोनीची पत्नी साक्षीने आपल्या युरोप ट्रीपचे काही खास फोटो सोशल मीडियावर शेअर केले आहेत. धोनी कुटुंबासह इटलीच्या पालेर्मो या नयनरम्य शहरात सुट्टीचे आनंद घेत आहे. अनंत अंबानी आणि राधिका मर्चंटच्या लग्नाआधीच्या सेलिब्रेशनसाठी धोनी कुटुंबाने युरोपमधील हजेरी लावली आहे.

### ‘निवृत्ती घेतली नाही’

**नवी दिल्ली :** भारतीय ऑलिम्पिक पदक विजेती मंगते चुंगनीजांग मेरी कोम (मेरी कॉम) देशभरात ओळखली जाते. तिने बॉक्सिंगमधून निवृत्ती जाहीर केल्याचा दावा करणाऱ्या वृत्तांचे खंडन केले आहे. मी अद्याप निवृत्तीची घोषणा केलेली नाही आणि माझ्याबद्दल चुकीचा उल्लेख करण्यात आला आहे. मला जेव्हा ही घोषणा करायची असेल तेव्हा मी वैयक्तिकरित्या मीडियासमोर येईन, असे मेरी कोम म्हणाली आहे. त्यामुळे मेरी कॉम खेळताना दिसणार आहे.

### इमाद वसीम दुखापतग्रस्त

**न्यूयॉर्क :** टी-२० विश्वचषक २०२४ मध्ये भारत आणि पाकिस्तान यांच्यात ९ जून रोजी सामना होणार आहे. या सामन्यापूर्वीच पाकिस्तानला मोठा झटका बसला आहे. पाकिस्तानचा स्टार अष्टपैलू खेळाडू इमाद वसीम दुखापतग्रस्त झाल्याने ६ जून रोजी होणाऱ्या अमेरिकेविरुद्धच्या सामन्यात खेळू शकणार नाही. कर्णधार बाबर आझम म्हणाला की, इमाद वसीमला साइड स्ट्रेनमध्ये थोडा त्रास होत आहे, त्यामुळे तो सलामीच्या सामन्याला मुकणार असल्याचे त्याने स्पष्ट केले आहे.

# आयसीसी तिजोरीचे दार उघडणार

## टी-२० वर्ल्ड कप विजेत्या संघावर पैशाचा पाऊस पडणार

**। न्यूयॉर्क । वृत्तसंस्था ।**

**टी-२० विश्वचषक सुरु झाल्यानंतर आयसीसीने मोठा निर्णय घेतला आहे. टी-२० विश्वचषक जिंकणाऱ्या संघांना किती रक्कम मिळणार याची घोषणा आयसीसीने केली आहे. टी-२० विश्वचषक विजेत्या संघाला २०.३६ कोटी रुपये मिळणार आहेत. तर, उपविजेत्या संघाला १०.६४ कोटी रुपयांची रक्कम मिळणार आहे. आयसीसी बक्षीसापोटी एकूण ९३.५२ कोटी रुपयांची रक्कम खर्च करणार आहे.**

आयसीसी टी-२० विश्वचषकाच्या पहिल्या फेरीत ४० सामने होणार आहेत. त्यानंतर सुपर ८ चे सामने होतील. पुढच्या टप्प्यात सेमी फायनल होईल आणि त्यानंतर अंतिम फेरीची लढत बारबाडोसमध्ये होणार आहे.




**भारताचे सामने कधी?**

भारतीय क्रिकेट संघाने २००७ च्या टी-२० विश्वचषकामध्ये विजेतेपद मिळवले होते. भारतीय संघाला २००७ नंतर पुन्हा विजेतेपद मिळवता आलेले नाही. यावेळी टी-२० विश्वचषकामध्ये २० संघ सहभागी झाले आहेत. पाच संघांचा एक गट या प्रमाणे चार गटांमध्ये विभागणी करण्यात आलेली आहे. भारत अ गटामध्ये असून भारताशिवाय पाकिस्तान, अमेरिका, कॅनडा आणि आयरलँड संघाचा समावेश आहे. न्यूयॉर्कच्या नासाऊ काऊंटी क्रिकेट स्टेडियमवर भारत आणि पाकिस्तान यांच्यात ९ जूनला लढत होणार आहे. या हाय व्होल्टेज लढतीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. भारताची यानंतरची लढत १२ जूनला अमेरिकेसोबत असेल. यानंतर १५ जूनला भारत आणि कॅनडा यांच्यात लढत होणार आहे. भारताने २०१३ च्या आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये विजेतेपद मिळवले होते. यानंतर गेल्या १० वर्षांमध्ये भारताला आयसीसी स्पर्धांमध्ये विजेतेपद मिळवता आलेले नाही. २०२३ च्या आयसीसी एकदिवसीय विश्वचषकामध्ये भारताला पराभव स्वीकारावा लागला होता. भारतीय संघ यावेळी टी-२० विश्वचषक जिंकणार का याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

नुकत्याच झालेल्या सराव सामन्यात बांगलादेशला ६० धावांनी पराभूत केले होते. आता भारतीय क्रिकेट संघ टी-२० विश्वचषकामध्ये कशी कामगिरी करणार याकडे लक्ष लागले आहे. भारतीय संघाने स्वत: च्या क्षमतेवर विश्वास ठेवल्यास विश्वचषकामध्ये त्यांना यश मिळेल.

# चेन्नई सुपर किंग्ज मध्ये परतले आर अश्विन

**। चेन्नई । वृत्तसंस्था।**

रविचंद्र अश्विन आईपीएल २०२५ चेन्नई सुपर किंग्ज म्हणजे सीएसकेसाठी खेळतांना दिसला तर आश्चर्य वाटू देऊ नका. कारण आर अश्वीनने परत इंडिया सीमेंट्स जॉईन्ड केले आहे. या प्रकारे त्याची वापसी सीएसके सेटअपमध्ये झाली आहे. अश्विनला यासोबत मोठी जवाबदारी मिळाली आहे. तो चेन्नई सुपर किंग्ज हाय परफॉर्मेंस सेंटरचा प्रमुख बनला आहे.



सीएसकेचे हाय परफॉर्मेंस सेंटर सहाराच्या बाहेरील परिसरात बनत आहे. या ट्रान्सफर मूवचा अर्थ म्हणजे या गोष्टीची शक्यता आहे की, अश्विन या वर्षाच्या शेवटी होणाऱ्या मेगा ऍक्शनमध्ये सोबत परत जोडू शकतात. कारण हा एक मोठा खेळाडूंचा लिलाव आहे. याकरिता आणि राजस्थान रॉयल्समध्ये ट्रेड ऑफची शक्यता संपली आहे. कदाचित राजस्थान रॉयल्स अश्विनला रिटेन करू शकणार नाही. या मागील कारण हे आहे की, फक्त ३+१ खेळाडूच रिटेन करण्याची अनुमती मिळण्याची शक्यता आहे.

# पाकिस्तान संघाच्या डिनर पार्टीचा वाद

**। अमेरिका । वृत्तसंस्था।**



पाकिस्तानी संघ नेहमीच कोणत्या ना कोणत्या कारणाने वादात सापडतो. सध्या पाकिस्तानी संघ टी-२० विश्वचषकामध्ये सहभागी होण्यासाठी अमेरिकेला गेला आहे. पाकिस्तानी संघ ६ जून रोजी टी-२० विश्वचषकात पहिला सामना खेळणार आहे.

मात्र, या सामन्याआधीच पाकिस्तानी संघाने एका खासगी डिनरचे आयोजन केले होते. तेथे चाहत्यांना भेटायला बोलावले होते. पण चाहत्यांना प्रवेश विनामूल्य नव्हता. पाकिस्तानी खेळाडूंना भेटण्यासाठी चाहत्यांकडून २५ डॉलर्स उकळण्यात आले. रशीद लतीफच्या एका व्हिडीओवरून हा खुलासा झाला आहे.

पाकिस्तानचा माजी खेळाडू रशीद लतीफने सोशल मीडियावर एक व्हिडीओ शेअर केला आहे. या व्हिडीओमध्ये रशीद लतीफ म्हणतो की, त्याने अधिकृत डिनरबद्दल ऐकले आहे, परंतु ते एक खाजगी डिनर होते. हे कोणी केले. हे कोण करू शकेल? हा मूर्खपणा आहे. याचा अर्थ तुम्ही आमच्या खेळाडूंना २५ डॉलर्समध्ये भेटू शकता. अल्लाह तुम्हाला आशीर्वाद देईल. काही गडबड झाली असती, तर लोक म्हणाले असते की खेळाडू अशा प्रकारे पैसे कमवतात.

रशीद लतीफ म्हणाले की चॅरिटी डिनर आयोजित करण्याची कल्पना समजू शकतो. पण पैसे घेऊन खाजगी डिनर आयोजित करणे समजण्यापलीकडचे होते. लोक मला सांगतात की जो कोणी पाकिस्तानी खेळाडूंना फोन करतो. ते विचारतात किती पैसे देणार? आता ही प्रथा रूढ झाली आहे.

### मोसमपूर्व सराव शिबीर

**मुंबई :** पूर्ण मोसम सुरू होण्याअगोदर मोसमपूर्व सराव शिबीर अतिशय महत्त्वाचे असते. त्यातून शारीरिक तंदुरुस्तीबरोबर मानसिकताही सक्षम करता येते. त्यामुळे या शिबिराकडे गांभिर्याने पाहा, असा सल्ला रणजी विजेता कर्णधार अजिंक्य रहाणेने मुंबईच्या सर्व वयोगटातील खेळाडूंना दिला आहे. मुंबई क्रिकेट संघटनेने बीकेसी येथे कार्यक्रमाचे आयोजन केले होते. गतमोसमात रणजीसह सात विविध वयोगटात विजेतेपद मिळवलेल्या मुला-मुलींच्या संघांचा गौरव सोहळा होता. त्यात ‘होम ऑफ दी चॅम्पियन्स’ ही नवी थिम यंदाच्या मोसमासाठी तयार करण्यात आली.

# अहमदने केली पाक क्रिकेट बोर्डावर टीका

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था।**

पाकिस्तान क्रिकेटमध्ये गेल्या काही महिन्यांमध्ये मोठ्या हालचाली झाल्याचे पाहायला मिळाले आहे. नेतृत्वबदलापासून ते प्रशिक्षक बदलापर्यंत अनेक बदल झाले. वर्ल्ड कप २०२३ मध्ये उपांत्य फेरीत पाकिस्तानला पोहचता न आल्याने कर्णधार बाबर आझमवर टीका झाली.

त्याने तिन्ही क्रिकेट प्रकारातील नेतृत्वपदाचा राजीनामा दिला. यानंतर टी-२० संघाचे कर्णधारपद पाकिस्तानने वेगवान गोलंदाज शाहिन आफ्रिदीकडे सोपवले, मात्र त्याच्या नेतृत्वातील निराशाजनक कामगिरीनंतर पुन्हा एकदा टी-२० संघाचे नेतृत्व बाबर आझमकडे देण्यात आले. त्यामुळे आता सुरु असलेल्या टी-२० वर्ल्ड कपमध्ये बाबर आझम पाकिस्तानचे नेतृत्व करताना दिसणार आहे. आता याबद्दलच पाकिस्तानचा माजी सलामीवीर अहमद शेहजादने पाकिस्तान क्रिकेट बोर्डावर जोरदार टीका केली. महत्त्वाचे म्हणजे तो ही टीका करत असताना त्याचे माजी क्रिकेटपटू इमाम-उल-हकबरोबर बाचाबाचीही झाली. जिओ टीव्हीवर टी वर्ल्ड कपच्या तयारीबद्दलच्या शोमध्ये शेहजाद आणि इमाम यांच्यात शाब्दिक चकमक झाली. शेहजाद म्हणाला,बाबर आझमबद्दल बोलायचे झाले, तर दोस्ती-यारीची बात आहे. तो काही खेळाडूंना बऱ्याच काळापासून पाठीशी घालत आहे. ते खेळाडू फॉर्ममध्येही नाहीत, हे चांगले वाटत नाहीये. मी जर सामने मोजले, तर तुम्हाला समजेल की खेळाडूंना इतक्या संधी मिळत नाहीत. जर दुसरा कर्णधार असता आणि तो इतका काळ खेळाडूंना पाठीशी घालत असेल, तर त्याला ते समजले असते. क्रिकेट आपण फक्त द्विपक्षीय मालिका जिंकण्यासाठी नाही खेळत, तर आयसीसी स्पर्धा जिंकण्यासाठी खेळतो. आपण गेल्या चार-पाच वर्षात कोणती स्पर्धा जिंकली आहे का? जर नाही, तर मी म्हणेल की ही गँग आहे, मैत्री आहे, एक अशी टोळी जी क्रिकेटला चार-पाच वर्षांपासून मॅनिप्युलेट करत आहे.

२०१७ चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये भारताला अंतिम सामन्यात पराभूत करत पाकिस्तानने विजेतेपद मिळवल्याबद्दल शेहजाद म्हणाला, सर्फराज अहमद आणि त्याच्या संघाने ते विजेतेपद मिळवले होते. त्याच्या नेतृत्वात आपण जिंकलो होतो. तुम्ही तुमच्या नेतृत्वात टी २० वर्ल्ड कप जिंका आणि सिद्ध करा. तुम्हाला बराच वेळ मिळाला आहे. एका कर्णधाराला पाच मोठ्या स्पर्धा नेतृत्वासाठी मिळत नाहीत. तुम्हाला नेतृत्वावरून आधी दूर केले आणि मग परत आणले. मी समजू शकतो, जर तुम्ही एमएस धोनी असाल आणि तुम्हाला परत आणले आहे, पण शाहिनबाबत हे चूकीचे झाले आहे.

# शुभमन गिलसोबत विवाहबद्ध होणार रिद्धीमा पंडित?





**। मुंबई । वृत्तसंस्था ।**

बॉलिवूड अभिनेत्री आणि क्रिकेटपटू यांच्या अफेअरची चर्चा रंगत असते. सध्या टीम इंडियाचा ‘प्रिन्स’ शुभमन गिल हा देखील चर्चेत आहे. शुभमन गिल याचे सारा सोबत नाव जोडले जात असताना दुसरीकडे त्याच्या लग्नाच्या चर्चा सुरू झाल्या आहेत. टीव्ही अभिनेत्री रिद्धीमा पंडितसोबत शुभमन गिल विवाहबंधनात अडकणार असल्याची चर्चा सुरू आहे. आता, यावर अभिनेत्री रिद्धिमाने आपले मौन सोडत याचा इनकार केला आहे.

टीव्ही अभिनेत्री रिद्धिमा पंडित आणि क्रिकेटर शुभमन गिल यांचे लग्न होणार असल्याच्या बातमीने सर्वांनाच आश्चर्याचा धक्का बसला आहे. ही बातमी सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर स्वतः रिद्धिमाने यावर प्रतिक्रिया दिली. रिद्धिमा आणि शुभमन या वर्षी डिसेंबरमध्ये लग्न करणार असल्याच्या बातम्या सुरू होत्या. मात्र, आपल्या लग्नाच्या चर्चा निराधार असल्याचे अभिनेत्रीने म्हटले आहे.

### रिद्धिमाने काय म्हटले?

एका न्यूज पोर्टलने दिलेल्या वृत्तानुसार, रिद्धिमाने इंस्टाग्रामवर एक व्हिडिओ शेअर केला आहे. यामध्ये तिने शुभमनसोबतच्या लग्नाबाबत भाष्य केले. तिने म्हटले की, आज मला माझ्या लग्नाबद्दल अनेक पत्रकारांच्या कॉल्सने जाग आली. पण लग्न कुणाचं? मी लग्न करत नाही आणि माझ्या आयुष्यात असा क्षण कधी आला तर मी स्वत: सर्वांसमोर नक्कीच जाहीर करणार. मात्र, सध्या या बातमीत कोणतेही तथ्य नाही असेही रिद्धिमाने सांगितले.

### अभिनेत्रीने केला इनकार

### शुभमनच्या अफेअरच्या चर्चा

टीम इंडियाचा ‘प्रिन्स’ शुभमन गिलच्या अफेअरच्या चर्चा सुरू असतात. शुभमन आणि सारा तेंडुलकर यांचे अफेअर सुरू असल्याची चर्चा होती. त्याच वेळी सारा अली खानला शुभमन डेट करत असल्याचे म्हटले जात होते. मात्र, शुभमन गिल अथवा सारा तेंडुलकर किंवा सारा अली खानकडून याबाबत कोणतेही अधिकृत भाष्य करण्यात आले नाही.

### कोण आहे रिद्धिमा पंडित?

रिद्धिमा पंडित ही एक लोकप्रिय टीव्ही अभिनेत्री आहे. रिद्धिमाने ‘हमारी बहु रजनीकांत’ आणि ‘खतरा-खतरा’ सारखे शो केले आहेत. २०१९ मध्ये तिने फिअर फॅक्टर: खतरो के खिलाडी ९ या रिएल्टी शोमध्येही सहभाग घेतला होता. बिग बॉस ओटीटीच्या पहिल्या सीझनमध्ये ती स्पर्धक म्हणूनही आली.

# विराटचा मोठा विक्रम! चक्क ब्राझीलचा फुटबॉलपटू नेमारला मागे टाकले

**। मुंबई। वृत्तसंस्था ।**



भारताचा स्टार फलंदाज विराट कोहली मैदानात तर मोठे विक्रम करत असतोच, पण मैदानाबाहेरही त्याच्या नावावर मोठे विक्रम आहेत. विराट केवळ भारतातीलच नाही, तर जगभरातील लोकप्रिय खेळाडूंपैकी एक आहे, हे नुकतेच दिसून आले आहे. विराट एक्स (ट्वीटर) या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर सर्वाधिक फॉलोवर्स असलेला दुसऱ्या क्रमांकाचा खेळाडू ठरला आहे. त्याने याबाबतीत ब्राझीलचा स्टार फुटबॉलपटू नेमार ज्युनियरला मागे टाकले आहे. ३५ वर्षीय विराटचे एक्सवर ६३.५ मिलियन फॉलोवर्स झाले आहेत. नेमारचे एक्सवर ६३.४ मिलियन फॉलोवर्स आहेत. या यादीत पोर्तुगालचा फुटबॉलपटू ख्रिस्तियानो रोनाल्डो अव्वल क्रमांकावर आहे. त्याला १११.४ मिलियन फॉलोवर्स एक्सवर आहेत.

दरम्यान, विराट सध्या टी वर्ल्ड कप २०२४ स्पर्धेत व्यस्त आहे. या स्पर्धेत विराटकडून भारतीय संघाला मोठ्या अपेक्षा आहेत. त्याने या स्पर्धेपूर्वी नुकतेच खेळलेल्या आयपीएल २०२४ स्पर्धेत शानदार कामगिरी केली होती. त्याने आयपीएल २०२४ मध्ये सर्वाधिक धावाही केल्या होत्या.

### इंग्लंड,स्कॉटलंडला १-१ गुण

**न्यूयॉर्क :** इंग्लंड आणि स्कॉटलंड यांच्यातील सामना पावसाच्या व्यत्ययामुळे धुवून निघाला. सामना रद्द झाला पण त्यामुळे इंग्लिश चाहत्यांना सुखद धक्का बसला. दोन्हीही संघाना १-१ गुण देण्यात आले. सामन्याच्या पूर्वसंध्येला पाऊस झाला. जोस बटलरने नाणेफेक जिंकून स्कॉटलंडला प्रथम फलंदाजीसाठी आमंत्रित केले. फलंदाजी करताना स्कॉटलंडने इंग्लिश गोलंदाजांना घाम फोडला. जॉर्ज मुशी आणि मायकल जोन्स यांनी स्फोटक खेळी केली. पावसाची ये-जा सुरूच राहिल्याने सामना १०-१० षटकांचा खेळवला गेला.

# ऑलिंपिकसाठी बोपण्णाकडून श्रीराम बालाजीला प्राधान्य

**। नवी दिल्ली । वृत्तसंसंस्था।**

पॅरिस ऑलिंपिक स्पर्धेस पात्र ठरलेल्या रोहन बोपण्णाने दुहेरीतील आपला साथीदार म्हणून एन. श्रीराम बालाजी याची निवड केली आहे. सध्या सुरू असलेल्या फ्रेंच ओपनमध्ये लक्षवेधक कामगिरी केल्यामुळे बोपण्णाने बालाजीला प्राधान्य दिले आहे.



श्रीराम बालाजी आपला साथीदार असेल, असे बोपण्णाने अखिल भारतीय टेनिस संघटनेला कळवले आहे. त्याची ही मागणी संघटना मान्य करेल, अशी अपेक्षा आहे. फ्रेंच स्पर्धेत बालाजी मॅक्सिकोच्या एमए रेयास-वारेला मार्टिनेझ याच्यासह फ्रेंच ओपनमध्ये खेळत आहे. त्यांचा तिसऱ्या फेरीत रोहन बोपण्णा आणि मॅथ्यू एबडेन यांच्यासमोर पराभव झाला असला, तरी त्यांनी फारच झुंझार खेळ केला. बालाजीची सर्व्हिस वेगवान आहेच तसेच तो बेसलाईनवरूनही चांगला खेळ करतो. असा खेळ क्ले कोर्टवर फायदेशीर ठरतो.

# गॉफ, स्विअतेक उपांत्य फेरीत

## सलग पाच सेटच्या झुंजीनंतर जोकोविचला दुखापत

**। फ्रान्स । वृत्तसंस्था ।**

**फ्रेंच ओपन टेनिस ग्रँडस्लॅममध्ये मंगळवारी मानांकित खेळाडूंची वाटचाल कायम राहिली. प्रथम मानांकित इगा स्विअतेक व तिसरी मानांकित कोको गॉफ यांनी प्रतिस्पर्ध्यांवर विजय संपादन करीत महिला एकेरी विभागाची उपांत्य फेरी गाठली.**

कोको गॉफ हिने उपांत्यपूर्व फेरीच्या लढतीत ओन्स जॅब्यूएर हिच्यावर ४-६, ६-२, ६-३ असा तीन सेटमध्ये रोमहर्षक विजय मिळवला. पहिला सेट गमावल्यानंतर गॉफ हिने दबावाखाली आपला खेळ उंचावत अंतिम चारमध्ये वाटचाल केली. गॉफ सलग तिसऱ्यांदा ग्रँडस्लॅमच्या उपांत्य फेरीत पोहोचली आहे. मागील वर्षी सप्टेंबर महिन्यात तिने अमेरिकन ओपन स्पर्धा जिंकण्याचा मान संपादन केला होता. त्यानंतर या वर्षी जानेवारी महिन्यात तिने ऑस्ट्रेलियन ओपनची उपांत्य फेरी गाठली



आणि आता फ्रेंच ओपन स्पर्धेची उपांत्य फेरी गाठण्यात तिला यश लाभले आहे. जेतेपदाच्या हॅट्ट्रिकच्या दिशेने पोलंडच्या इगा स्विअतेक हिनेही मार्केटा वांड्रोसोवा हिला सहज नमवत अंतिम चारमध्ये प्रवेश केला. इगा हिने मार्केटा हिच्यावर ६-०, ६-२ अशी मात करीत पुढे पाऊल टाकले. इगा हिने आता फ्रेंच ओपन स्पर्धा सलग तिसऱ्यांदा जिंकण्याकडे वाटचाल केली आहे. याआधी इगा हिने २०२२ व २०२३ या वर्षामध्ये फ्रेंच ओपन स्पर्धा जिंकण्याची किमया साधली होती.

दोन पाच सेटच्या थरारानंतर विजयअव्वल मानांकित आणि गतविजेता नोवाक जोकोविच याला सलग दोन फेऱ्यांमध्ये पाच सेटच्या थरारानंतर विजयाला गवसणी घालता आली. शनिवारी मध्यरात्री तिसऱ्या फेरीच्या लढतीत लोरेंझो मुसेटी याच्यावर पाच सेटच्या झुंजीनंतर विजय मिळवल्यानंतर जोकोविचला सोमवारी मध्यरात्री पुन्हा पाच सेटचा सामना करावा लागला. जोकोविच याने फ्रान्सिस्को सिरनडोलो याचे कडवे आव्हान ६-१, ५-७, ३-६, ७-५, ६-३ अशा पाच सेटमध्ये परतवून लावले. पहिला सेट जिंकल्यानंतर जोकोविचवर पुढील दोन सेट गमावण्याची आपत्ती ओढवली होती, पण यामधून बाहेर येत त्याने चौथा व पाचवा सेट आपल्या नावावर केला आणि उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला, मात्र आता तो उपांत्यपूर्व फेरीत खेळणार की नाही याबाबत प्रश्नचिन्ह आहे. जोकोविचच्या गुडघ्याला दुखापत झाली असून यामधून तो बाहेर येतो की नाही, याचे उत्तर लवकरच मिळेल.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)